कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शुक्रवार | दि. २३ ऑक्टोबर २०२६ | अंक १३७ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

तरुणावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न

उरण : नमेश पाटील (३१) या तरुणाला मारहाण करून त्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि.२२) सायंकाळच्या सुमारास घडली. उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांनी तातडीने या तरुणाला उपचारासाठी नवीमुंबई येथील रुग्णालयात नेण्याचे काम पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून केले. मिळालेल्या माहितीनुसार नमेश पाटील हा तरुण दुचाकीवरून सारडे येथे जात होता. त्यावेळी मोठे भोम येथील पी.पी. खारपाटील पेट्रोल पंपाजवळील रस्त्यावर असणाऱ्या एका व्यक्तीने त्याला थांबवून त्याला मारहाण केली. तसेच, त्याच्या •➤पान २ वर

लिलॅक हॉटेलच्या स्वयंपाकगृहात आग

रायगड : अलिबागमधील लिलॅक हॉटेलच्या स्वयंपाक गृहात गुरुवारी (दि.२२) सायंकाळी अचानक आग लागल्याची घटना घडली. हॉटेलमधील कामगारांनी सतर्कता दाखवत उपलब्ध असलेल्या अग्रीशमन यंत्रासह पाण्याच्या मदतीने आग आटोक्यात आणली. अलिबाग नगरपरिषदेच्या अग्रीशमन दलानेदेखील घटनास्थळी जाऊन आगीला नियंत्रणात आणले. सुदैवाने जीवितहानी टळली, परंतु,



•➤पान २ वर

वे|घ|क


अश्लील व्हिडीओ प्रकरणी गुन्हा

रेवदंडा : थेरोंडा येथे एका अल्पवयीन मुलाने इन्स्टाग्राम अकाउंटद्वारे लहान मुलांचे अश्लील व्हिडीओ प्रसारित केल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे अल्पवयीन मुलांच्या मोबाईल वापराचा, तसेच सोशल मीडियावरील संभाव्य धोक्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रेवदंडा पोलिसांनी पालक आणि शिक्षकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. अल्पवयीन मुलांच्या हातात मोबाईल देताना त्यांचा इंटरनेट व सोशल मीडियावरील वापर कसा आहे, याकडे पालकांनी लक्ष द्यावे. इंटरनेटच्या माध्यमातून होणारे सायबर फसवणुकीचे प्रकार, अश्लील सामग्रीचा संपर्क आणि त्यातून निर्माण होणारे संभाव्य धोके याबाबत मुलांना योग्य मार्गदर्शन करावे, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

मेफेड्रोनप्रकरणी गुन्हा दाखल

नवीन पनवेल : अमली पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी जीतीन शेट्टी आणि राज अजय कुमार मिश्रा या दोन तरुणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात दि.२२ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कॉलेज फाटा ते चिंचपाडा पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यावर करंजाडे येथील नाल्याजवळ जितीन शेट्टी आणि राज अजय कुमार मिश्रा हे मेफ ड्रोन अमली पदार्थ विक्री करणाच्या उद्देशाने घेऊन जात असल्याचे आढळून आले. यावेळी करण्यात आलेल्या कारवाईत त्यांच्याजवळ २८ हजार रुपये किमतीचा मेफोड्रोन हा अमली पदार्थ सापडून आला. त्यामुळे या प्रकरणी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मुरुड नगरपालिकेत विहिरींचा महाघोटाळा





गाळ उपाशासाठी १५ लाख ८८ हजार रुपयांची मंजूरी

नगरपरिषद सीईओंचा अजब कारभार; आठ विहिरींसाठी केला समान खर्च?

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुरुड नगरपालिकेने विहिरींचा गाळ उपसतानावर केलेल्या खर्चाची धक्कादायक माहिती समोर आली असून, किरकोळ खर्चाचे काम लाखो रुपयांवर नेल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे. मुरुड शहरातील आठ विहिरींचा गाळ उपसण्यासाठी तब्बल १५ लाख ८८ हजार ८८८ रुपये खर्च केल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून समोर आली आहे. एका विहिरीच्या गाळ उपशासाठी १ लाख ९८ हजार रुपये खर्च झाल्याचा आकडा पाहता या कामाच्या खर्चावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. विहिरीतील गाळ काढण्याच्या कामासाठी एवढा मोठा खर्च नेमका कशावर झाला? किती गाळ उपसला? काम प्रत्यक्षात किती झाले? आणि या खर्चाची पडताळणी कोणी केली? अशा प्रश्नांची उत्तरे आता मुरुडकरांना हवी आहेत. मुरुडचे सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत सुर्वे यांना मिळालेल्या माहितीच्या अधिकारातून ही माहिती समोर आली आहे.

विहिरींची स्वच्छता हा पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने आवश्यक विषय आहे. मात्र, सार्वजनिक निधीतून होणाऱ्या प्रत्येक कामाचा खर्च पारदर्शक आणि पडताळणीयोग्य असणे तितकेच गरजेचे आहे. मुरुड नगरपालिकेने या आठही विहिरींसाठी मंजूर रक्कम, प्रत्यक्ष कामाची स्थिती आणि खर्चाचा तपशील जनतेसमोर ठेवावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. विहिरीतील गाळ उपसण्याच्या नावाखाली मंजूर झालेला प्रत्येक रुपया कोणत्या कामासाठी वापरला जाणार, हे स्पष्ट झाले पाहिजे.

आठ विहिरींचा खर्च एकसारखा?

प्रशासकीय मान्यता आदेशातील कामांची यादी पाहिली असता



भंडारवाडा, काळीवाडा, के.एन. कॉलेज परिसर, विश्रामबाग, मुस्लिम पेठ, मुस्लिम महिला समाज हॉल, दस्तुरी नाका आणि नगरपरिषद येथील विहिरीचा समावेश आहे. प्रत्येक कामासाठी १ लाख ९८ हजार ६११ रुपयांची तांत्रिक मान्यता आणि उपलब्ध अनुदानातून तेवढीच प्रशासकीय मान्यता नमूद आहे. प्रत्येक विहिरीची खोली, व्यास, गाळाचे प्रमाण आणि गाळ बाहेर वाहून नेण्याचा खर्च वेगवेगळा असू शकतो. मग सर्व आठ कामांसाठी एकच रक्कम कशी निश्चित झाली? यामागे कोणते अंदाजपत्रक, दरपत्रक आणि तांत्रिक निकष वापरण्यात आले? या प्रश्नांची उत्तरे नगरपालिकेने द्यावी, अशी मागणी सुर्वे यांनी केली आहे.

सीईओ नेटवर्क कक्षाच्या बाहेर

याबाबत नगरपरिषदेचे सीईओ सचिन बच्छाव यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचा फोन नेटवर्क कक्षाच्या बाहेर असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे याप्रकरणात सचिन बच्छाव नेमका काय खुलासा देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

माहिती अधिकारातून समोर आलेल्या या कागदपत्रांमुळे मुरुड नगरपालिकेच्या कामकाजातील पारदर्शकतेचा प्रश्न चर्चेत आला आहे. आता प्रशासन या खर्चाचा सविस्तर हिशेब देणार का, याकडे मुरुडकरांचे लक्ष लागले आहे.

मुरुडच्या विहिरींच्या गाळ उपसा •➤पान २ वर

स्लॅब कोसळून विद्यार्थिनी जखमी

■ धाकटे शहपूर शाळेतील घटना; पालकांमध्ये संताप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील धाकटे शहापूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत वर्गाचा स्लॅब कोसळून आठ वर्षीय विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्याच्या घटनेने शिक्षण विभागाच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे निघाले आहेत. गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पालकांकडून संताप व्यक्त होत आहे.

धाकटे शहापूर येथे जिल्हा परिषदेची पहिली ते चौथीपर्यंतची शाळा आहे. या शाळेत एकूण २८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गुरुवारी सायंकाळी विद्यार्थी वर्गात बसलेले असताना •➤पान २ वर



शिक्षणाधिकारी फोन उचलेनात!

या गंभीर घटनेची माहिती घेण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांनी फोन उचलण्याची तसदी घेतली नाही. एका आठ वर्षीय विद्यार्थिनीच्या डोक्यावर स्लॅब कोसळतो, तिच्या डोक्याला दहा टाके घालावे लागतात आणि अशा गंभीर घटनेबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधता येत नाही, ही बाब संतापजनक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहे.

> शाळेत घडलेली घटना गंभीर आहे. याबाबतची माहिती मला सायंकाळी शाळेतील शिक्षकांनी दिली. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक असल्याने मला तातडीने घटनास्थळी जाता आले नाही. आता जखमी विद्यार्थिनीच्या घरी जाऊन तिच्या प्रकृतीची विचारपूस करणार आहे. त्यानंतरच या घटनेबाबत अधिक माहिती देऊ शकेन. – कृष्णा पिंगळा, गटशिक्षणाधिकारी

सरकारी कार्यालयात कर्मचारी गायब



। पेण । प्रतिनिधी ।

सरकारने पाच दिवसांचा आठवडा लागू करूनही पेणमधील सार्वजनिक बांधकाम उपविभाग आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यालयांत कर्मचाऱ्यांच्या वेळेवर उपस्थितीचा बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे.


पेण येथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयात 'कृषीवल'च्या प्रतिनिधीने सकाळी सव्वादहा वाजता पाहणी केली असता, सागर घाटकर आणि सुरेश सोनावणे हे दोघेच कर्मचारी उपस्थित होते. •➤पान २ वर

तांडेल दाम्पत्याचा अपघाती मृत्यू

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

एकविरा देवीचे दर्शन घेऊन दुचाकीने अलिबागला परतणारे प्रशांत तांडेल आणि त्यांच्या पत्नीचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली. हे दोघेही घरी न पोचल्याने सुरू करण्यात आलेल्या शोधमोहिमेदरम्यान दोघांचेही मृतदेह सायमाळजवळ धनगरवाडीकडे जाणाऱ्या मार्गावर आढळून आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागमधील प्रशांत तांडेल हे पत्नीसह एकविरा देवीच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन दुचाकीने पेणच्या दिशेने अलिबाग येथे निघाले. मात्र, ते घरी पोहोचलेच नाहीत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी चौकशी सुरू केली. त्यांचे मोबाईल लोकेशन तपासले असता शिंग्रोबा मंदिर ते



सायमाळ, खोपोलीदरम्यान लोकेशन दिसून आले. त्यानंतर संबंधित परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली. या शोधमोहिमेदरम्यान सायमाळजवळ धनगरवाडीकडे जाणाऱ्या मार्गावर दोघांचेही मृतदेह आढळले. घटनास्थळी त्यांची दुचाकीही अपघातग्रस्त अवस्थेत आढळून आली. घटनेची माहिती मिळताच हेल्प फाऊंडेशनचे सदस्य आणि पोलीस अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू असून, अपघात नेमका कसा घडला, याचा तपास केला जात आहे.

दत्तात्रय सावंत यांना शेकापचा पाठिंबा

। पनवेल । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्यात सध्या शिक्षक मतदार आणि पदवीधर मतदारांच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. पुणे विभागांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी शुक्रवारी (दि.२३) मतदान होत आहे. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी लढणारे पुणे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्ष, शेतकरी कामगार पक्ष व समविचारी पक्ष तसेच शिक्षक संघटनांचे उमेदवार दत्तात्रय अच्युतराव सावंत यांना शेकाप नेते व माजी आमदार बाळाराम पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षातर्फे जाहीर पाठिंबा दिला आहे. इतकेच नव्हे तर शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील आणि बाळाराम पाटील या निवडणुकीत सक्रिय राहून दत्तात्रय अच्युतराव सावंत यांच्या प्रचार करीत आहेत. या पुणे शिक्षक मतदार संघामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर असे एकूण पाच जिल्हे येत असून या पाच जिल्ह्यांमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या जमाने काम •➤पान २ वर



मतदारांना ओळखपत्राची प्रतीक्षा

५२ हजार अर्ज निवडणूक विभागात प्रलंबित

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

मतदानाचा हक्क बजावण्याचा अधिकार मिळावा, यासाठी रायगड जिल्ह्यातील ५२ हजार ४१२ जणांनी निवडणूक विभागात अर्ज दाखल केले आहेत. जिल्ह्यातील निवडणूक विभागात हे अर्ज प्रलंबित असून, २६ हजार नव मतदारांना प्रतिक्षा लागून राहिली आहे. एसआयआर प्रक्रीया सुरु असल्याने ही कामे प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार आहेत. त्यामध्ये अलिबाग विधानसभा मतदार संघात तीन लाख ५ हजार २५५, श्रीवर्धनमध्ये ३ लाख ६२ हजार ६८०, महाडमध्ये २ लाख ९५ हजार ४४९, पनवेलमध्ये ६ लाख ८४ हजार ९५, कर्जतमध्ये ३ लाख १९ हजार ३३७, उरणमध्ये ३ लाख ५७ हजार २५५, पेणमध्ये ३ लाख ५ हजार २५५ मतदारांचा समावेश आहे.

विविध अर्जावर दृष्टीक्षेप

नवीन अर्ज	– 26542
नाव कमी	– 3523
नाव आणि पत्ता दुरुस्ती	– 22105
अनिवासी भारतीय	– 242



> **नवीन अर्जासह नाव कमीचे अनेक अर्ज कार्यालयात प्राप्त झाले आहेत. सध्या एसआयआर प्रक्रीया आहे. त्यामुळे हे अर्ज प्रलंबित आहेत. लवकरच ही प्रक्रीया पुर्ण केली जाईल – नितीन वाघमारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

मतदार वाढविण्यासाठी निवडणूक विभागाकडून जिल्ह्यात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. जिल्हा तालुका स्तरावर शिबीर घेऊन मतदान •➤पान २ वर



५६ प्राथमिक आरोग्य केंद्रात वातानुकूलित कक्ष उभारणार | **जिल्हा रुग्णालयाच्या १६ संस्थामध्ये उष्माघात कक्षाची निर्मिती होणार**

वाढत्या उष्णतेमुळे आरोग्य धोक्यात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवू लागली आहे. त्यामुळे वाढत्या उष्णतेचा मानवी आरोग्यावर परिणाम होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्यासह उष्माघात प्रतिबंधासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि जिल्हा रुग्णालय ही आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्हा परिषदेच्या ५६ आरोग्य केंद्रात वातानुकूलित कक्ष आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अखत्यारित येणाऱ्या १६ आरोग्य संस्थामध्ये उष्माघात कक्ष उभारले जाणार



प्रथमोपचारावर दृष्टीक्षेप

- व्यक्तीला सावलीत किंवा थंड ठिकाणी न्या.
- अनावश्यक घट्ट कपडे सैल करा.
- शरीरावर थंड पाणी शिंपडा.
- ओल्या कपडाने शरीर पुसा.
- त्वरीत आपत्कालीन रुग्णवाहिकेला संपर्क करा.

उष्माघातापासून बचावाचे उपाय

- नियमित पाणी प्या.
- दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो बाहेर जाणे टाळा.
- बाहेर जाताना टोपी, छत्री आणि सैल कपडे वापरा.
- ताक, लिंबूपाणी अशा पेयांचे सेवन करा.

> सध्या तापमानात वाढ झाली आहे. नागरिकांनी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत विनाकारण घराबाहेर पडू नये. साधारणपणे घराबाहेर पडणे टाळावे. ताक व फळांचा आहार घ्यावा. काही त्रास जाणवल्यास तातडीने जवळच्या रुग्णालयात जाऊन उपचार करावे. **– डॉ. शितल जोशी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय अलिबाग**

असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

यंदा पाऊस लवकरच गायब झाला. तसेच, सध्या एल निनोच्या प्रभावामुळे उष्णतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सकाळी १० वाजल्यापासून उन्हाचे चटके जाणवत आहेत. दुपारच्यावेळी घरातून बाहेर पडणेही कठीण झाले आहे. बदलत्या •➤पान २ वर

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028

अपूर्ण विकास ठरतोय जीवघेणा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागमधील ढवर जवळ पुलाजवळील अपूर्ण रस्त्याचा विकास जीवघेणा ठरत आहे. बेलकडे येथील राजेश पाटील यांच्या चारचाकी गाडी या रस्त्यावरील खड्ड्यामध्ये आदळली. त्यामुळे त्यांच्या गाडीच्या इंजिनला जोरदार फटका बसल्याने खुप मोठी वित्तहानी झाली. याबाबत ठेकेदारांना जाब विचारणाऱ्या राजेश पाटील यांच्यावर ठेकेदारांकडून आरेरावी केली जात असल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे चालकांसह प्रवासी वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत राजेश पाटील यांनी अलिबाग पोलीस ठाण्यासह तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यामुळे आता ही यंत्रणा काय भुमिका, घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

राजेश पाटील यांच्या तक्रारीनुसार, विकासाच्या नावाखाली एमएसआयडीसी अंतर्गत ढवर ते बेलकडे मार्गावरील पुलाचे काम सध्या सुरु आहे. याठिकाणी माती दगडांचा भराव टाकून पर्यायी रस्ता करण्यात आला आहे. या मार्गावरून शेकडो वाहनांची वर्दळ कायमच असते.त्या दृष्टीने ठोस उपाययोजना करण्यास ठेकेदार अपयशी ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे. बेलकडे येथील राजेश पाटील हे त्यांची चारचाकी गाडी घेऊन बेलकडे मार्गे रेवदंडा येथे जात होते. त्यावेळी माती व दगडाच्या भरावातील खड्ड्यात त्यांची गाडी जोरदार आदळली. त्यामुळे गाडीचे इंजिन तूटून आतील ऑईल निघाले. सुदैवाने कोणतीही जीवीतहानी झाली नाही. मात्र, या अपघातामध्ये राजेश पाटील यांच्या गाडीचे प्रचंड नुकसान झाले. त्यांनी तात्काळ राजू नामक ठेकेदाराशी संपर्क साधला आणि निकृष्ट दर्जाच्या कामाचा पाढा वाचून दाखविला. मात्र, त्या ठेकेदाराकडून उद्धट उत्तर देण्यात आले. आरेरावीची भाषा करून आमचा काहीही संबंध नाही, असे सांगून समस्या सोडविण्यास दुर्लक्ष केले. या प्रकाराबाबत राजेश पाटील यांनी ठेकेदाराच्या कारभाराविरोधात संपात व्यक्त केला. त्यांनी अलिबाग तहसीलदार आणि पोलीस ठाण्यात ठेकेदाराविरोधात तक्रार करून त्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. राजेश पाटील यांच्यासह एका वॅगनर कारचेही अशाच पद्धतीने नुकसान झाल्याचे त्यांनी पोलीस आणि महसूल विभागाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

विकासाच्या नावाखाली रस्ते ठिकठिकाणी खोदून ठेवले आहेत. त्याचा नाहक त्रास प्रवाशांसह चालकांना होत आहे. अनेक वाहनांचे नुकसान होत आहे. याकडे मात्र ठेकेदांसह एमएसआयडीसी विभाग बघ्याची भुमिका घेत असल्याचा आरोप केला जात आहे. ठेकेदाराने योग्य ती दखल घेतली नाही. तर त्यांच्या विरोधात न्यायालयात जाऊन दाद मागणार, असा इशारा राजेश पाटील यांनी दिला आहे.

विद्यार्थी गुणगौरव सोहळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

''पुस्तके माणसाला घडवतात, त्यामुळे आजच्या डिजिटल युगातही मुलांनी वाचनाची गोडी टिकवून ठेवणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन गंगाधर पाटील यांनी केले. सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय शहाबाज संचलित ज्ञान मंदिर अकॅडमीच्यावतीने गुणगौरव व कौतुक सोहळ्याचे रविवारी (दि.१८) आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष नितीन पाटील, उपाध्यक्ष मंगेश भगत, सचिव प्रविण पाटील, खजिनदार डॉ. विष्णू म्हात्रे, सदस्या डॉ. प्रगती पाटील व अमित धुमाळ आदींसह परिसरातील पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रज्ञाशोध, मंथन, स्कॉलरशिप आणि नवोदय यांसारख्या कठीण स्पर्धा परीक्षांमध्ये तसेच वाचन व वेशभूषा स्पर्धेत बाजी मारणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व बक्षीस देण्यात आले. या सोहळ्यात महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्ह्यात १४वा आणि राज्यात १३८वा क्रमांक मिळवणारा, तसेच मंथन परीक्षेत राज्यात ५३वा व जिल्ह्यात ४३वा क्रमांक पटकावणारा इयत्ता तिसरीतील प्रथमेश पिंगळे, त्याचबरोबर नवोदय परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झालेला भार्गव पाटील या विद्यार्थ्यांचा संस्थेच्यावतीने विशेष सत्कार करण्यात आला. सोबतच, विविध परीक्षांमध्ये यश मिळवणारे गार्गी धुमाळ, जीवी पाटील, आर्ष म्हात्रे आणि इंग्लिश मीडियम इयत्ता चौथी प्रज्ञाशोध परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी आर्चीस म्हात्रे, अर्ना भगत, स्पृहा थळे व श्लोक पाटील यांचेही कौतुक करण्यात आले.

पान १ वरुन

लिलॅक हॉटेलच्या स्वयंपाकगृहात आग

हॉटेलचा काही भाग जळून नुकसान झाले आहे. ही आग विजेचा स्पार्क झाल्याने लागल्याचा प्राथमिक अंदाज तेथील व्यवस्थापनाने व्यक्त केला. अलिबागमधील लिलॅक हॉटेलमधील कामकाज दुपारनंतर आटोपले होते. सर्व कामगार त्यांच्या अन्य कामात व्यस्त होते. त्याचवेळी अचानक स्वयंपाकगृहाच्या परिसरात धुर येऊ लागला. ही बाब कामगारांच्या लक्षात आल्यावर कामगारांनी क्षणाचाही विचार न करता आग आटोक्यात आणण्यासाठी शर्तीचा प्रयत्न केला. हॉटेलच्या मागील बाजूस असलेल्या एसटी आगारापासून काही अंतरावरून आगीचा भडका दिसून येत होता. अखेर कामगारांनी हॉटेलमध्ये असलेल्या उपलब्ध अग्नीशमन यंत्रणाच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती अलिबाग नगरपरिषदेच्या अग्नीशमन दलाला मिळताच घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली. मात्र, स्वयंपाक गृहातील पीओपीचा काही भाग जळाला. यात कोणतीही मोठी हानी झाली नसल्याचे तेथील व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.

मुरुड नगरपालिकेत विहिरींचा महाघोटाळा

कामाची जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. आठ विहिरींसाठी प्रत्येकी १ लाख ९८ हजार ६११ रुपये, अशी एकूण १५ लाख ८८ हजार ८८८ रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्षात किती गाळ काढण्यात आला, कामाचे मोजमाप कसे करण्यात आले आणि प्रत्यक्ष किती निधी खर्च झाला, याचा तपशील जनतेसमोर येणे आवश्यक आहे. या प्रकरणाची तांत्रिक व आर्थिक पडताळणी करून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी चौकशी करावी, अशी मागणी सुर्वे यांनी केली आहे.

सरकारी कार्यालयांत कर्मचारी गायब

सागर मेणे, समीर म्हात्रे आणि प्राजक्ता मुकदुक हे गैरहजर होते. विशेष म्हणजे, कार्यालयात हालचाल रजिस्टर ठेवले जात नसल्याचे देखाल कर्मचाऱ्यांनी सांगितले. याबाबत उपअभियंता एस.एस. पाटोले यांच्याशी संपर्क केला असता, त्यांच्याकडून समाधानकारक स्पष्टीकरण मिळाले नाही. त्यानंतर शेजारी असणाऱ्या कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यालयात गेले असता तेथील रजिस्टरवर १४ कर्मचाऱ्यांची नोंद असतानाही महेश पाटील आणि अमोल भेकरे हे दोघेच उपस्थित होते. तर, पेण शाखेत अनिरुद्ध पाटील हे एकमेव कर्मचारी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता शैलेंद्र गुंड यांना संपर्क केला असता, त्यांना संपर्क होऊ शकला नाही. उपकार्यकारी अभियंता व्ही.एस. शिगवण यांच्याशी संपर्क झाला असता, त्यांनी १ मिनीटात माहिती देण्याचे आश्वासन दिले; मात्र, अर्धा तास प्रतीक्षा करूनही त्यांच्याकडून काहीच माहिती दिली गेली नाही. पुन्हा त्यांच्याशी संपर्क साधल्यावर गैरहजर कर्मचाऱ्यांची अर्ध्या दिवसाची रजा कापणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे दोन महत्त्वाच्या सरकारी कार्यालयांत कर्मचारी गैरहजर आणि उपस्थितीच्या नोंदींबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. तसेच, सरकारी कार्यालयांतील या अनागोंदीला आळा घालण्याची मागणी होत आहे. या दोन्ही कार्यालयामध्ये वरिष्ठ अधिकारीही गैरहजर असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे हे अधिकारी आपल्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना व आपल्या स्वतःवर कशा प्रकारे कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

वाढत्या उष्णतेमुळे आरोग्य धोक्यात

वातावरणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे वेगवेगळे आजार उद्‌भवू लागले आहेत. तसेच, उन्हामुळे डोकेदुखीचा त्रास अनेकांना जाणवत असून, दवाखान्याच्या फेऱ्याही वाढल्या आहेत.

रायगड जिल्ह्यात दिवसा कमाल ३६ ते किमान ३० अंशांपर्यंत तापमान जाणवत आहे. त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांमध्ये उष्माघाताचा धोका संभवतो. उष्माघाताचा संभाव्य धोका लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यातील नागरिकांना तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वातानुकूलित खोली निर्माण करण्याचे निर्देश राजिप उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांनी दिले आहेत. उष्माघात हा गंभीर स्वरूपाचा धोका असल्यामुळे काही वेळा रुग्ण दगावण्याचीही शक्यता असते. त्यामुळेच उष्णतेमुळे बाधित झालेल्या रुग्णांना वेळेत शक्यता उपचार मिळणे आणि त्यांना योग्य वातावरणात ठेवणे महत्त्वाचे आहे. या पाश्वभूमीवर जिल्ह्यातील ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वातानुकूलित खोलीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना त्यांच्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातच आवश्यक आरोग्यसेवा मिळावी, तसेच उष्माघाताच्या रुग्णांना तातडीने उपचार देण्यासाठी आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम व्हावी, हा प्रमुख उद्देश आहे. या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य अधिकाऱ्यांनी आवश्यक नियोजन करावे. सर्व ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वातानुकूलित खोली निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. उष्णतेच्या पाश्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक वातानुकूलित कक्ष निर्माण करण्याचा ठराव राजिपचे उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे उष्माघातामुळे प्रभावित नागरिकांना सेवा पुरविणे सोयीचे ठरणार आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागासह जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अखत्यारित येणारे ६ उपजिल्हा रुग्णालय, ९ ग्रामीण रुग्णालय अशा एकूण १६ दवाखान्यांमध्ये उष्माघात कक्ष उभारण्याच्या सुचना दवाखान्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती जिल्हा रुग्णालयाकडून देण्यात आली आहे.

मतदारांना ओळखपत्राची प्रतीक्षा

करण्याचे आवाहन नागरिकांना केले. निवडणूक विभागाच्या या आवाहनाला जिल्ह्यातील नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाली. त्यानंतर त्यातील काहींनी नाव व पत्ता दुरुस्तीसह नाव कमी करणे, अनिवासी भारतीय तसेच नव्याने मतदार यादीत नाव येण्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रीया राबविली. यावेळी जिल्ह्यातील ५२ हजार ४१२ नागरिकांनी निवडणूक विभागाकडे अर्ज भरला होता. त्यामध्ये नवीन नोंदणीसाठी (सहा नं. फॉर्म) २६ हजार ५४२, अनिवासी भारतीय असलेल्या २४२ नागरिकांनी (सहा अ फॉर्म) २४२, नाव कमी करण्यासाठी (सात नं. फॉर्म) ३ हजार ५२३, नावात आणि पत्त्यामध्ये बदल म्हणजे दुरुस्तीसाठी(आठ नं. फॉर्म) २२ हजार १०५ अर्जांचा समावेश आहे. आपले मतदार यादीत नाव असावे आणि मतदान कार्डसह यादीमध्ये झालेल्या चुकीची दुरुस्ती करण्यासाठी अर्ज केले आहेत. मात्र, सध्या निवडणूक विभागामार्फत एसआयआर ही प्रक्रीया सुरु असल्यामुळे ५२ हजार अर्ज प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील २६ हजार नवं मतदारांना मतदान ओळखपत्रासह नोंदणीची प्रतिक्षा लागून राहिली असून, नावात आणि पत्त्यामधील दुरुस्तीची २२ हजार अर्ज प्रलंबित आहे. एसआयआरमुळे ही कामे रखडली असल्याने मतदारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

दत्तात्रय सावंत यांना शेकापचा पाठिंबा

करीत आहेत. दरम्यान, शेतकरी कामगार पक्ष नेहमीच विचाराच्या आणि न्यायाच्या लढाईत अग्रेसर राहिला आहे. यावेळी पुणे शिक्षक मतदार संघाच्या विचारांची आणि न्यायाच्या लढाईत शेकाप नेहमीच साथ देईल. मतदारांनी भरघोस मतांनी सावंत सरांना निवडून देऊन आपल्या हक्काचा माणूस निवडा, असे आव्हान कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार आणि शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळाराम पाटील यांनी सांगितले.

तरुणावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न

अंगावर पेट्रोल टाकून त्याला जाळण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशांनी नमेश या तरुणाला सहकार्य करुन त्याला मोठे भोम येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. मात्र, मारहाण करणाऱ्या व्यक्तीने तेथून पळ काढला. या घटनेची माहिती उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांना मिळताच त्यांनी नमेश पाटील या जखमी अवस्थेतील तरुणाला तातडीने उपचारासाठी नवीमुंबई येथील रुग्णालयात दाखल केले.

स्लॅब कोसळून विद्यार्थिनी जखमी

छताच्या स्लॅबचा काही भाग अचानक कोसळला. तो इयत्ता तिसरीमध्ये शिक्षण घेणाऱ्या निष्ठा केदार मोकल या आठ वर्षीय विद्यार्थिनीच्या डोक्यावर पडला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे शाळेत एकच गोंधळ उडाला. जखमी निष्ठाला तातडीने पोयनाड येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिच्या डोक्याला जवळपास दहा टाके घालण्यात आले आहेत. सुदैवाने या दुर्घटनेत मोठी जीवितहानी टळली; मात्र, शाळेच्या इमारतीच्या सुरक्षिततेबाबत आणि विद्यार्थ्यांच्या जीविताबाबत शिक्षण विभाग किती गंभीर आहे, हा संतप्त करणारा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

वर्षभरापूर्वी डागडुजी

विशेष म्हणजे, या शाळेची वर्षभरापूर्वीच डागडुजी करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. असे असतानाही वर्गाच्या स्लॅबचा भाग कोसळल्याने या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. डागडुजी नेमकी कोणत्या स्वरूपाची करण्यात आली? कामाची तपासणी कोणी केली? इमारतीची सुरक्षितता प्रमाणित करण्यात आली होती का? विद्यार्थ्यांसाठी वर्ग सुरक्षित असल्याची खात्री कोणी केली? या प्रश्नांची उत्तरे शिक्षण विभागाने देणे आवश्यक आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती गीता संजीव खंडेलवाल, रा.५३, धनिष्ठा, तारांगण टॉवर्स को. ऑ.हौ. सोसायटी, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, कोरम मॉल शेजारी, समता नगर, ठाणे (प.), जे के ग्राम, ४००६०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे हेदवली, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.

स.नं./हि.नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)	भोगवटाधारकाचे नाव
३२/३	०.३३.००	१.९३	श्री.अंकुश रमेश मसणे, श्री.पंढरीनाथ वामन बागडे व श्रीमती रूपाली सचिन मुने.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २३/१०/२०२६

सही /-
ॲड. उषा जे. कांबळे.
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर सदनिका माझे अशिल प्रिया विघ्नेश कुडवा यांच्या मालकीची असून सदरची सदनिका विकण्याचे ठरविले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे अलिबाग येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्वे नं ६९७, ६९७/१, ६९७/२, ६९८, ६९८/१. ६९८/२, ६९८/२/के, ६९९, ६९९/१, ६९९/२ तन्मय एन्क्लेव्ह सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ५ क्षेत्र ५७२ चौ. फूट. (५३.१५ चौ.मी.) (बिल्टअप) हि मिळकत.

वर नमूद सदनिकेच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्यपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र - पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची सदनिका निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर सदनिकेशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजुन आमचे अशिल वरील वर्णनाच्या सदनिकेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : २२/१०/२०२६

ॲड. पूजा राकेश ठाकूर
(बी एस सी एल एल बी) आणि
ॲड. रुपिका विजय पाटील
(बी.एल.एस.एल.एल.बी.)
पत्ता : अलिबाग कोर्ट च्या समोर
अलिबाग-रायगड
कॉल : ८२३७५३१४१४

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** उपमुख्य इंजी/कार्य/रत्नागिरी विभागांतर्गत एसएसई/वर्क्स/रत्नागिरी आणि एसएसई/वर्क्स/माणगाव विभागातील स्थानकांवर टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे काम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-वॉटर-28-2026 दिनांक: 23/10/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 19,99,888.00/- (जीएसटी लागू नाही) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 02/11/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 16/11/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 8 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

ई-निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत सापे वामणे स्थानकावरील प्रस्तावित उच्चस्तरीय फलाट क्र. 1 आणि अप्रोच रोडसाठी प्रकाश व्यवस्था करणे व टीआरडी मध्ये आवश्यक बदल करण्याचे काम. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/31/2026 दिनांक 23/10/2026, अंदाजित खर्च** – ₹ 17,33,476/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 34,700/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 13/11/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

Public Notice Exh.-22/D

IN THE COURT OF THE DISTRICT JUDGE, DISTRICT COURT RAIGAD AT ALIBAUG
CIVIL MISC. APPLICATION NO. 24 OF 2024

GAIL (India) Limited .....Applicant
V/s.
Mr. Ramesh Italkar & Ors. .....Respondents
To,

1. Mr. Ramesh Babu Italkar
2. Gyanshwar Harishchandra Hulgunde
3. Maharajadas Ratnmanchand Chopda

All Residing at Village Umbare,
Taluka- Alibag. District Raigad -410203
.... Respondent Nos. 1, 4 and 5.

WHEREAS the abovenamed Applicant has filed a above Misc. Application under section 9 of Petroleum and Minerals Pipeline Act. 1960 for removing of encroachment in the ROU area. The Notices were issued by Hon'ble Court upon you and served through Bailiff have been return unserved by you therefore, the Applicant publishing the notice in the newspaper.

You are hereby notice to appear in this Court in person, or by an Advocate and able to answer all material questions relating to Misc. Application or who shall be accompanied by some person able to answer all such questions to answer and above Misc. Application is fixed on 25th November, 2026 at 11.00am and you are hereby required to take notice that in default of your appearance, the suit will be heard and determined in your absence; and you will bring with you any document in your possession or power containing evidence relating to the merits of the Applicant case or upon which you intend to rely in support of your case.

Given under my hand and the seal of this Hon'ble Court: Dated this 14 day of October, 2026.

sd /- sd /-
Junior Clerk District Court Superintendent District Court
Alibag - Raigad Alibag - Raigad

Public Notice Exh.18/D

IN THE COURT OF THE DISTRICT JUDGE, DISTRICT COURT RAIGAD AT ALIBAUG
CIVIL MISC. APPLICATION NO.13 OF 2024

GAIL (India) Limited .....Applicant
V/s.
Mr. Naresh Pati & Ors. .....Respondents
To,

1. Mr. Swapnil Sanap
2. Mr. Maruti Shivram Ranjane
3. Mr. Arun Ranjane
4. Mr. Prakash Lakhade
5. Mrs. Pramila Pramod Ghavhale
6. Mr. Shankar Mane

All Residing at Village Vaishet, Syaman Colony
Taluka- Alibag, District Raigad -410203
..... Respondent Nos. 2, 3, 4, 5, 6 and 8.

WHEREAS the abovenamed Applicant has filed a above Misc. Application under section 9 of Petroleum and Minerals Pipeline Act. 1960 for removing of encroachment in the ROU area. The Notices were issued by Hon'ble Court upon you and served through Bailiff have been return unserved by you therefore, the Applicant publishing the notice in the newspaper.

You are hereby notice to appear in this Court in person, or by an Advocate and able to answer all material questions relating to Misc. Application or who shall be accompanied by some person able to answer all such questions to answer and above Misc. Application is fixed on 25th November, 2026 at 11.00am and you are hereby required to take notice that in default of your appearance, the suit will be heard and determined in your absence; and you will bring with you any document in your possession or power containing evidence relating to the merits of the Applicant case or upon which you intend to rely in support of your case.

Given under my hand and the seal of this Hon'ble Court: Dated this 14 day of October, 2026.

sd /- sd /-
Junior Clerk District Court Superintendent District Court
Alibag - Raigad Alibag - Raigad

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं./हि. नं.	क्षेत्र हे. आर. पा.	आकार रू. पै.
१) अखलाक अहमद मोईनुद्दीन सेडोल व १	१७५/५७	५०१.६८ चौ.मी.	५०.१६

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्री. श्यामराव भिकोबा ढमाले यांच्या मालकीची मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मिळकती आहेत.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.
६	५	०-१७-७०	०-१९

सदर मिळकतीच्या आमचे अशिलांच्या मालकीबाबत अथवा अन्य कोणत्याही हक्काबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून दहा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजणेत येईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :-२३/१०/२०२६

ॲड. सी. बी. ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेंट,
महावीर पेठ, स्टेशन रोड कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. सुनिल ढिलीवाल, श्री. सुनिलकुमार तिवारी यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.बाळु बारकु सावंत, श्री श्रीराम बारकु सावंत, श्री. सुरेश बारकु सावंत, श्री. कुसम काशिनाथ ठोंबरे, सौ. कुंदाबाई संभाजी बांगर, सौ. मंदाबाई संभाजी हाडप, श्रीमती गंगुबाई बारकु सावंत, सौ. शांतीसिंग तरुणसिंग चौहान यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे कामतपाडा, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २२/२/ब यांचे एकुण क्षेत्र १.१८.५० गुंठे पैकी ०.९८.५० मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २२/१०/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की,

माझे अशिलांचे सुचनेनुसार मी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे (सदर मिळकती विद्यमान मालक श्री. शशिकांत केशव म्हात्रे यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध माझे अशिलांनी विद्यमान असल्याबाबत तपास/खात्री करणेची प्रक्रिया चालु केली आहे. मालकांकडून सदर मिळकती खरेदी घेण्याबाबतची बोलणी चालु केली आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेती मिळकतीचे वर्णन

अ.क्र.	भूमापन व उपविभाग क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पै.
१.	२२८	००-५९-२० पैकी ०-३९-२०	१३.३७ ८.५४

वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तींचा कंपनीचा, मर्यादित दायीत्व भागिदारी संस्था, भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, बिगर बँकींग वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, परस्पर सामंजस्याचा करार, करार, हुकुमनामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, हरवलेल्या दस्तांमार्फत, ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर २१ (एकविस) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून मिळकतींच्या खरेदी व्यवहाराची बोलणी पुर्ण करुन खरेदीखत करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. २२/१०/२०२६.

सही
ॲड. संपदा मनोज पाटील
शॉप नं. ११, भास्कर को. ऑप. हौसि. सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९२२५५६६०४३.

पालीत कचऱ्याची गंभीर समस्या

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. नगरपंचायत मार्फत शहरांमध्ये घंटागाड्या फिरून देखील काही नागरिक भर वस्तीत रस्त्याच्या कडेला कचरा टाकत आहेत. परिणामी घाण आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पालीतील कचरा समस्येवर मात करण्यासाठी काही वर्षांपूर्वी घंटा गाड्या सुरू करण्यात आल्या. सध्या पुरेशा घंटागाड्या कार्यरत आहेत. या घंटागाड्या येथील विविध भागात दररोज निश्चित वेळेत फिरून कचरा गोळा करतात. आठवड्यातून एकही दिवस सुट्टी घेतली जात नाही. अगदी दिवाळीत देखील घंटागाडी नियमित येत होती. मात्र तरीही अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग पडलेले असतात. प्रमुख्याने बल्लाळेश्वर नगरकडे जाणारा मार्ग, जिल्हा परिषद शाळा, आदिवासी समाज भवन शेजारी व त्यापुढे, मधली आळी, राम आळी जुने पोलीस स्थानक, आगर आळी, भाग्यश्री प्लाझा आदी ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्यात येतो. घंटागाडी कचरा घेऊन गेल्यानंतर झालेला कचरा काही दुकानदार आणि अनेक नागरिक घरात किंवा सोयटीमध्ये साठवून न ठेवता लागलीच रस्त्यावर टाकतात. तर काहीजण दिवसभर घरी नसल्यास जमा झालेला कचरा रस्त्याच्याकडेला टाकून देतात. परिणामी कचऱ्याची समस्या जैसे थेच राहते.



- **घंटागाड्या असूनही कचरा उघड्यावर**
- **दुर्गंधीमुळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर**

> पाली नगरपंचायतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पाली शहर कचराकुंड्या मुक्त केले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी आपला कचरा हा येणाऱ्या घंटा गाडीतच टाकावा. जेणेकरून आपले शहर स्वच्छ व सुंदर राहील. हटविण्यात आलेल्या कचरा कुंडीच्या ठिकाणी किंवा इतरत्र कुठेही कोणी कचरा टाकताना आढळल्यास घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार दंडात्मक कारवाई देखील करत आहोत.
> -सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली नगरपंचायत

यामुळे नागरिकांसह भाविकांचे आरोग्य देखिल धोक्यात आले आहे. भटके कुत्रे व जनावरे हा कचरा अस्ताव्यस्त करतात. तसेच गुरे-ढोरे व भटके कुत्रे यातून अन्न शोधण्यासाठी जातात आणि हा सर्व कचरा व घाण रस्त्यावर व बाजुच्या गटारात पडून गटारे तुंबून आणखी समस्या उद्भवते.

नागरिकांना कचरा विलगीकरणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. तसेच कचरा संकलित करताना ओला, सुका, घरगुती, घातक, प्लास्टिक, जैव वैद्यकीय व इलेक्ट्रॉनिक कचरा असे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे असे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

सूचना फलकांकडे दुर्लक्ष

ज्या ज्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जातो त्या ठिकाणी नगरपंचायत च्या माध्यमातून सूचना व माहिती फलक लावण्यात आले आहेत. त्याबरोबरच जे या ठिकाणी कचरा टाकतील त्यांच्यावर कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल हे देखील या फलकांवर नमूद केले आहे. मात्र नागरिक या फलकांकडे दुर्लक्ष करून त्याच्या आजूबाजूलाच कचरा टाकताना दिसत आहेत. काही ठिकाणचे माहिती व सूचनाफलक फाटले देखील आहेत.

घातक कचरा रस्त्याच्या कडेला टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामध्ये दारूच्या व बियरच्या बाटल्या तसेच घरगुती सामान देखील टाकण्यात येते. या फुटलेल्या दारूच्या बाटल्या प्लास्टिक जनावरे, कुत्रे तसेच माणसांच्या पायाला लागून इजा झाल्या आहेत. या उकिरड्यावर गुरेढोरे व कुत्रे कायम असतात. त्यांच्या पोटामध्ये येथील घातक पदार्थ आणि प्लास्टिक देखील जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात त्यांच्या आरोग्यावर देखील परिणाम होतो.

निवडक

नेरळमधील दिव्यांगांची दिवाळी गोड



नेरळ : ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या नोंदणीकृत ७१ दिव्यांग लाभार्थींच्या बँक खात्यात पैसे जमा केले आहेत. त्यामुळे दिव्यांगांचा दिवाळी सण गोड होणार आहे. ग्रामपंचायत वार्षिक आराखड्याचे पाच टक्के रक्कम ही दिव्यांगांच्यावर खर्च करणे ग्रामपंचायत अधिनियम नुसार बंधनकारक आहे. त्यात ग्रामपंचायतीकडे नोंद असलेली लाभार्थ्यांना ५० टक्के वैयक्तिक लाभ तर ५० टक्के सामूहिक लाभ द्यावा लागतो. ग्रामपंचायतचे वार्षिक महसुलाचे १५ लाख रुपये हे पाच टक्के नुसार दिव्यांगांवर खर्च केले जाणार असल्याचे प्रशासक उज्ज्वला भोसले यांनी दिली. नोंदणीकृत असलेल्या ७१ लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभ देण्याचा सोहळा बापुराव धारप सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

ऑक्टोबर हीटमुळे रसवंतीगृहांवर गर्दी

पनवेल : ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा तडाखा वाढू लागल्याने पनवेलशहरांसह ग्रामीण भागातील रस्त्यांवर रसवंतीगृहे फुलली आहेत. उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिक थंडगार उसाच्या रसाला पसंती देत असल्याने रसविक्रेत्यांच्या व्यवसायाला वेग आला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांपासून ग्रामीण भागातील गावखेड्यांपर्यंत हातगाड्यांवर उसाचा रस विकणारे व्यावसायिक दिसत आहेत. काही जण कायमस्वरूपी रसवंतीगृहे चालवतात, तर अनेक तरुण आणि लहान व्यावसायिक उन्हाळ्यातील हंगामी व्यवसाय म्हणून या क्षेत्रात उतरतात. त्यामुळे रसविक्रीच्या माध्यमातून अनेकांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. उसाच्या रसात लिंबू आणि काळे मीठ घालून दिला जाणारा रस ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहे. काही ठिकाणी लहान ग्लास २० रुपये, तर बर्फ न घातलेल्या रसाचा ग्लास ३० रुपये भावाने विकला जात आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने दुपारच्या वेळी रसवंतीगृहांवर ग्राहकांची गर्दी होत आहे. एकीकडे ऑक्टोबर हीटमुळे उसाच्या रसाची मागणी वाढली असताना, दुसरीकडे वाढत्या खर्चामुळे विक्रेत्यांसमोर आर्थिक आव्हान उभे राहिले आहे. तरीही उकाड्यापासून तात्पुरता दिलासा देणाऱ्या उसाच्या रसाला नागरिकांची पसंती कायम असून, रसवंतीगृहांच्या माध्यमातून हंगामी रोजगारालाही चालना मिळत आहे.



मॉडिफाइड सायलेंसरचा चक्काचूर



पनवेल : दुचाकींमध्ये अनधिकृतरीत्या बसविण्यात येणाऱ्या मॉडिफाइड सायलेन्सरमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान जप्त करण्यात आलेले १११ मॉडिफाइड सायलेन्सर तोडून नष्ट करण्यात आले. ध्वनीप्रदूषणाचे प्रतीक म्हणून रावणाची प्रतिकृती तयार करून या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.मॉडिफाइड सायलेन्सरमुळे निर्माण होणाऱ्या कर्णकर्कश आवाजाचा ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी आणि रुग्णांना त्रास सहन करावा लागतो. ही समस्या रोखण्यासाठी तसेच वाहनांमध्ये अनधिकृत बदल करणाऱ्यांना प्रतिबंध घालण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.पोलीस उपायुक्त वाहतूक डॉ. राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्या पुढाकाराने ही कारवाई करण्यात आली.या वेळी सहायक पोलीस आयुक्त वाहतूक योगेश गावडे, पोलीस निरीक्षक महेश सरतापे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, सहायक पोलीस निरीक्षक सविता भागवत, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम कदम, वाहतूक शाखेचे कर्मचारी, नगरसेवक राजू सोनी तसेच पनवेल विभागातील पत्रकार उपस्थित होते. वाहनांमध्ये अनधिकृत मॉडिफाइड सायलेन्सर बसवू नयेत, कर्णकर्कश आवाज करणाऱ्या उपकरणांचा वापर टाळावा आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले. 'ध्वनीप्रदूषणाला आळा घाला, शांत आणि सुरक्षित पनवेल घडवा!' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. ध्वनीप्रदूषणमुक्त शहरासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले.

बाळाराम पाटील यांच्या हस्ते 'रोडमॅप' पुस्तकाचे प्रकाशन

| पनवेल | प्रतिनिधी |

दहावी आणि बारावीच्या परीक्षांनंतर पुढील शिक्षणासाठी योग्य अभ्यासक्रमाची निवड करता यावी, या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या 'रोडमॅप' या मार्गदर्शक पुस्तकाचे माजी आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

विचुंबे येथे शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत साई संदेश वेल्फेअर असोसिएशनच्या नवरात्रोत्सवात हा सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमासाठी आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन पुरुषोत्तम भोईर यांनी पुढाकार घेतला. प्रकाशन सोहळ्यात माजी आ. बाळाराम पाटील यांनी पुरुषोत्तम भोईर यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

या पुस्तकातील मजकुराचे संकलन ज्येष्ठ पत्रकार मंदार दोंदे यांनी केले असून, नवी मुंबईतील प्रिंट ऑन सोल्युशन्सचे संचालक प्रशांत चातुर्य यांनी पुस्तकाची छपाई केली आहे.



> केवळ रस्ते आणि पायाभूत सुविधांची उभारणी म्हणजे गावाचा सर्वांगीण विकास नव्हे. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, अध्ययनक्षमता आणि शैक्षणिक प्रगती वाढविण्यासाठी केलेले प्रयत्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडीनुसार शिक्षण घेऊन करिअर घडवावे, या प्रामाणिक भावनेतून सहकाऱ्यांच्या मदतीने पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. -पुरुषोत्तम भोईर
> चेअरमन आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल

आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल, विचुंबे येथे दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र दाखवून पुस्तकाची प्रत विनामूल्य मिळणार आहे.

या सोहळ्यास पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवेंद्र मढवी, उपसभापती सुनील सोनावळे, संचालक देवेंद्र पाटील (देवा), प्रणाली भोईर, सतीश म्हात्रे, समीर दुंदरे, अतुल भोईर, धनश्री भोईर, संचिता पाटील, करुणा म्हात्रे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बॅटऱ्यांच्या चोरीप्रकरणी तरुण ताब्यात

पनवेल : विठ्ठलवाडी मंदिर परिसरातील मैदानातं दोन हायवा डम्परच्या चार बॅटऱ्या चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अक्षय राठोड याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ६२ हजार रुपये किमतीच्या चार बॅटऱ्या हस्तगत करण्यात आल्या.रात्रीच्या सुमारास विठ्ठलवाडी, आवटी मैदान, आवळेगाव परिसरात ही चोरी झाली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, साईनाथ मोकल, आदीने तांत्रिक माहिती आणि तपासाच्या आधारे आरोपीला ताब्यात घेत चारही बॅटऱ्या हस्तगत केल्या.

महानगर गॅस लिमिटेड

PNG DRIVE 3.0

घरगुती पीएनजी जोडण्यांसाठी मनुष्यबळ हवे आहे

पाईप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) जोडण्यांचा विस्तार करण्यासाठी आणि पीएनजी ड्राईव्ह 3.0 च्या भारत सरकारच्या (MoPNG) उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी एमजीएल सोबत काम करा.

महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) द्वारा मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि आसपासच्या भौगोलिक क्षेत्रात पाईप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) जोडण्यांचा विस्तार करण्यासाठी अनुभवी उमेदवार आणि सक्षम कंत्राटदारांना आमंत्रित करण्यात येत आहे. घरगुती स्वयंपाकघरांमध्ये जोडण्यांच्या प्रक्रियेचा वेग वाढविणे आणि देशाची स्वच्छ ऊर्जेची गरज पूर्ण करण्यात योगदान देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

आवश्यक मनुष्यबळ: (सुमारे 3000)

अनुभवी कंत्राटदार | प्लंबर्स | मदतनीस | वेल्डर्स | पर्यवेक्षक |
गॅस टेक्निशियन्स/फिटर्स | ग्राहकांकडून डीपीएनजीसाठी नोंदणी मिळवण्यासाठी विक्री प्रतिनिधी

थेट मुलाखत: दिनांक: 24 ऑक्टोबर 2026 ते 31 ऑक्टोबर 2026, वेळ: सकाळी 10:00 ते सायंकाळी 6:00,

ठिकाण: खाली नमूद करण्यात आलेल्या पैकी कोणत्याही कार्यालयात:

एमजीएलच्या कार्यालयांचा पत्ता	संपर्काचा तपशील
महानगर गॅस लिमिटेड, मयूर पंख 2, क्रॉस रोड, वेलकम हॉटेलजवळ, दत्तपाडा, बोरीवली (पूर्व), मुंबई.	8369476348
महानगर गॅस लिमिटेड, युनिट क्र. 100ए आणि 101, बिल्डिंग क्र. 1, सॉलिटायर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई.	7666961965
महानगर गॅस लिमिटेड, युनिट क्र. 66, सूनैजी मॅन्शन, तळमजला, फॉरजेट स्ट्रीटजवळ, ऑगस्ट क्रांती मैदानासमोर, गोवालिया टँक, ग्रँट रोड, मुंबई.	8657942591
महानगर गॅस लिमिटेड, युनिट क्र. 1005-1010, 10 वा मजला, प्लॉट क्र. 273, सेक्टर 10, कोपरा, खारघर, नवी मुंबई.	8055231885
महानगर गॅस लिमिटेड, प्लॉट क्र. एक्स-5/1, एमआयडीसी महापे, टीटीसी औद्योगिक विभाग, कोपर खैरणे, महापे, नवी मुंबई.	8657975422
महानगर गॅस लिमिटेड, 101 व 102, लँडमार्क आर्केड, पूर्व द्रुतगती महामार्ग, लुईस वाडी, ठाणे	9029128502
महानगर गॅस लिमिटेड, युनिट क्र. 301-302, तळमजला, वेदांत एम्पायर क्लिफ्टन टॉवर सी, साई चौकाजवळ, खडकपाडा, कल्याण पश्चिम.	8169780591
महानगर गॅस लिमिटेड, तळमजला, पे अँड अकाउंट्स बिल्डिंग, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व).	8451055078
महानगर गॅस लिमिटेड, प्लॉट क्र. ए-3/1, एमआयडीसी, जे.के. फाईल्स समोर, मिर्जोले ब्लॉक, रत्नागिरी.	8447503576

उमेदवारांनी सोबत खालील कागदपत्रे आणावीत: वैध ओळखपत्र (आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना इत्यादी), अलीकडील पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे आणि उपलब्ध असल्यास कामाच्या अनुभवाचा तपशील.

टीप: सध्या महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) मध्ये कार्यरत असलेल्या व्यक्ती अर्ज करण्यास पात्र नाहीत. गरजेनुसार आणि उपलब्धतेच्या अधीन राहून राहण्याची सोय केली जाऊ शकते. उमेदवारांना त्यांची कामगिरी, नोकरीचे स्वरूप आणि उद्दिष्टे (टारगेट) पूर्ण करण्याच्या आधारावर दरमहा ₹40,000 पर्यंत कमावण्याची संधी उपलब्ध आहे.

सीनिअर व्हाइस पेसिडेंट (सी अँण्ड पी)

स्वच्छ ऊर्जेतील तुमचा सहकारी. चला, एकमेकांच्या सहकार्याने डीपीएनजीचा विस्तार करूया.

बोकडवीरा ग्रामस्थांचा तहसील कार्यालयावर मोर्चा

| चिरनेर | प्रतिनिधी |

बोकडवीरा गावाशेजारी सिडकोचे सेक्टर ४१ येथे मातीच्या भरावाचे काम सुरू आहे. या विरोधात गुरुवारी उरण तहसील कार्यालयावर बोकडवीरा ग्रामस्थांनी कोटनाका ते तहसीलदार कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. यावेळी कॉ. भूषण पाटील, गोपाळ पाटील, कॉ. रामचंद्र म्हात्रे, हेमलता पाटील आदींची भाषणे झाली. तर बोकडवीरा सरपंच अपर्णा पाटील, गाव अध्यक्ष सूर्यकांत पाटील, सचिव श्रीकांत पाटील, माजी सरपंच मानसी पाटील यांच्या शिष्टमंडळाने उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

या भरावामुळे ग्रामपंचायत हद्दीमध्ये आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत व बचाव कार्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. गावातील नागरिकांच्या जीविताचे व वित्ताचे रक्षण व्हावे. अशी कुठलीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. हे निदर्शनास आणून देण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या.

आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरूस्ती सुरु

| रोहा | प्रतिनिधी |

गेली कित्येक वर्षे रेंगाळलेल्या आंबेवाडी ते निवी कालव्याची सफाई व दुरुस्ती करून कालव्याला पाणी सोडण्याची मागणी उचलून धरत कालव्यासाठी गेली अनेक वर्ष संघर्ष करणाऱ्या बळीराजा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या लढ्याला अखेर यश आले असून कालवा साफसफाई व डागडुजीच्या कामाला अखेर सुरुवात करण्यात आली आहे.

बळीराजा फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, राजेंद्र जाधव, ॲड. दीपक भगत, तुकाराम भगत, महेश कांबळे, शरद जाधव, भूषण मोरे आदी जणांनी पाटबंधारे विभागाचे उप अभियंता सचिन कदम यांची भेट घेऊन कालव्याची माहिती दिली.



पाण्या अभावी शेती व अन्य लघु उद्योगांना मोठा फटका बसत असल्याची सविस्तर माहिती देत डिसेंबर महिन्यात कालव्याला पाणी सोडण्याची लेखी पत्राद्वारे मागणी केली. शेतकरी व बळीराजा फाऊंडेशन या संस्थेच्या मागणीकडे कानाडोळा केल्यास भविष्यात उग्र आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला होता. मात्र याबैठकी नंतर शासकीय यंत्रणा कामाला लागली आणि सोमवारपासून कालवा साफसफाई व डागडुजीच्या कामाला सुरुवात करण्यात आली.



प्रथम क्रमांक

१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक

१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

३२ तासांनंतर देव मंदिरात परतला | पोलीस दलाची पुन्हा सशस्त्र मानवंदना

धावीर महाराज पालखी सोहळ्याची सांगता

| चणेरा | प्रतिनिधी |

रोह्याचे ग्रामदैवत धावीर महाराजांची बुधवारी (दि.२१) रोजी पहाटे सुरू झालेल्या पालखी सोहळ्याची सांगता दुसऱ्या दिवशी गुरुवारी (दि.२२) दुपारनंतर झाली. शहरात फिरून ग्रामस्थांना दर्शन देत आणि गावामध्ये बंधुभेटी करीत ३२ तासांनंतर देव मंदिरात परतले, यावेळी रोहा पोलीस निरीक्षक अभय शेलार व पथकाने महाराजांना पुन्हा सशस्त्र मानवंदना दिली. महाआरती आणि सेवेकऱ्यांचे मानपान कार्यक्रमानंतर पालखी उत्सवाची सांगता झाली.



उत्सवात सेवेकरी युवा वर्ग आणि तरुणांनी अथक, अखंडित आणि अविश्रांत परिश्रम घेतले. एका कुटुंबातील सोहळ्याप्रमाणे अवघ्या गावाचा एक आगळा वेगळा उत्सव असलेल्या या उत्सवात पालखी बरोबर हजारो भक्तगणांनी रात्र जागून काढली.

समेळ वाद्य, हळगी, खालुबाजे, झांज पथके, ताशे, चेंबूर, अलिबाग, कल्याण आणि रोहा येथील वाद्य, नगारे पथकांनी या उत्सवाची शोभा वाढविली.

यावेळी परंपरे नुसार मंदिर ट्रस्ट आणि उत्सव समितीकडून रायगड पोलीस, महसूल विभाग, रोहा नगर पालिका, महावितरण विभाग, उत्सवाचे मानकरी आर्दीसह एकतीस तास पालखी उत्सवात अखंडपणे विविध प्रकारे सेवा देणाऱ्या सेवेकऱ्यांना प्रसादाचे नारळ भेट देत त्यांचे सन्मान करण्यात आले.

अविश्रांत सेवा

पालखी सोहळ्यात उत्सव समितीतील काही पदाधिकारी, गावातील तरुण सेवेकरी आणि धावीर भक्तांनी ३२ तास पालखी समवेत अनवाणी पायाने आपली सेवा रुजू केली, पालखीसाठी विविध सेवा देणाऱ्या काहींसह मोठ्या संख्येने तरुण यामध्ये सहभागी झाले होते. दोन दिवस कडक उन्हात कशाचीही तमा न करता ही मंडळी पालखी समवेत सेवा देत होती, काहींच्या पायांना छोट्यामोठ्या जखमाही झाल्या, परंतु या तरुणांनी धावीर महाराजांचा जयघोष करीत पालखी दरम्यान, आपली अखंडित आणि अविश्रांत सेवा रुजू केली.

कोपऱ्यात कोणी ढकलले?

महाराष्ट्रासमोर सध्या दुष्काळापेक्षाही भयंकर समस्या उभी राहिली आहे. ही समस्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसाहेबांसंबंधी आहे. एक बरे झाले की, शिंदे यांनीच तिला वाचा फोडली. मला कोपऱ्यात कोणी ढकलले असा आर्त, हृदयभेदी सवाल एकनाथरावांनी परवा केला. त्याचे असे झाले. शिंदे सेनेचा यंदाचा दसरा मेळावा गोरेगावच्या नेस्को मैदानावर झाला. एरवी अशा मैदानी सभांमध्ये बोलणाऱ्या वक्त्याचे व्यासपीठ मधोमध असते, जेणेकरून तो सर्वांसमोर राहतो. यंदा मात्र ही जागा एकूण व्यासपीठाच्या एका कोपऱ्यात होती. बंदिस्त हॉलमध्ये शंभर दोनशे लोक असतात तेव्हा ती रचना ठीक असते. पण यंदाच्या रचनेमुळे एका बाजूच्या लोकांना शिंदे दिसत नव्हते. केवळ त्यांचा आवाज ऐकू येत होता. तर खुद्द शिंदे यांनाही ते एका बाजूचे लोक दिसत नव्हते. यामुळे एकनाथराव संतप्त झाले व भाषणाच्या शेवटी त्यांनी हा कोण आयोजक आहे, ज्याने मला कोपऱ्यात ढकलले आहे, असा प्रश्न केला. त्यावेळपर्यंतचे शिंदे यांचे भाषण नेहमीच्याच पध्दतीने चालले होते. त्यात नवीन काहीच नव्हते. म्हणजे, शिंदेसाहेब स्वतःच्या पक्षाच्या कार्यक्रमाविषयी एक शब्दही बोलत नव्हते. अर्थात शिंदेसेनेचा स्वतःचा असा वेगळा कार्यक्रम काय आहे हे एकनाथ किंवा श्रीकांत शिंदे यांना एरवीही सांगता येणार नाही ही गोष्ट वेगळी. तर शिंदेसाहेब परवाही आपल्या भाषणात राहुल गांधींवरच अधिक टीका करीत होते.ज्या बाजूच्या प्रेक्षकांना शिंदे दिसत नव्हते त्यांनाही ते हे सगळे दिल्लीकडे पाहून बोलत आहेत हे मनातल्या मनात दिसत होते. ज्यांना शिंदे दिसत होते त्यांना तर हे सगळे भाजपच्या व्यासपीठावरून चालले आहे असे मनातल्या मनात वाटत होते. अर्थात, शिंदे दिसत असलेल्या आणि नसलेल्या शिंदे-सैनिकांना एक गोष्ट पक्की ठाऊक आहे. आपल्या सगळ्यांची नोकरी-चाकरी आणि मजुरी भाजपच्या मर्जीवर अवलंबून आहे आणि भाजपचा पट्टा गळ्यात आहे तोवरच आपल्याला पकडायला एखादी गाडी येऊ शकणार नाही ही ती गोष्ट. त्यामुळे सगळे रुटीन चालू असतानाच शिंदे यांनी तो सवाल केला आणि बाँबगोळा पडल्यासारखे झाले. आपल्या गळ्यातला पट्टा तुटला की काय अशी भीती बहुतेकांना वाटून गेली.

घरातूनच दणके

गेल्या विधानसभा निवडणुकीपर्यंत सर्व काही ठीक चालले होते. भगतसिंग कोश्यारींसारखे तुम्हाला हवे तसे अधिवेशन बोलावून देणारे राज्यपाल होते. खटल्याची सुनावणी महिनोमहिने चालूच राहील अशी न्यायालयातली व्यवस्था होती. येता जाता तारीफ करणारे जरांगे होते. देवा नावासमोर भाऊ असा शब्द जोडून कोणी कितीही बॅनर्स लावण्याचा प्रयत्न केला तरी लाडक्या बहिणींचे भाऊ आपणच आहोत असे वाटून घ्यायची सोय होती. अजित पवारांपेक्षा आपणच दिल्लीचे आवडते आहोत असेही मानायची अमित शहा यांची परवानगी होती. पण निवडणूक निकालात अघटित घडले. भाजपला जास्त जागा मिळाल्या. इतक्या की, भाजपला शिंदे सेनेची गरजच उरली नाही. तिथपासून लाडक्या साहेबांचे मार्केट डाऊन झाले. सांदिपान भुमरे, संजय शिरसाट यांच्या संबंधितांवर कारवाया झाल्या. खुद्द ठाण्यामध्ये शिंदेसेनेला पालिकेत ठाणबंद करण्याचा प्रयत्न झाला. रिंग रोडसारख्या प्रकल्पांना विरोध झाला. पालिकेत एकतर्फी समित्या स्थापन करण्यात भाजपच्या लोकांनी विरोध केला. त्यामुळे स्थायीसारख्या समित्या निवडणुकीनंतरही बराच काळ स्थापन होऊ शकल्या नव्हत्या. तिकडे नवी मुंबईत भाजपच्या गणेश नाईकांनी शिंद्यांच्या नगरसेवकांना सामावून घ्यायचे नाही असा पवित्रा घेतला. उल्हासनगरामध्ये तर शिंदे सेना आणि भाजप यांच्यातला वाद हाणामारीपर्यंत गेला. कोर्टबाजीही झाली. तिकडे दिल्लीत शिंदे यांना भेटी मिळत राहिल्या तरी राज्यात पध्दतशीर बाजूला ठेवणे सुरू झाले. मग शिंदे नाराज होऊ लागले. वारंवार दरे या आपल्या गावी जाऊ लागले. अगदी परवाच दुष्काळाच्या मदतीसाठीचे केंद्रीय पथक आले होते. त्याने आपले अहवाल केवळ मुख्यमंत्र्यांना सादर केला. त्यावेळी ना शिंदे हजर होते ना सुनेत्रा. सुनेत्रावहिनी आणि त्यांचा पक्ष तसाही आता खिजगणतीत उरलेला नाही. त्यात पार्थ पवारांचा पुण्यातील जमीन घोटाळा हे धमकी द्यायला चांगले प्रकरण आहे. या प्रकरणात पार्थ यांच्यावर गुन्हा का नोंदलेला नाही असा सवाल न्यायालयाने केला होता. शिवाय पक्षातच भाजपला फितूर असलेले 'भंडारा'वाले आणि भाजपशी म्होतूर लावायला उत्सुक असलेले 'रायगड'वाले यांचा धोका मोठा आहे.

पट्टा तोडावा लागेल

अमित शहा यांनी पुढच्या निवडणुका भाजप स्वबळावर लढणार असे परस्पर जाहीर केले आहे. पक्षचिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येऊ घातला आहे. बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे चिन्ह गोठवले तसे महाराष्ट्रात का केले गेले नाही असा प्रश्न येणार आहे. निवडणूक आयोग आणि त्याचे लाभार्थी शेकून निघण्याची भरपूर शक्यता आहे. साहेबांच्या नगरविकास खात्याशी संबंधित बैठकीलाही परवा साहेब हजर नव्हते अशा बातम्या आल्या होत्या. त्यावर साहेबांना खुलासा करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर अचानक मला कोपऱ्यात कोणी ढकलले असा आर्त सवाल आला तेव्हा शिंदे दिसत नसलेले शिंदेसैनिक खडबडून जागे झाले. आता अखेर साहेब मराठी बाणा दाखवणार, थेटपणे कोपऱ्यात ढकलणाऱ्यांची नावे सांगणार आणि त्यांच्यावर तुटून पडणार असे त्यांना वाटले. पण साहेबांचे (भाषणातले) शब्द संपले होते हे त्यांना दिसत नव्हते. मग एकदम सन्नाटा पसरला आणि काही वेळाने सभा आणि सगळे काही संपले आहे याची जाणीव त्यांना झाली. शिंदे ज्यांना दिसत होते त्यांच्यासाठी तर सगळे काही डोळ्यादेखतच चालू होते. साहेबांना कोपऱ्यात ढकलले गेले आहे हे त्यांना दिसत होतेच. रोज तेच आणि आपल्या दसरा मेळाव्यात तेच असे ते मनातल्या मनात म्हणाले देखील. अखेर साहेबांनीच वाचा फोडली तेव्हा मात्र साहेबांनी आणखी बोलायला हवे असे त्यांना वाटले. पण शिंदे यांचे लिहून दिलेले शब्द संपले होते. उद्धव ठाकरे आणि राहुल यांच्यावर टीकेचा ठराविक कोटा पूर्ण झाला होता. आता साहेब काही बोलू शकत नव्हते. गंमत पाहा. दसरा मेळाव्याचे व्यासपीठ कोणी उभारले आणि वक्त्याची जागा कोपऱ्यात कोणी टाकली हे सगळ्यांना ठाऊक आहे. पण त्याचे नाव घ्यायला कोणी तयार नाही. खुद्द साहेबांनीही त्याचा उद्धार केला. पण नाव मात्र घेतले नाही. साहेबांना महाराष्ट्राच्या कोपऱ्यात कोण ढकलत आहे हे तर शिंदे सैनिकांनाच नव्हे तर तमाम मराठी जनांना ठाऊक आहे. साहेबांना तर ते नक्कीच ठाऊक आहे. पण त्यांचेही नाव ते घेत नाहीत. आज ना उद्या ते कदाचित घ्यावे लागेलच. ते घेताना गळ्यातला एक पट्टा काढून टाकावा लागेल. पण दुसरा कोणता पट्टा येऊन पडेल? सांगता येत नाही. त्यापेक्षा मग आहे तो पट्टा आणि

विचार

आरोपांचे 'ग्यान' आणि विरोधकांचे भान

दोन निवडणूक आयुक्तांचे आक्षेप धाब्यावर बसवून मुख्य आयुक्त ज्ञानेशकुमार सरकारधार्जिणा कारभार करत असल्याचा आरोप गेल्या काही दिवसांमध्ये समाजात वेगाने पसरला. आता जबाबदारी वास्तव तपासण्याची आहे. विरोधी पक्षांनी आरोपांची राळ उडवण्यापेक्षा नेमक्या त्रुटी शोधून देशापुढे मांडण्यासाठी प्रयत्न न केल्यास तक्रारी, आरोप, कमकुवत पुरावे आणि प्रत्यक्षात काहीच न घडणे ही मालिका तशीच सुरु राहील.



महेश जोशी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात विरोधी पक्ष एकजुटीने एका आवाजात बोलत आहेत. केंद्र सरकारचे बाहुले म्हणून कारभार करत असल्याचा त्यांच्यावर आरोप होत आहे. विरोधी पक्ष संपवण्यासाठी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांचा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त आपल्या पदाचा गैरवापर करत असून केंद्र सरकारला पाहिजे ते निवडणूक आयोगाच्या माध्यमातून साध्य केले जात आहे. जनतेमध्ये नाराजी असतानाही लागोपाठ पार पडणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपाचे उमेदवार निवडून येत आहेत. गेली काही वर्षे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी निवडणुकीत व्होट चोरी झाल्याचा आरोप सातत्याने करत आहेत. मात्र सुखबीरसिंग संधू व विवेक जोशी या दोन निवडणूक आयुक्तांनीच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मनमानी, पक्षपाती आणि एकतर्फी कारभारावर वारंवार आक्षेप घेतल्याचे उघडकीस आल्याने ज्ञानेशकुमार हे संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मतदार पुनर्रचना नोंदणी (एसआयआर) मध्ये देशातील तेरा कोटी मतदारांची नावे वगळण्यात आल्याने आयोगाविरोधात रस्त्यावर असंतोष प्रकटला आहे. 'ज्ञानेशकुमार हटाव' अशी मोहीम देशभर सुरू आहे. ज्ञानेशकुमार यांना अटक करा, ज्ञानेशकुमार यांना जेलमध्ये पाठवा अशा घोषणांचे फलक फडकू लागले आहेत, दोन्ही निवडणूक आयुक्तांनी दहा महिन्यांमध्ये घेतलेल्या चौदा आक्षेपांबाबत आयोगाची भूमिका काय आहे किंवा व्होटचोरीचा आरोप होत असताना आयोगाचे म्हणणे काय आहे, हे सांगण्यासाठी स्वत: ज्ञानेशकुमार पुढे आले नाहीत. मात्र भाजपाचे प्रवक्ते ज्ञानेशकुमारांचे समर्थन करण्यासाठी पुढे सरसारवले आहेत. विरोधी पक्षांचा निवडणुकीत सलग पराभव होत असल्याने नैराश्येतून ते मुख्य निवडणूक आयुक्तांवर आरोप करत असल्याचा युक्तीवाद भाजपा करत आहे.

थोडे इतिहासात जाऊन पाहिले असता मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात यापुर्वी कधीही देशभर असंतोष भडकलेला दिसला नव्हता, असे लक्षात येते. निवडणूक आयोगाच्या मदतीमुळेच भाजपा केंद्र आणि अन्य राज्यांमध्ये सत्ता काबीज करतो असे गंभीर आरोप होत आहेत. दया, कुछ तो गडबड है, अशी आम जनतेत उघड चर्चा ऐकायला मिळत आहे. दरम्यान, निवडणूक आयुक्तांवर गुन्हा दाखल करता येणार नाही, खटला भरता येणार नाही किंवा अटक होऊ शकत नाही, असा कायदाच केंद्र सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये संसदेत मंजूर केला.

त्यावेळी लोकसभेत काही बेरोजगार तरूणांनी गॅलरीतून सभागृहामध्ये उड्या मारून गोंधळ निर्माण केला होता. हे तरूण कोण होते, ते आतमध्ये कसे आले, संसदेची सुरक्षा व्यवस्था काय करते अशा प्रश्नांद्वारे विरोधकांनी तेव्हाही कामकाज रोखून धरले होते. लोकसभेचे अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला आणि सभापती जगदीप धनखड यांनी लोकसभा आणि राज्यसभा मिळून विरोधी पक्षाच्या १४६ खासदारांना निलंबित केले होते. विरोधकांची पुरेशी संख्या नसताना सरकारने निवडणूक आयुक्तांना कायदेशीर संरक्षण देण्याचा कायदा संमत करून घेतला. मुख्य निवडणूक आयुक्तांवर गुन्हाच दाखल करता येणार नसेल तर त्यांना अटक कशी होईल आणि जेलमध्ये कसे पाठवता येईल, असा प्रश्न या निमित्ताने समोर आला. म्हणूनच राहुल गांधी त्यांना राजीनामा देऊन माफीचे साक्षीदार व्हा, असे आवाहन करताना दिसले.

ज्ञानेशकुमार हे गृहमंत्री अमित शहा यांच्या निकटचे मानले जातात. ते केरळ केडरचे १९८८ च्या बॅचचे आयएएस आहेत. फेब्रुवारी २०२६ मधे त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. केंद्रीय गृहसचिव, सहकार सचिव ते मुख्य निवडणूक आयुक्त अशी त्यांची वाटचाल आहे. निवृत्तीनंतर लगेचच निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची मार्च २०२४ मध्ये नेमणूक झाली. आणि दुसऱ्याच दिवशी लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले. वर्षभरात ते मुख्य निवडणूक आयुक्त झाले. जम्मू काश्मीर पुनर्रचना विधेयकाचा मसुदा तयार होत असताना ते गृह मंत्रालयात जबाबदारीच्या पदावर होते. पूर्वी निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीच्या समितीवर सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नेमणूक केलेली होती, सरकारने कायदा करून त्यांना हटवले आणि त्यांच्या जागी एक केंद्रीय मंत्री असेल, अशी तरतूद केली. वास्तवात केंद्रीय मंत्री पंतप्रधानांच्या मनाविरूध्द मत मांडणे शक्य तरी आहे का, याचा विचार या ठिकाणी केला गेला नाही. ज्ञानेशकुमार यांच्या नियुक्तीला राहुल गांधींनी विरोध केला होता, पण त्यांच्या विरोधाला विचारतो कोण, अशी परिस्थिती आहे.

दरम्यान, देशभर एसआयआर सुरू करण्याचा आदेश कुणाचा हे मोठे गूढ बनले. हा आदेश आमचा नव्हे, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. मग कोट्यवधी रूपये खर्च करून मतदार पुनर्रचना यादी कशासाठी तयार केली जात आहे? यापुर्वी एसआयआर केव्हा झाले व किती नावे वगळण्यात आली याची यादी आयोग जाहीर करील का? या प्रक्रियेद्वारे तेरा कोटी मतदारांना मतदानापासून वंचित ठेवले आहे, याबद्दल आयोगाला तसेच सरकारला काहीच वाटत नाही का? २००२ मध्ये आई-वडिलांनी किंवा आजी-आजोबांनी मतदान केल्याचे पुरावे आणायचे कुठून, हा निकष कोणाच्या सुपीक डोक्यातून निघाला, एसआयआरमधून किती घुसखोर बांगलादेशी सापडले, कितीजणांना परत पाठवले असे प्रश्न उपस्थित झाले. महाराष्ट्रात दोन कोटी मतदार बाद झाले आहेत. आधार कार्ड, रेशन कार्ड आणि निवडणूक ओळखपत्र असताना, गेल्या काही निवडणुकांमध्ये मतदान केले असताना मतदारांचे नाव बाद का व्हावे? विशेष म्हणजे भाजपाचे संस्थापक लालकृष्ण अडवाणी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचीही नावे यादीतून गायब आहेत. कार्यपध्दतीवरून निवडणूक आयोग दुभंगला आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायमूर्तींनी कामकाज प्रणालीवर नाराजी दर्शवत पत्रकार परिषद घेतली होती. २०२६ मध्ये दोन निवडणूक आयुक्तानी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतले आहेत. या पार्श्वभूमीवर ताज्या घडामोडींमुळे आम जनता अचंबित आहे.

आज देशातील मिडिया सपक आणि मिळमिळीत झाल्याची तक्रार सतत ऐकायला मिळते. आज पत्रकारीतेची 'गोदी मिडिया' म्हणून टिंगलटवाळी होत आहे. वृत्तपत्राचा खप घसरला असून टीव्ही वृत्तवाहिन्यांचे प्रेक्षक याच कारणांमुळे कमी झाले आहेत. सर्वत्र एकसुरी आणि गुळगुळीत बातम्या पहायला मिळत आहेत. अशा वातावरणात इंडियन एक्सप्रेसच्या दिल्लीच्या पत्रकार रितिका चोप्रा यांनी निवडणूक आयोगाच्या कारभाराचे पितळ उघडे पाडून मोठा भूकंप घडवला. त्यांच्या शोधपत्रकारितेने मिडियाला नवे खाद्य दिले. तीनही निवडणूक आयुक्तांना समान अधिकार असताना दोन आयुक्तांचे आक्षेप धाब्यावर बसवून आणि अंधारात ठेऊन मुख्य आयुक्त ज्ञानेशकुमार कसा मनमानी आणि सरकारधार्जिणा कारभार करत आहेत, याची कथित पोलखोल रितिका यांनी केली. सोशल मिडिया आणि सामान्य जनतेतून रितिकावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे. यापुर्वी सुचेता दलाल (हर्षद मेहता प्रकरण), तनुश्री पांडे (हाथरस अत्याचार व हत्या), ग्रीष्मा कुठार (मणिपूर असंतोष), ज्योती यादव (कोविडकाळात स्थलांतरीतांचे झालेले हाल), पूनम अग्रवाल (इव्हीएम घोटाळा), सुकन्या शांता (भारतीय तुरुंगातील दुरावस्था), जतिंदर कौर (लष्करातील भ्रष्टाचार) अशा महिला पत्रकारांनी शोधपत्रकारीतेत लौकीक कमावला आहे. सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्षांना जमले नाही, ते या महिला पत्रकारांनी करून दाखवले. आता जबाबदारी वास्तव तपासण्याची आहे. विरोधी पक्षांनी आरोपांची राळ उडवण्यापेक्षा नेमक्या त्रुटी शोधून देशापुढे मांडण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसे न झाल्यास तक्रारी, आरोप, कमकुवत पुरावे आणि प्रत्यक्षात काहीच न घडणे ही मालिका तशीच सुरु राहील.

चर्चा आजची

पाणी नियोजन आणि व्यवस्थापनाची गरज

सुयोग आंग्रे

नवी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या भारत आंतरराष्ट्रीय जल सप्ताहाने अनेक महत्त्वाच्या उपक्रमांवर प्रकाश टाकला. यामध्ये नद्यांमधील मॅक्रो प्लॅस्टिकचे निरीक्षण करण्यासाठी नवीन प्रोटोकॉल, सिंचन मॅपिंग आणि विविध जलस्रोतांचे मॅपिंग आणि सिंचन प्रकल्प यासारख्या प्रयत्नांचा समावेश आहे. भारताला हवामान बदलाच्या अनुषंगाने लवचिक आणि शाश्वत जल व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याची गरज आहे. काही ठिकाणी पाण्याचे प्रदूषण कमी झाले आहे, त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी कमी झाले आहे. काही भागात प्रदीर्घ दुष्काळामुळे पाण्याची उपलब्धता सतत कमी होत आहे, त्यामुळे इतरत्र, अतिवृष्टी आणि अचानक आलेल्या पुरामुळे नवीन समस्या निर्माण होत आहेत, तर सलग पावसाळ्यात ७,००० बोअरवेल कोरड्या पडल्या आहेत, तर महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये १९ टक्के पाऊस झाला आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिशाच्या अनेक भागांमध्ये यंदाच्या पावसाळ्यातील पुरामुळे पाण्याच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आणि पाणीपुरवठा विस्कळीत झाला. ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदच्या विश्लेषणातून वारंवार दिसून आले आहे की पावसाचे स्वरूप बदलत आहे, तापमान वाढत आहे आणि अनेक नदी खोऱ्यांमध्ये पाण्याची टंचाई वाढत आहे. हवामान बदलामुळे होणारे हे बदल अन्न सुरक्षा, ऊर्जा उत्पादन, सार्वजनिक आरोग्य, शहरांची लवचिकता आणि परिसंस्थेवर परिणाम करत आहेत. अशा परिस्थितीत, हवामान अनुकूल आणि लवचिक प्रणाली तयार करण्यासाठी अनेक पावले उचलावी लागतील. प्रथम जलव्यवस्थापनाची संकल्पना विकसित करावी लागेल. जलस्रोतांची शाश्वतता केवळ भूजल, जलाशय आणि तलावांपुरती मर्यादित नसावी. यामध्ये जमिनीतील ओलावा आणि घरे, उद्योग आणि शेती क्षेत्रातून बाहेर पडणारे वापरलेले पाणी यांचाही समावेश करावा लागेल. हे निळे पाणी, हिरवे पाणी (जमिनीचा ओलावा) आणि राखाडी आणि काळे पाणी असे समजू शकते. कपडे धुणे, आंघोळ करणे आणि स्वयंपाक करणे यातून निर्माण होणारे सांडपाणी धूसर पाणी असते. कपडे धुणे, आंघोळ करणे आणि स्वयंपाक करणे यातून निर्माण होणारे सांडपाणी धूसर पाणी असते. काळे पाणी हे मोठ्या प्रमाणात दूषित सांडपाणी आहे, जसे की शौचालयातील मानवी विष्ठा. महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की शेतात पूर सिंचनाऐवजी ठिबक सिंचनामुळे सुमारे ४४ टक्के निळे पाणी आणि प्रति हेक्टर सुमारे १,०५९ युनिट विजेची बचत झाली. पीक उत्पादकताही २३ टक्क्यांनी वाढली आहे. जमिनीतील सेंद्रिय पदार्थ वाढवून, पाणलोट क्षेत्र पुनर्संचयित करून आणि शेतीच्या चांगल्या पद्धतींद्वारे मातीचे आरोग्य सुधारून देशातील पावसावर अवलंबून असलेल्या भागात हिरवे पाणी १० ते ३० टक्क्यांनी वाढवता येते. जलसंपत्ती योजनेत राखाडी आणि काळ्या पाण्याचा समावेश केल्यास देशाच्या चक्राकार जल अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. सीइइडब्ल्यूच्या अंदाजानुसार, जर २०४७ पर्यंत वापरलेल्या पाण्यावर १०० टक्के प्रक्रिया केली गेली, तर उद्योग आणि सिंचनासाठी दरवर्षी ३१,००० दशलक्ष घनमीटरपेक्षा जास्त प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध करून दिले जाऊ शकते. दुसरे म्हणजे, बदलत्या हवामानाच्या अनुषंगाने जल व्यवस्थापनाचे नियोजन करावे लागेल.

सीइइडब्ल्यूच्याच्या मूल्यांकनात असे आढळून आले की देशातील ४० टक्क्यांहून अधिक जिल्ह्यांमध्ये पूर आणि दुष्काळाच्या धोक्याचे स्वरूप बदलत आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पुराचा धोका असलेल्या भागात आता दुष्काळाचा धोका आहे, तर काही दुष्काळी भागात पुराचा धोका वाढला आहे. म्हणून, नवीनतम हवामान अंदाज भक्कम पायावर आधारित असावेत. शहरी पूर व्यवस्थापनासाठी, पावसाचे स्वरूप अद्ययावत करणे आणि पूर धोक्याची क्षेत्रे ओळखणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील ठाणे आणि गुजरातमधील नवसारी यांनी हवामानातील जोखीम लक्षात घेऊन शहरी पूर व्यवस्थापन योजना तयार करताना समान दृष्टिकोन स्वीकारला आहे. तिसरे, जल व्यवस्थापन उपाय प्रभावीपणे राबविण्यासाठी धोरणात्मक समन्वय आवश्यक आहे. जल प्रशासन विविध मंत्रालये, विभाग आणि प्रशासकीय सीमांमध्ये विभागलेले आहे. पण जलचक्र ही विभागणी मान्य करत नाही. अशा परिस्थितीत केंद्र आणि राज्य संस्थांमध्ये, विशेषत: ज्या संस्थांवर भूपृष्ठावरील पाणी, भूजल, शेती, पर्यावरण आणि आपत्ती व्यवस्थापन यासारख्या जबाबदाऱ्या आहेत, त्यांच्यामध्ये अधिक चांगला समन्वय आवश्यक आहे. राजस्थानमधील २७ राज्य विभागांच्या ७४ धोरणांच्या विश्लेषणात असे आढळून आले की जमीन आणि पाण्याचे चांगले व्यवस्थापन अनेक धोरणांद्वारे नाही तर अधिक चांगल्या समन्वयाने साध्य केले जाईल. याचा अर्थ स्थानिक प्रशासन बळकट करणे, क्रॉस-डिपार्टमेंटल लर्निंगला चालना देणे, नियमित पुनरावलोकनांसह अंमलबजावणीचे वास्तविक-वेळ निरीक्षण करणे आणि जीवन आणि उपजीविकेसाठी चांगले परिणाम साध्य करण्यासाठी अन्न, जमीन आणि पाणी व्यवस्थांवर नियंत्रण ठेवणारी अनेक धोरणे एकत्रित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे. चौथे, हवामानास अनुकूल जलप्रणालीकडे जाण्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा आवश्यक आहे. सांडपाणी प्रक्रिया, सूक्ष्म सिंचन, जलस्रोतांची शाश्वतता, पाणलोट पुनर्संचयित करणे आणि स्मार्ट मॉनिटरिंग सिस्टीम यासाठी मोठ्या गुंतवणूकीची आवश्यकता आहे. सीइइडब्ल्यूच्याच्या अंदाजानुसार, देशातील वापरलेल्या पाण्यावर पूर्णपणे प्रक्रिया करण्यासाठी २०४७ पर्यंत १.५६ ते २.३१ लाख कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक आवश्यक असू शकते. परंतु देशातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्था सध्या जीडीपीच्या केवळ १.३ टक्के खर्च करतात, तर ब्राझीलमध्ये हे प्रमाण ७.४ टक्के आहे. एका अंदाजानुसार, हवामानातील लवचिकतेमध्ये गुंतवलेल्या प्रत्येक डॉलरचा फायदे मिळू शकतात. सार्वजनिक वित्तासोबत खाजगी भांडवल जमवण्याचेही आव्हान आहे. पण काही यशोगाथाही आहेत. उदाहरणार्थ, गाझियाबादने भारतातील पहिल्या प्रमाणित ग्रीन म्युनिसिपल बाँडद्वारे १५० कोटी रुपये उभे केले. हे संयंत्र सुमारे १,४०० औद्योगिक युनिट्सना प्रक्रिया केलेले पाणी पुरवठा करत आहे. अशी मॉडेल्स आर्थिक भार वाढवण्याऐवजी पाण्याच्या पायाभूत सुविधांना हवामानातील लवचिकता आणि संसाधन कार्यक्षमतेचा आधार बनविण्यात मदत करू शकतात. हवामान लवचिक पाणी व्यवस्थापन अनिश्चितता स्वीकारते, प्रत्येक थेंब मोजते, नैसर्गिक प्रणालींचे संरक्षण करते आणि पाणीपुरवठा तसेच मागणी व्यवस्थापित करते. विविध स्वरूपात उपलब्ध असलेल्या पाण्याची आपण किती हुशारीने बचत, वितरण, वापर, पुनर्वापर आणि व्यवस्थापन करतो यावर विकसित भारताकडे आपली प्रगती अवलंबून असेल.

लोकसंसद

जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरात मुंबई तिसरी

स्वित्झर्लंडमधील 'आयक्यूएअर' या स्विस प्रदूषण तंत्रज्ञान कंपनीने नुकताच जागतिक हवा गुणवत्ता निर्देशांक अहवाल प्रकाशित केला. या अहवालानुसार जगातील सर्वाधिक १२२ प्रदूषित शहरांच्या यादीत मलेशियाच्या क्वालालंपूर (हवा गुणवत्ता निर्देशांक १९२) आणि भारताच्या कोलकातानंतर (हवा गुणवत्ता निर्देशांक १७०) मुंबई (हवा गुणवत्ता निर्देशांक १६६) तिसऱ्या क्रमांकावर पोहोचली आहे. जागतिक पातळीवर प्रदूषित शहरांमध्ये मुंबईचा तिसरा क्रमांक लागणे ही सर्व मुंबईकरांसाठी एक चिंतेची बाब ठरली आहे. शहरात सुरू असलेली अमर्याद बांधकामे, उड्डाणपूल, रस्ते आणि मेट्रोचे रेंगाळलेले प्रकल्प, वाहनांची वाढती संख्या आणि कचऱ्याचा वाढता डोंगर यामुळे मुंबईची हवा कमालीची प्रदूषित झाली आहे. खरे तर मुंबईला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि तिथून येणारे वारे पूर्वी प्रदूषण वाहून न्यायचे, पण आता जागोजागी उभ्या राहिलेल्या गगनचुंबी इमारतींमुळे हवेच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण झाला आहे. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीच श्वसनाचा त्रास असलेल्या रुग्णांना मोठा त्रास होत असून खोकला, दमा आणि फुफ्फुसाचे आजार झपाट्याने वाढत आहेत. अशा गंभीर परिस्थितीत महापालिका प्रशासन, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य शासन यांनी समन्वयाने मुंबईतील हवा प्रदूषण नियंत्रणासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या काळात त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला. त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. अशाच एका महान, देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली. मात्र त्यांनी न डगमगता तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले. मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही. त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही, असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता, तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला. मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र राणी चेन्नमा यांनी इंग्रज सैन्याविरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला. मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

– श्याम ठाणेदार

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
२३ ऑक्टोबर
१) श्री.विश्वनाथ दामोदर वर्तक
रोहा-अलिबाग
दि.२३-१०-२०२६

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



अमृतबेन प्रेमजी जैन, वाढदिवस अलिबाग



अथांग शितल अद्वैत दारशेतकर, वाढदिवस अलिबाग

चिपको आंदोलनाचा इशारा

● टोरंट प्रकल्पाविरोधात कर्जत पर्यावरण बचाव समिती आक्रमक

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी येथे प्रस्तावित असलेल्या टोरंट हायड्रॉलिक प्रकल्पाच्या विरोधात अनोखे आंदोलन केले जाणार आहे. या प्रकल्पाला विरोध करणाऱ्या कर्जत पर्यावरण बचाव समितीने तोडल्या जात असलेल्या झाडांना मिठी मारून चिपको आंदोलन केले जाणार असल्याचे जाहीर केले. दरम्यान, चिपको आंदोलनासाठी कर्जत तालुक्याचे विविध भागातील असंख्य तरुण आणि पर्यावरणप्रेमी यात सहभागी होणार आहेत.

कर्जत येथे होणाऱ्या टोरंट प्रकल्पासाठी वन विभागाची ६४० हेक्टर जमीन दिली जाणार आहे. ७ ऑक्टोबर रोजी वन जमीन देण्याचा निर्णय झाल्यानंतर तात्काळ तेथील



ठेकेदाराने झाडे तोडण्यास सुरुवात केली आहे. मात्र झाडे तोडण्याची केवळ अधिसूचना प्राप्त झाली असताना वन विभागाने झाडे तोडण्याची कार्यवाही करण्याची परवानगी दिली कशी? असा प्रश्न कर्जत पर्यावरण बचाव समितीने केला आहे. त्यात ६४० हेक्टर जमिनीवरील लाखो झाडे तोडली जाणार असताना केवळ ३२४८० एवढी संख्या वन विभागाने दाखवली आहे. त्यानंतर देखील संबंधित झाडे कुठे लावली जाणार? सध्या अस्तित्वात असलेल्या मोठ्या झाडांचे काय करणार? त्यांचे पुनर्रोपण करणार काय? येथील जमिनीच्या बदल्यात जमीन कुठे दिली आहे? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

टोरंट प्रकल्पाच्या कामासाठी थेट झाडे कापण्यापासूनची मोहीम सुरू झाल्याने कर्जत पर्यावरण बचाव समिती आक्रमक झाली आहे. त्यामुळे वन विभागाच्या मनमानी कारभाराबद्दल जाब विचारण्यासाठी कर्जत पर्यावरण बचाव समितीने पाली तर्फे कोतवाल खलाटी भागातील झाडे तोडण्यापासून रोखण्यात यावी

असंख्य पर्यावरणप्रेमी सहभागी होणार

चिपको आंदोलन कर्जत पर्यावरण बचाव समितीने जाहीर केल्यानंतर कर्जत तालुक्यातील असंख्य पर्यावरणप्रेमी या आंदोलनासाठी तयार झाले आहेत. यात सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, शेतकरी, प्रकल्पग्रस्त असे अनेक प्रकाराचे लोक सहभागी होणार आहेत.

यासाठी झाडांना मिठी मारण्याचे अनोखे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

टोरंट कंपनी प्रकल्प उभारत असलेल्या पाली तर्फे कोतवाल खलाटी या भागात कर्जत पर्यावरण बचाव समिती चिपको आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनासाठी कर्जत पर्यावरण बचाव समितीचे समन्वयक ॲड कैलास मोरे यांच्यासह सचिन गायकवाड, अक्षय गायकवाड, राहुल गायकवाड, राजेश वेहेले, सतिश बोराडे, जगदीश हरिश्चंद्र दगडे, प्रणेश यादव, तानाजी तुरड, दिनेश आढाव (नेरळ), किरण राणे, हरेश सोनावळे, एकनाथ खडेकर, गणेश मसणे, पंकेश जाधव, महेश आढाव, स्विटी बार्शी, अजय कराळे, मिलिंद लाड, जयेश मसणे, ऋषिकेश भगत, जगदीश माळी, जितेंद्र गवळी मानिवली, शरद हजारे, प्रदीप ढोले, संजय देशमुख, मयूर आंग्रे, विनोद दळवी-अवसरे, अर्जुन माळी, महेंद्र भोईर, पंकज गायकर, प्रविण राणे यांच्यासह अनेकांनी आंदोलनात सहभागी होण्याचा निर्धार केला आहे.

दुष्काळाच्या छायेत शेखाडीची जलक्रांती

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

■ दोन वनराई बंधारे बांधून भविष्यातील पाणीटंचाईवर मात



श्रीवर्धन तालुका प्रशासनाकडून ट्रिगर १ आणि ट्रिगर २ नुसार दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आला असून, आगामी काळात तीव्र पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेखाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत ग्रामस्थ व महिलांच्या एकजुटीतून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी दोन वनराई बंधारे बांधण्यात आले.

हा उपक्रम गुरुवारी (दि.२१) पार पडला. या उपक्रमात शेखाडी गावातील महिला मंडळ व पुरुष ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रमदान केले. भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर पाणीटंचाईला सामोरे जाण्यासाठी आतापासूनच योग्य उपाययोजना आखणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शेखाडीचे सरपंच बबन पाटील यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना केले.

गावात दुष्काळाची टांगती तलवार असताना, शासकीय यंत्रणा आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेले हे वनराई बंधारे पाणी पातळी वाढवण्यासाठी व पाणीटंचाईची झळ कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

दुर्गादेवींचे विसर्जन उत्साहात

| आगरदांडा | प्रतिनिधी |



(छाया: गणेश चोडणेकर)

नऊ दिवसांच्या नवरात्रोत्सवाची सांगता झाल्यानंतर मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ७१ दुर्गादेवींच्या विसर्जन मिरवणुका मोठ्या उत्साहात काढण्यात आल्या. फटाक्यांची आतषबाजी तसेच डीजे आणि बँजोच्या तालावर निघालेल्या मिरवणुकांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

जुनीपेठ, मुरूड येथील शिवशक्ती क्रीडा मंडळाच्या दुर्गादेवीच्या विसर्जन मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान तरुण, तरुणींसह महिलांनी गरबा नृत्यावर ठेका धरत उत्सवाचा आनंद लुटला. भक्तिमय वातावरणात आणि वाद्यांच्या गजरात देवीला भावपूर्ण निरोप देण्यात आला. दरम्यान, विसर्जन मिरवणुका शांततेत व सुरळीत पार पडाव्यात, यासाठी मुरूड पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.



वाशी शाळेला दोन व्हाईट बोर्ड सुपूर्द

| चणेरा | प्रतिनिधी |

■ दोस्ती ग्रुपचा शैक्षणिक उपक्रम

रोहा तालुक्यातील रा.जि.प. शाळा वाशी येथील शैक्षणिक गरज लक्षात घेऊन शाळेच्या मागणीनुसार दोन व्हाईट बोर्ड सुपूर्द करण्यात आले. लांढर गावचे रहिवासी तथा दोस्ती ग्रुपचे सदस्य जगन शिंदे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच दोस्ती ग्रुपच्या सदस्यांनी विशेष सहकार्य करत शाळेला शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले.

विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि शाळेतील अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक क्षेत्रासाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

यावेळी सागर जोगडे, संदेश भगत, पत्रकार जितेंद्र जाधव, संदीप भगत, विकास जोगडे, सहदेव बर्डे, प्रदीप रटाटे, अनूप पडवळ, आयुष बामणे, विराज बाकाडे, तेजस लहाने, तुषार लहाने, शाळा समितीच्या अध्यक्षा पूजा जंगम, शाळेच्या शिक्षिका सलगारे, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना पत्रकार जितेंद्र जाधव यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांकडे समाजाने गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, 'ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक आहे. आर्थिक परिस्थिती किंवा आवश्यक सुविधांच्या अभावामुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये. समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि तरुणांनी पुढाकार घेऊन गरजू शाळांना शैक्षणिक साहित्य, वह्या-पुस्तके, संगणक तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हातभार लावावा. आपण केलेली छोटीशी मदतदेखील विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देऊ शकते. तसेच, ग्रामीण भागातील शाळा सक्षम झाल्या, तरच गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी मिळतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सांडपाण्यामुळे रस्त्यावर तलावाचे स्वरूप

| पाताळगंगा | प्रतिनिधी |



खालापूर तालुक्यातील निगडोली गावातील घरातून निघणाऱ्या सांडपाण्यासाठी भुयारी गटाराचे काम पाच वर्षांपूर्वी पूर्ण झाले आहे. मात्र घरातून निघणारे सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे रस्त्यावर तलावाचे स्वरूप पाहायला मिळत आहे. या ठिकाणी वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत होता. शिवाय वाहन घसरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यांमुळे या ठिकाणी भुयारी गटारे बांधण्यात आली. मात्र वाहनांची सातत्याने वर्दळ असल्यामुळे या ठिकाणी बसविण्यात आलेली लोखंडी जाळीच्या झाकणांची दुरवस्था निर्माण झाल्यामुळे अपघाताला निमंत्रण मिळत आहे. तसेच या सांडपाण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

निगडोली येथून खोपोली जाण्याचा मार्ग जवळ असल्यामुळे या परिसरातील शेकडो नागरिक याच मार्गाचा अवलंब करतात. परिणामी या रस्त्यावर बांधण्यात आलेले आरसीसी भुयारी गटार आता अपघातांचे केंद्रबिंदू बनत आहे. तसेच अनेक ठिकाणी लोखंडी जाळी बसविण्यात आली असून मात्र वाहनांच्या वर्दळीमुळे त्यांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या गटारावरील तुटलेल्या जाळींचे लवकरात लवकर काम करावे, अशी मागणी येथील ग्रामस्थ आणि वाहनचालक करीत आहेत.

'ईवलसं आभाळ' पुस्तकाचे प्रकाशन

पाली/वाघोशी : वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून पंचायत समिती सुधागड पाली येथे जि. प. प्राथमिक शिक्षक आणि लेखक जयेश साजेकर यांच्या 'ईवलसं आभाळ' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. पंचायत समितीच्या सभापती जागृती मानकर यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्यास उपसभापती संदेश शेवाळे, गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, विविध केंद्रांचे केंद्रप्रमुख, जिल्हा परिषदेचा शिक्षक वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात सभापती जागृती मानकर यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे सुधागड तालुक्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना सहज, सोपे व आनंदी वाचनाचे दालन खुले झाले असून विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित करण्यात हे पुस्तक महत्त्वाची भूमिका बजावेल. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी जयेश साजेकर यांनी या पुस्तकाची एकेक प्रत सुधागड तालुक्यातील प्रत्येक शाळेस भेट दिली.

भंगार विक्रीतून कोट्यवधींचा महसूल

मुंबई : पश्चिम रेल्वेने 'मिशन झिरो स्क्रॅप' उपक्रमांतर्गत भंगार विक्रीतून चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत सुमारे ३२० कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे. रेल्वेच्या विविध कार्यालयांमध्ये आणि आस्थापनांमध्ये पडून असलेल्या निरुपयोगी साहित्याची वेळेत विल्हेवाट लावून परिसर भंगारमुक्त करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेअंतर्गत रेल्वे रुळांवरील जुने स्लीपर, लोह, स्टील, अल्युमिनियम, पितळ, तांबे व इतर धातूचे भंगार, सेवाबाह्य आणि मालवाहू डबे तसेच इतर टाकाऊ साहित्याची विक्री करण्यात आली.

दोन चिमुरड्यांचा बुडून मृत्यू

नवी मुंबई : नवरात्रोत्सवानिमित्त देवी आणि घटांच्या विसर्जनावेळी तलावात वाहिलेले पैसे काढण्यासाठी पाण्यात उतरलेल्या २ चिमुरड्यांचा वाशीतील कोपरी गाव तलावात बुडून मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे महापालिकेच्या सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गोलू मन्सूरी (१०) आणि गणेश गुप्ता (१२) अशी मृत मुलांची नावे आहेत.

नवरात्रोत्सवानिमित्त कोपरी गाव तलावात देवीच्या मूर्ती आणि घटांचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनावेळी तलावात वाहिलेले पैसे काढण्यासाठी गोलू आणि गणेश आपल्या मित्रांसोबत पाण्यात उतरले होते. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते बुडाले. यावेळी त्यांनी बचावाकरिता आरडाओरडा केली. मात्र, तलाव परिसरात सुरक्षारक्षक नसल्याने त्यांना वेळेत मदत मिळाली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्यादरम्यान दोन्ही बालकांना बाहेर काढले. त्यांना वाशी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. तलावाच्या ठिकाणी सुरक्षारक्षक तैनात करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांतर्फे वारंवार करण्यात आली होती. आता याच तलावात दोन बालकांचा बुडून मृत्यू झाल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नऊ शासकीय रुग्णालयात फळांचे वाटप | सात वर्षांपासून उपक्रम सुरू

सोमनाथ पवारांची नवरात्रीत रुग्णसेवेतून देवीसेवा

| मुंबई | प्रतिनिधी |

नवरात्रोत्सवात कोट्यवधी रुपये खर्च करून मंडळे देवीची आराधना करतात. मात्र मीरारोड येथील एका सामाजिक कार्यकर्ते यांनी सर्व प्रथांना छेद देत रुग्णसेवेतून देवीसेवेचा वेगळा आणि प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ पवार हे गेल्या सात वर्षांपासून नवरात्रीच्या नऊ दिवसांत नऊ शासकीय रुग्णालयांमध्ये जाऊन फळवाटप करून सेवा करत आहेत. कोणतीही प्रसिद्धी, कोणतेही



राजकीय पाठबळ आणि कोणतीही शासकीय मदत न घेता हा उपक्रम ते पूर्णपणे स्वखर्चातून आणि निस्वार्थ भावनेने राबवत असल्याने त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उपक्रमाची प्रेरणा २०२०च्या भयावह कोविड काळातील अनुभवातून मिळाली. त्यावेळी सोमनाथ पवार यांच्या वहिनीला कोरोनाची लागण झाल्याने त्यांना टेंभा रुग्णालयात २६ दिवस दाखल करावे लागले होते. त्याच दरम्यान नवरात्र उत्सव सुरू होता. वहिनीला फळे घेऊन भेटायला जात असताना इतर कोविड रुग्णांची हेळसांड होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संसर्गाच्या भीतीमुळे नातेवाईकही रुग्णांपासून दूर राहत होते. या विदारक वास्तवाने व्यथित होऊन त्यांनी स्वतः पीपीई किट परिधान करून इतर रुग्णांना फळे आणि आधार देण्यास सुरुवात केली. तेव्हापासून हा उपक्रम दरवर्षी न चुकता सुरू आहे.

यंदाही नऊ दिवसांचे नियोजन निश्चित करण्यात आले होते. पहिल्या दिवशी सातारा सिव्हिल रुग्णालय, दुसऱ्या दिवशी इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालय भिवंडी, तिसऱ्या दिवशी टेंभा रुग्णालय भिवंडी, चौथ्या दिवशी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय शताब्दी, पाचव्या दिवशी स्व. इंदिराबाई बाबुराव सरनाईक रुग्णालय ठाणे, सहाव्या दिवशी पेणकर पाडा प्राथमिक आरोग्य केंद्र व सफाई कामगार सन्मान, सातव्या दिवशी धर्मवीर आनंद दिघे हृदयरोग रुग्णालय कळवा, आठव्या दिवशी सावित्रीबाई फुले रुग्णालय व हरिलाल भगवती रुग्णालय आणि दसऱ्याच्या दिवशी नित्यानंद आश्रम, ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय, काशिमीरा येथील अनाथ आश्रम व नायगाव येथील शासकीय रुग्णालयात फळवाटप करण्यात आले.

"नवरात्र उत्सव हा माझ्यासाठी केवळ भक्तीचा नाही तर सेवेचा सण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेची सेवा हीच ईश्वर सेवा या विचाराने प्रेरित होऊन गेली सात वर्षे मित्र परिवाराच्या सहकार्याने स्वखर्चातून नवरात्राच्या नऊ दिवसांत नऊ शासकीय रुग्णालयांमध्ये फळ वाटपाचा उपक्रम मी अविरत सुरू ठेवला आहे. हा उपक्रम पुढेही असाच सुरू ठेवणार आहे.
– सोमनाथ पवार, संस्थापक अध्यक्ष, छ. शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्ट"

निवडक



शाळेला डिजिटल क्लासरूमची भेट

माथेरान : प्रा. शांताराम यशवंतराव गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान येथील विद्यार्थ्यांसाठी विजयादशमीचे औचित्य साधून विरोधी पक्षाचे विद्यमान नगरसेवक सचिन विठ्ठल दाभेकर यांच्या पुढाकाराने डिजिटल क्लासरूमची भेट देण्यात आली. बुधवार दि.२१ पासून शाळेत डिजिटल क्लासरूम सुरू करण्यात आले आहे. याप्रसंगी त्यांची पत्नी माजी नगरसेविका सोनम दाभेकर यावेळी उपस्थित होत्या. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना आधुनिक डिजिटल शिक्षण मिळावे, यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. सचिन दाभेकर हे या शाळेचे माजी विद्यार्थी असून यांच्या अथक प्रयत्नातून आणि मा. सचिनभाऊ अहिर उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, सचिन जगाठिया रिजनल मॅनेजर, नवनीत प्रकाशन मा. अनिलजी घोणे, विधानसभा संपर्क प्रमुख यांच्या सहकार्यातून शाळेत अत्याधुनिक डिजिटल क्लासरूम बनवून देण्यात आले. या शाळेतील विद्यार्थी आता स्मार्ट शिक्षण पद्धतीने शिकणार आहेत.

भावपूर्ण वातावरणात देवीमूर्तींचे विसर्जन

तळा : तळा तालुक्यात यंदा शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर तालुक्यात एकूण ५३ ठिकाणी देवीच्या मूर्तींची विधिवत स्थापना करण्यात आली होती. यामध्ये ४७ सार्वजनिक नवरात्र मंडळे आणि ६ घरगुती मूर्तींचा समावेश होता. याशिवाय तालुक्यात ७ ठिकाणी पारंपरिक घटस्थापना आणि २ ठिकाणी देवीच्या प्रतिमेची स्थापना करून नऊ दिवस देवीची मनोभावे



पूजा-अर्चा करण्यात आली. या नऊ दिवसात तालुक्यातील सर्व देवी मंडपांमध्ये आरती, भजन, होमहवन आणि विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. नवरात्रोत्सवानिमित्त तळा शहरासह ग्रामीण भागातील मंदिरे आणि मंडपांना आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. काही देवी मूर्तींचे विजयादशमीच्या मुहूर्तावर, तर काही देवी मूर्तींचे बुधवारी भावपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात देवीला निरोप देण्यात आला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



भक्तीसोबत सामाजिक प्रबोधनाचा संदेश

तळा : तारस्ते येथील श्री अंबेमाता बाळमित्र सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाचा २१वा नवरात्रौत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. या उत्सवादरम्यान केवळ धार्मिकच नव्हे तर सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचेही सुंदर आयोजन करण्यात आले होते. यामध्ये होमहवन, श्री सत्यनारायण महापूजा, महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ आणि विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी गुणगौरव सोहळा अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता. रोज रात्री रंगणारा गरबा, संध्याकाळच्या भक्तिमय वातावरणात होणारे सांस्कृतिक भजन आणि हरिनामाचा हरिपाठ यामुळे संपूर्ण तारस्ते परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या कार्यक्रमातून धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक एकोपा जपण्याचा सुंदर प्रयत्न मंडळाने केला. या उत्सवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक बांधिलकी. मंडळाने 'जमीन वाचवा, गाव वाचवा!' या महत्त्वपूर्ण मोहिमेचे निवेदन गावातील विविध मंडळांना दिले. आपल्या गावाची जमीन, गावाचे अस्तित्व आणि भावी पिढ्यांचे भविष्य जपण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. भक्तीसोबतच सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारा हा उत्सव तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरला.



शिवशंभु प्रतिष्ठानकडून गडदुर्गाचे पूजन

खांब : शिवशंभु प्रतिष्ठान, रोहा, रायगड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले १२ व्या वर्षाचे दसरागड पूजन मोठ्या उत्साहात पार पडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमी इतिहासाचा जागर करत गडदुर्गांविषयी प्रेम, अभिमान आणि संवर्धनाची भावना जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात प्रतिष्ठानच्या सर्व मावळ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विशेष सहकार्य केले. 'पहिलं तोरण शिवछत्रपतींच्या गडदुर्गांना, मगच घराला!' हा विचार केवळ घोषवाक्य न राहता कृतीतून जपण्याचे कार्य शिवशंभु प्रतिष्ठान गेली बारा वर्षे सातत्याने करीत आहे. विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर गडदुर्गांचे पूजन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या प्रेरणादायी इतिहासाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा प्रतिष्ठानने अखंडपणे जपली आहे. गडदुर्ग हे महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे साक्षीदार असून, ते केवळ दगड-मातीचे बांधकाम नसून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे, दूरदृष्टीचे आणि स्वराज्यनिष्ठेचे प्रतीक आहेत. या ऐतिहासिक वारशाविषयी नव्या पिढीत जागरूकता निर्माण व्हावी, गडकोटांचे महत्त्व समजावे आणि शिवविचारांची प्रेरणा समाजात रुजावी, या उदात्त हेतूने प्रतिष्ठानने सुरू केलेल्या या संकल्पनेला १२ वर्ष पूर्ण झाली.

निवडक



नवरात्रोत्सवानिमित्ताने मुरुडमध्ये दुर्गामाता दौड

कोर्लई : दुर्गामाता दौड ही प्रामुख्याने महाराष्ट्रात नवरात्रीच्या काळात काढली जाणारी एक प्रमुख पदयात्रा किंवा दौड आहे. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजी यांनी ही परंपरा सुरू केली. या दुर्गामाता दौडद्वारे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि हिंदू संस्कृतीचे जागरण करणे हा मुख्य उद्देश असतो. अश्विन प्रतिपदेपासून ते विजयादशमीपर्यंत सलग नऊ ते दहा दिवस ही दौड सकाळी लवकर काढली जाते.हिंदू धर्म आणि संस्कृतीचे रक्षण: तरुणांमध्ये शिस्त, शारीरिक क्षमता आणि धार्मिक निष्ठा निर्माण करणे, श्री शिवछत्रपतींच्या स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण ठेवणे व इतिहासाचा प्रसार करणे हा दुर्गामाता दौडचा उद्देश आहे.



धाक्सुदमध्ये रंगला पैठणीचा खेळ

कोलाड : नवरात्रोत्सवाची धामधूम सर्वत्र भक्तिमय वातावरणात सुरु आहे. या काळात स्थानिक पातळीवर ग्रामस्थ युवक मंडळ यांच्या वतीने विविध उपक्रम अमलात आणून ते राबिवले जातात. याच अनुषंगाने रोहा तालुक्यातील मचिल्हे येथील धाक्सुद क्रीडा मंडळाने सालाबादप्रमाणे एक अनोखा उपक्रम राबवून येथील महिला भगिनींसाठी खास खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याला येथील महिलांनी भरभरुन प्रतिसाद दिला तर रंगलेल्या, अटीतटीच्या व चढाओढीच्या पैठणीच्या खेळातील पैठणीच्या विजेत्या ठरल्या त्या तनुजा तुकाराम कोंडे वहिनी तर उपविजेत्या अंकिता लोखंडे,आणि वृषाली कोंडे या वहिनी ठरल्या आहेत. नवरात्रोत्सव काळात येथील धाक्सुद मंडळांने आराध्य दैवत श्री धाक्सुद महाराज मंदिराच्या प्रांगणात आयोजित केलेल्या अनोखा उपक्रम व विशेष खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पैठणीच्या खेळासाठी येथील महिला वर्गाने मोठा सहभाग नोंदवून विविध खेळांचा आनंद घेत रसिक प्रेक्षकांची मने जिंकत त्यांना भरभरुन प्रतिसाद दिला तर विविध प्रकारच्या व पैठणीच्या खेळात जवळपास ७० हून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या.

समस्यांचे निराकरण करण्याची मागणी

उरण : चिरनेर ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन चिरनेर ग्राम पंचायत हद्दीतील केळाचामाल आदिवासी वाडीवर जाण्यासाठी पक्का स्वरुपाचा रस्ता तयार करावा आणि आदिवासी बांधवांना भेडसावणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी.अन्यथा उरण तहसील कार्यालयासमोर उपोषण छेडण्याचा इशारा मनसेचे तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी दिला आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून मनसेचे तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी चिरनेर केळाचामाल आदिवासी वाडीवरील दुर्गामातेचे दर्शन आपल्या सहकाऱ्यांच्या उपस्थित घेतले. यावेळी ॲड. सत्यवान भगत यांनी आदिवासी बांधवांच्या व्यथा जाणून घेतल्या.चिरनेर ग्रामपंचायत यांनी पुढाकार घेऊन चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील केळाचामाल आदिवासी वाडीवर जाण्यासाठी पक्का स्वरुपाचा रस्ता तयार करावा आणि आदिवासी बांधवांना भेडसावणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी.आदिवासी बांधवांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उरण तहसील कार्यालयासमोर उपोषण छेडतील असा इशारा ॲड. सत्यवान भगत यांनी दिला.

नेरळमधील पथदिवे सुरू ठेवावेत

नेरळ : नेरळ गावातील ज्येष्ठ नागरिक पहाटे सहा वाजता मॉर्निंग वॉक साठी घराबाहेर पडतात. या नागरिकांना रस्त्यावर असलेले पथदिवे पहाटे सहा वाजण्याच्या आधी बंद केले जात असल्याने अंधारातून मार्गक्रमण करावे लागते.पहाटेच्या वेळी रस्त्यावर अंधार असल्याने मोकाट कुत्रे यांचा देखील धोका वाढला आहे.दरम्यान नेरळ ग्रामपंचायत कडून महावितरणकडे साडे सहा पावणे सात पर्यंत पथदिवे सुरू ठेवावेत, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक संजय कांबळे यांनी केली आहे. दरम्यान महावितरण कडून गावातील रस्त्यांवरील पथदिव्यांचा टाइमर आवश्यकतेनुसार समायोजित करावा आणि नेरळ गावातील पथदिवे दररोज सकाळी ६:४५ वाजेपर्यंत सुरू राहतील अशी व्यवस्था करावी अशी मागणी ज्येष्ठ नागरिक संजय कांबळे यांनी केली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **प्लंबिंग व पाईपलाईन कामासाठी हेल्पर पाहिजेत.** संपर्क : हजारे एंटरप्रायजेस मारूती नाका, अलिबाग- रायगड ९८२२००१८५३
- **जागा भाड्याने हवी आहे.** मुख्य गोंधळपाडा, अलिबाग येथे सुमारे २०० चौ. फूट गाळा, सलग्न बाथरूमसह भाड्याने हवा आहे. संपर्क : ७७९८८३३७७७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अतिक्रमण हटविण्यासाठी ४७ कोटींचा प्रस्ताव

| पनवेल | प्रतिनिधी |

- **तीन वर्षांसाठी असणार निविदा**
- **अधिकाऱ्यांच्या कारवाईवरही महासभेत चर्चा**

महापालिका हद्दीतील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे आणि धोकादायक बांधकामे हटविण्यासाठी पुढील तीन वर्षांत ४७ कोटी ७० लाख रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेसमोर ठेवला आहे. प्रभाग समिती अ, ब, क आणि ड अंतर्गत मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि वाहने पुरविण्यासाठी निविदा मागविण्याचा हा प्रस्ताव यापूर्वी दोनदा चर्चेला आला होता. मात्र, अतिक्रमण हटविण्याच्या कामावरून सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरल्याने त्याला मंजुरी मिळू शकली नव्हती. शुक्रवारी (दि.२३) होणाऱ्या महासभेत या प्रस्तावावर चर्चा होणार आहे.

महापालिकेच्या प्रस्तावानुसार या कामासाठी दरवर्षी सुमारे १५ कोटी ९० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यात १७५ कर्मचाऱ्यांच्या मनुष्यबळासाठी दरमहा ५२ लाख ५० हजार रुपये, तर जेसीबी, डंपर, ब्रेकर, टेम्पो आणि अन्य यंत्रसामग्री व वाहनांसाठी दरमहा ८० लाख रुपये खर्च प्रस्तावित आहे. मनुष्यबळासाठी वार्षिक सहा कोटी ३० लाख रुपये आणि यंत्रसामग्री व वाहनांसाठी नऊ कोटी ६० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार तीन वर्षांचा खर्च ४७ कोटी ७० लाख होणार आहे.

६ ऑक्टोबरच्या महासभेत हा विषय स्थगित ठेवण्यात आला होता. त्या वेळी भाजपचे सदस्य परेश ठाकूर यांनी



अतिक्रमणांबाबत छायाचित्रे सादर करून प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केले होते. अतिक्रमण हटविण्यात प्रशासन ढिम्म असल्याचा आरोप करत त्यांनी प्रभाग अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई, तसेच कामोठे आणि पनवेल प्रभाग समितीच्या प्रभाग अधीक्षकांना निलंबित करण्याची मागणी केली होती. त्यानंतर आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित तीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. या अधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे आपले म्हणणे सादर केले आहे.

अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांकडे गणवेश नसणे आणि त्यांच्या कामकाजाबाबत ६ ऑक्टोबरच्या महासभेत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. प्रत्यक्षात हे कंत्राटी कर्मचारी कामावर हजर नसल्याचा आरोप सुद्धा करण्यात आला. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांऐवजी तेवढ्याच वेतनश्रेणीचे महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी नेमण्यासह, या विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचे मुल्यमापनासाठी बायोमॅट्रीक उपस्थितीची नोंद तसेच रात्रपाळीला अतिक्रमण काढले जात नाही त्यामुळे रात्रपाळीला हे कर्मचारी व यंत्रसामुग्री भाड्याने घेऊ नये अशा उपसूचनाही करण्यात आल्या होत्या. मात्र, नव्या प्रस्तावात या पर्यायाचा उल्लेख नसल्याने त्यावरही चर्चा होण्याची शक्यता आहे.

शुक्रवारच्या महासभेत अतिक्रमण विभागाने गेल्या पंधरा दिवसांत केलेल्या कारवाईचा तपशील आणि संबंधित अधिकाऱ्यांनी नोटिशींना दिलेले खुलासे प्रशासनाकडून मांडले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे निविदेला मंजुरी देताना सदस्य कोणती भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

कारवाईला वेग

अतिक्रमण हटविण्याच्या कामावरून पालिका प्रशासनावर टीका होत असताना गेल्या पंधरा दिवसांत पनवेल, नवीन पनवेल, खांदेश्वर आणि कामोठे परिसरात कारवाई वाढल्याचे दिसत आहे. भाजपच्या सदस्यांनीही ६ ऑक्टोबरच्या महासभेत शहरातील फेरीवाले, टपरीधारक आणि हातगाडी व्यावसायिकांच्या अतिक्रमणांची छायाचित्रे सादर केली होती. त्यामुळे नव्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता, कामाची जबाबदारी आणि देखरेख याबाबत सदस्यांनी यापूर्वी केलेल्या उपसूचनांवर ठाम राहतात की कंत्राटी कामगारांना नेमण्याची भूमिका घेतात, याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

वावोशीत बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीचा जागर

| खोपोली | प्रतिनिधी |



वावोशी येथे भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा खालापूर व शहर शाखा खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने धम्म प्रवचन मालिकेमधील पुष्प उत्साहात संपन्न झाले.

यावेळी प्रवचनकार आयु. सचिन केदारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करत ऐतिहासिक घटनांचा आढावा घेतला. तसेच बौद्ध समाजातील तरुण पिढीने आपापसांतील मतभेद दूर करून एकजुटीने बाबासाहेबांचे विचार आणि परिवर्तनाची चळवळ पुढे न्यावी, असे आवाहन केले. भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण गायकवाड यांनी ८ मार्च २०२७ रोजी खोपोली येथे भव्य महिला धम्म मेळावा आयोजित करण्याची घोषणा केली.

सचिन केदारे यांनी तथागत गौतम बुद्धांचे विचार, सम्राट अशोकाचे धम्मप्रसारातील योगदान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्पृश्यतेविरोधातील संघर्ष, महाडचा चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृती दहन, येवला येथील धर्मांतराची घोषणा आणि नागपूर येथील ऐतिहासिक धम्मदीक्षा यांचे महत्त्व विशद केले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

या घटनेला ७० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तरुण पिढीने बाबासाहेबांच्या विचारांचा सखोल अभ्यास करावा, शिक्षण आणि सामाजिक कार्यात पुढे यावे, तसेच मतभेद दूर करून एकोप्याने राहावे, असे आवाहन केदारे यांनी केले.

इंडियन एमिनन्स अवॉर्ड्सचे आयोजन

| उरण | प्रतिनिधी |

ॲक्रेडिटेशन मॅनेजमेंट सिस्टम प्रा. लि. यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात येणारा प्रतिष्ठित इंडियन एमिनन्स अवॉर्ड्स मुंबई हा पुरस्कार सोहळा २८ नोव्हेंबर रोजी वाशी येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्याला सुप्रसिद्ध भारतीय शास्त्रीय नृत्यांगना आणि अभिनेत्री सुधा चंद्रन प्रमुख सेलिब्रिटी पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. व्यवसाय, व्यवस्थापन, शिक्षण, क्रीडा, मनोरंजन, कला, सामाजिक सेवा आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे हा उद्देश आहे.

मनसेच्या संघटनात्मक बांधणीला वेग

| पाली | प्रतिनिधी |



मनसेच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी पक्षाकडून विविध स्तरांवर नव्या नियुक्त्यांचा धडाका सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर मनसेच्या सुधागड उपाध्यक्षपदी शेखर चव्हाण यांची नियुक्ती केली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे, अमित ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि मनसे नेते संदीप देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली ही निवड करण्यात आली आहे. योगेश परुळेकर, राजेश येरूणकर आणि जिल्हाध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांच्या हस्ते शेखर चव्हाण यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पक्षाच्या विचारधारेवर निष्ठा ठेवून सामाजिक, संघटनात्मक व जनहिताची कामे केल्याची दखल घेत चव्हाण यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. स्थानिक पातळीवरील नागरिकांचे प्रश्न सोडवणे, पक्षाचा विचार आणि उपक्रम तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे, तसेच पक्षाची संघटना अधिक मजबूत करणे या उद्दिष्टांवर भर देण्याचे आवाहन नियुक्तीपत्राद्वारे करण्यात आले आहे. तसेच या पदाचा योग्य वापर करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर राहण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात



| खांदा | वार्ताहर |

मुलगंध कुटी बुद्धविहार सामाजिक ट्रस्टच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात आणि बहुसंख्येने उपस्थित अनुयायांच्या साक्षीने साजरा करण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष दिनेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक त्रिसरण व पंचशील ग्रहणाने करण्यात आली.

कार्यक्रमात खांदा कॉलनीतील मान्यवर व्यक्तींनी आपले विचार मांडत धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व विशद केले. महिला भगिनींनीही आपले मनोगत व्यक्त करून सामाजिक प्रबोधन आणि धम्मविचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले.

सुप्रसिद्ध भन्ते विमलकीर्ती गुणसिरी यांनी उपस्थितांना धम्म दीक्षा, नामांतर आणि उपोसथ यांविषयी मार्गदर्शन केले.

गोरक्षनाथ गडावर अखंड हरिनाम सप्ताह

| रसायनी | प्रतिनिधी |

श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड येथे वासांबे मोहोपाडा ग्राम पंचायतीच्या हद्दीतील खानावले गावचे रहिवासी कै. बाळाराम कोंडाजी लबडे यांच्या स्मरणार्थ अकराव्या वर्षी अखंड हरिनाम उत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २३ ते २७ ऑक्टोबर या कालावधीत हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या सोहळ्याला गुरुवर्य महंत आनंद खंडागळे आणि जगन्नाथ रत्नाकर यांचे कृपाशीर्वाद लाभणार आहेत. पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवात कीर्तनांचे आयोजन केले आहे.

शिवतेज महिला प्रभागसंघातर्फे विविध कार्यक्रम

| महाड | प्रतिनिधी |



उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती महाड यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ रंग, नऊ संकल्प या उपक्रमांतर्गत शिवतेज महिला प्रभागसंघ, नाते यांच्या वतीने फळसकर सभागृह, कोळोसे येथे प्रभागस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या कार्यक्रमात आरोग्य जागृती, आर्थिक व डिजिटल साक्षरता, उद्योजकता विकास आणि जलसंधारण अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभागसंघाच्या कोषाध्यक्ष दीप्ती फळसकर यांनी केले. यावेळी उमेदचे तालुका अभियान व्यवस्थापक संचित स्मिता सुनील पार्टे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन, आरोग्यविषयक जागरूकता आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून विकास साधण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले

रायगड फार्मसी कॉलेज मोहप्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, पाचाड यांच्या सहकार्याने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून महिलांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच ग्रामसखी स्वप्नाली दाभेकर यांनी आर्थिक व डिजिटल साक्षरतेविषयी प्रशिक्षण दिले. उद्योजकता विकास प्रशिक्षणादरम्यान कल्पिता दळवी यांनी महिलांना स्वयंरोजगाराच्या विविध संधी, लघुउद्योगांची उभारणी आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करून आर्थिक प्रगती साधण्याबाबत मार्गदर्शन केले.

मराठा समाजाचा दसरा मेळावा उत्साहात

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |



सुधागड तालुका मराठा समाज आयोजित ३६ वा दसरा मेळावा २०२६ व समाज गौरव पुरस्कार आणि समाज गौरव स्मृती पुरस्कार सोहळा स्व. स. स. साजेकर सभागृह, पहिला मजला, मराठा समाज भवन, पाली-सुधागड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष धनंजय स. साजेकर हे होते. यावेळी समाज बांधव व भगिनींचे हार्दिक स्वागत करण्यात आले.

यावेळी समाजासाठी व गावासाठी अतुलनीय कार्य करणारे दिघेवाडी येथील ज्येष्ठ समाजसेवक भालचंद्र पांडुरंग भणगे यांना समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.गेली ४० ते ५० वर्षे सरकारी नोकरी, कुटुंब सांभाळून समाज घडवण्यासाठी, समाजाला एकत्रित ठेवण्यासाठी आणि समाजाची प्रगती करण्यासाठी त्यांनी रात्रंदिन ध्यास घेऊन बहुमूल्य योगदान दिले आहे. त्यामुळेच आज नवगाव समाज या उंचीवर पोहोचला आहे, त्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

असंख्य कौटुंबिक न्याय-निवाडे, गावागावातील वाद मिटवण्यासाठी त्यांनी आपल्या वाणीचा योग्य वापर करून सर्वांना न्याय दिला. समाजाची आर्थिक घडी बसवण्यासाठी त्यांनी एकहाती, विश्वासू, आश्वासक नेतृत्व केले. आर्थिक संकटात आलेल्या पतपेढीला चेअरमन झाल्यानंतर उर्जितावस्था आणून ती नफ्यात आणली.

समाजातील युवकांसाठी ते एक आदर्श व्यक्तिमत्त्व असून समाजाचे आधारस्तंभ आहेत. सुधागड तालुका मराठा समाजाने केलेली ही निवड अतिशय सार्थ असून आज दिघेवाडी गावासाठी अभिमानाची ठरली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

थकीत मानधन अदा करण्यासाठी मनसेने घेतला पुढाकार

| कोलाड | प्रतिनिधी |

सर्व जिल्हा परिषद व सर्व अनुदानित शाळांमध्ये पीएम पोषण आहार योजनेअंतर्गत काम करणाऱ्या महिला गेल्या अनेक वर्षांपासून केवळ २००० ते २५०० रुपये इतक्या अत्यंत तुटपुंज्या मानधनावर दररोज विद्यार्थ्यांसाठी जेवण बनविण्याचे काम करत आहेत.

अशा अत्यल्प मानधनातही त्यांचे जून ते ऑक्टोबर असे चार ते पाच महिन्यांचे मानधन थकण्यात आले आहे. त्यांचे पाच महिन्यांचे राहिलेले मानधन येत्या ७ दिवसात अदा करावे अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना रोहा पंचायत कार्यालयासमोर आंदोलन करेन असा इशारा गट विकास अधिकारी अमृता उंदरे-पाटील यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी मनसेचे रोहा तालुका अध्यक्ष साईनाथ धुळे, महिला अध्यक्षा दिपश्री घासे, प्रभाकर तांडेल, किशोर कापसे, महेश पालांडे, विक्रांत ठाकूर, साहिल शिंदे उपस्थित होते.

रानसईच्या जलपातळीत घट | दर आठवड्याला मंगळवार, शुक्रवार पाणीपुरवठा बंद

उरणकरांना करावा लागणार पाणीकपातीचा सामना

| उरण | प्रतिनिधी |

रानसई धरणाची पाणीपातळी घटल्याने यावर्षी २७ ऑक्टोबरपासूनच पाणीकपात जाहीर करण्यात आली आहे. दर आठवड्याला मंगळवार आणि शुक्रवार असे दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे, अशी माहिती उरणच्या एमआयडीसी कार्यालयाने दिली.

एल निनोच्या संकटामुळे पावसाने ओढ दिल्याने सर्वत्रच पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. उरण परिसरही पाणीटंचाई जाणवत आहे. तालुक्यातील शहर, ग्रामीण आणि औद्योगिक परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरणाची पाणीपातळी पावसाअभावी दररोज घटत आहे. यामुळे उरणकरांना ऑक्टोबर महिन्यापासूनच गरजे इतक्यात पाण्यासाठी आणखी दहा महिन्यांपर्यंत संघर्ष करावा लागणार आहे. पाणीपुरवठ्याचे पर्यायी स्रोत नसल्याने उरणकरांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन शासकीय स्तरावरून केले जात आहे.



उरण तालुक्यात रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जातो. तर पूर्व भागातील १० गावांतील ३५ हजार रहिवाशांना पुनाडे धरणातून पुरवठा होतो. तर चिरनेर, कोप्रोली, खोपटा या ग्रामपंचायतींना सिडकोच्या हेटवणे धरणातून पाणीपुरवठा केला जातो.

तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरणाची उंची ११६ फूट आहे. मात्र पावसाअभावी रोज धरणाची पाणीपातळी एका इंचाचे कमी होत चालली आहे. जलकुंभ, पाणी शुद्धीकरण यंत्रणाही सुस्थितीत आहे. तसेच जलवाहिन्यांतील गळतीचे प्रमाणही अत्यल्प आहे. मात्र याउपरही दररोज धरणातील घटणारी पाण्याची पातळी सर्वांसाठी चिंताजनक बाब आहे.

शासनाने १६ ऑक्टोबरपासूनच १० टक्के पाणीकपातीचे आदेश दिले आहेत. मात्र उरणच्या नागरिकांसाठी असलेली पाणीकपात येत्या मंगळवार २७ ऑक्टोबरपासून लागू करण्यात येणार असल्याची माहिती उरण एमआयडीसीचे उप अभियंता तानाजी कांबळे यांनी दिली. पावसाअभावी आलेल्या भीषण पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी नागरिकांनी पाणी जपून वापर करण्याचे आवाहन कांबळे यांनी केले आहे.

> “शासनाने १६ ऑक्टोबरपासूनच १० टक्के पाणीकपातीचे आदेश दिले आहेत. मात्र उरणच्या नागरिकांसाठी असलेली पाणीकपात येत्या मंगळवार २७ ऑक्टोबरपासून लागू करण्यात येणार आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी नागरिकांनी पाणी जपून आणि काटकसरीने वापरावे. – तानाजी कांबळे, उप अभियंता, एमआयडीसी, उरण”

पनवेल महानगरपालिका, पनवेल

जाहिर सुचना विद्युत विभाग

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer/Dealer/ Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/विद्युत/९९२६/प्र.क्र.०२/१२४२/२०२६
दिनांक- २२/१०/२०२६

सही/-
विद्युत विभाग प्रमुख
पनवेल महानगरपालिका

अर्जदाराचे वकील ॲड. सोनम गुरूनाथ ठाकूर
जाहिर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र. २७३/२०२६
नि. ७/ड
ने.ता. २६/११/२६

१. श्री. संजय चंदर पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय: शेती,
२. श्री. नितीन चंदर पाटील
वय : ४२ वर्षे, व्यवसाय: शेती,
दोघेही रा. दिघोडे, पो. जासई, ता. उरण,
पिनकोड ४१०२०६ जि. रायगड ... अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. चंदर सखाराम पाटील, ता. ०२/०१/२०१४ रोजी मौजे. दिघोडे, ता उरण येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे कै. चंदर सखाराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत.

मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड.

अ.क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
१.	९९	१	०-२९-१०	३.४४
२	११६	१ उ	०-०२-००	०.०९

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार हेच कै. चंदर सखाराम पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज ता १४/१०/२०२६ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली.

सही — क. लिपिक, दि.न्या. कनिष्ठ स्तर, उरण
कोर्टाचा शिक्का
सही — सह-अधिक्षक, दि. न्या. कनिष्ठ स्तर, उरण

अर्जदाराचे वकील ॲड. सोनम गुरूनाथ ठाकूर
जाहिर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र. २७५/२०२६
नि. ७/ड
ने.ता. २६/११/२६

१. श्रीमती अनिता अरूण ठाकुर
वय : ५६ वर्षे, व्यवसाय: शेती,
२. श्री. विद्याधर अरूण ठाकुर
वय : ३६ वर्षे, व्यवसाय: शेती,
३. श्री. अनिरूद्ध अरूण ठाकुर
वय : ३३ वर्षे, व्यवसाय: शेती,
वरील सर्व रा. दिघोडे, पो. जासई, ता. उरण,
पिनकोड ४१०२०६ जि. रायगड ... अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. अरूण रमण ठाकुर, ता. २३/०२/२००७ रोजी मौजे दिघोडे, ता. उरण येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे कै. अरूण रमण ठाकुर यांचे कायदेशीर वारस आहेत.

मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड.

अ.क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
१.	९९	५	०-४५-३०	५.२६

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार हेच कै. अरूण रमण ठाकुर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज ता १४/१०/२०२६ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली.

सही — क. लिपिक, दि.न्या. कनिष्ठ स्तर, उरण
कोर्टाचा शिक्का
सही — सह-अधिक्षक, दि.न्या. कनिष्ठ स्तर, उरण

Change in Name

I SUPRIYA SUDHIR PAWAR RESIDENT AT POST NIJAMPUR, TALUKA MANGAON, DISTRICT RAIGAD, 402120, DECLARE AND AFFIRM AS UNDER, **MY OLD NAME (BEFORE MARRIAGE) WAS GEETA RAMCHANDRA PATIL.** I HAVE CHANGED **MY NAME TO SUPRIYA SUDHIR PAWAR** FOR ALL FUTURE PURPOSES.

SIGN
SUPRIYA SUDHIR PAWAR
(New Name)

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे आशाणे :- ता कर्जत, जि रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, व त्या मिळकतीचे मालक श्री.वसंत कृष्णाजी दांडगे यांच्याकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-
मौजे-आशाणे, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकत

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्र (चौ.मी)	आकार (रुपये -पैसे)
५९	५	१.७६	१७.६०

वरील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकारार, गहाणखत, फरोक्त, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारात कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणतीही हरकत न घेतल्यास/आल्यास वरील मिळकत या बोजारहीत व निर्वेध आहेत असे समजून मिळकतीचा खरेदीचा व्यवहार जमीन मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २३/१०/२०२६

ॲड. वैभव अशोक शिंदे
बी.एस. सी. एल.एल.बी
पत्ता:- ११, साई सावली अपार्टमेंट
कर्जत कोर्ट जवळ, कर्जत, ता कर्जत
जि. रायगड. ४१०२०१.
मो. ७७४४८५१४६९/७०५८८५१२२१

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक निशा विवेक भगत व श्री. विवेक पंढरीनाथ भगत दोघे रा. १/६ बी, लिलावती छोटूबाई चाळ, ठाकूरद्वार रोड, राम मंदिराजवळ, झावबा वाडी, मुंबई- ४०० ००२ यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर माझे अशिल यांनी केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	हि.नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
चौल	७३८	-	०-०२-१०	१.०६
ता. अलिबाग		पो.ख.	०-००-२०	
		एकूण	०-०२-३०	

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २२/१०/२०२६ सही/-

ॲड. धिरज जयवंत म्हात्रे
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे वढाव खुर्द ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकतींचे विद्यमान मालक १. श्री. रेवती कृष्णा राऊत, २. विद्या कृष्णा राऊत, ३. संध्या कृष्णा राऊत, ४. सुषमा कृष्णा राऊत रा. वढाव खुर्द ता. अलिबाग जि. रायगड यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

गट क्रमांक	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पैसे)
४२	०-६४-०	१५.१९

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार, भाडेपट्टा, करार खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग
तारीख : २२/१०/२०२६

ॲड. रेखा किरण वाघ
अलिबाग-रायगड

फोन नं.-२४५५३५

ग्रुप ग्रामपंचायत नागांव

मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड, पिन-४०२ २०४

जावक क्र. -१३६५ दिनांक - ०७/१०/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हित संबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्राम पंचायत नागांव कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतर करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ.क्र	गावाचे नांव	घर क्रमांक	असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव	नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव
१.	नागांव कवळे परोडा	४९८	राजाराम विठोबा कवळे	समिर कृष्णा कवळे
२.	बागमळा	३१३७	अभय दत्तात्रेय घरत	दयानंद दत्तात्रेय घरत
३.	नागाव बंदर	२८६८	राधिका सुनीलकुमार ठाकूर	अनिता केशव महाले
४.	मांद्रेकर कॉलनी	३१४३	सोमनाथ सुभाष चतुर	केतन रत्नाकर पाटील

सही/-
सौ.हर्षदा निखील मयेकर
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत नागाव

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक मे. आकाश एंटरप्रायझेस तर्फे डायरेक्टर नंदकिशोर लक्ष्मीनारायण कागलीवाल कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे- मांडवणे, तालुका - कर्जत, जि.- रायगड येथील जमिन मिळकत

गावाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रू. पै.
मौजे मांडवणे	२०	१	१.६७.०० पैकी क्षेत्र ०.४३.१६ (४७,००० चौ. फूट)	१.३७

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २३/१०/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ता. ५०४, गजवक्र रेसिडेन्सी, पाचवा मजला, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या क्षेत्राची मिळकत त्या मिळकतीचे मालक नंदकिशोर लक्ष्मीनारायण कागलीवाल मे.अंशु फार्म इंटरप्रायझेस चे डायरेक्टर यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर	आकार रु. पै.
६९	१	एकुण क्षेत्र १.९६.०० पैकी ०.५०.००	०.१९

सबब सदर क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर केलेल्या क्षेत्री मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील क्षेत्राच्या मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या क्षेत्राचे मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/१०/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी, खालील वर्णन केलेल्या शेतजमिनींच्या मिळकतीचे मालकांबरोबर बोलणी करुन सदर शेतजमिनीची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे :

शेतजमिनीचे वर्णन
मौजे - कळंब, तालुका कर्जत, जि.रायगड

गट नं./ भुमापन क्रमांक	हिस्सा नं./ उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु. पै.
१५०	२	०-०७-००	०.०८

वरील वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीच्या मालकी हक्कात व ७/१२ सदरी श्री. रमेश बापुराव देशमुख, श्री.सुरेश बापुराव देशमुख, श्री.शरद बापुराव देशमुख, श्री.दिलीप बापुराव देशमुख यांचे नांवाची नोंद आहे आणि त्यांनी सदर शेतजमिनीची मिळकत आमचे अशिल यांना, कायम स्वरुपी विकण्याचे ठरविले आहे.

तरी सदर व्यवहाराबाबत वरील वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीशी कोणाही व्यक्तिचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यु. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्या व्यक्तीने असलेल्या हक्काबाबत त्यांचेजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत आली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : .१०.२०२६

वकील : ॲड. कुणाल कमळाकर म्हात्रे
पत्ता : तळमजला, फ्लॅट नं. ०४,
मंजुषा अपार्टमेंट, स्टेटस हॉटेलचे शेजारी,
गार्डन हॉटेलचे मागे, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
मो. नं. ८१६९७४५५५१

अर्जदाराचे वकील ॲड.सोनम गुरूनाथ ठाकूर

जाहिर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.२७४/२०२६
नि ७/ड
ने.ता. ६/११/२०२६

श्रीमती सुशिला विठोबा ठाकुर
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : शेती,
रा. दिघोडे, पो. जासई,
पिनकोड ४१०२०६ ता. उरण, जि. रायगड अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की. कै. विठोबा पंढरीनाथ ठाकुर, ता. २२/०७/२०१४ रोजी मौजे.दिघोडे, ता.उरण येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे कै. विठोबा पंढरीनाथ ठाकुर यांचे कायदेशीर वारस आहेत.

मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड.

अ.क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
१	९९	४	०-०९-४०	१.०६
२	९९	७	०-०१-३०	०.१६

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार हेच कै. विठोबा पंढरीनाथ ठाकुर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तूतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज ता १४/१०/२०२६ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली.

सही/- **क.लिपिक**, **दि.न्या.कनिष्ठ स्तर उरण**
कोर्टाचा शिक्का
सही/- **सह-अधिक्षक**, **दि.न्या.कनिष्ठ स्तर उरण**

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वाडगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत सौ. मनीषा संजीव दाभोळकर, राहणार गोरेगाव, मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील सौ. मनीषा संजीव दाभोळकर, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
वाडगाव, ता.अलिबाग.	३८	०-६१-६० ०-०५-५० पो.ख. ०-६७-१० एकूण	१४-८१

अलिबाग,
दिनांक : २३/१०/२०२६ सही/

(ॲड. प्रदीप प्रभाकर गावंड)
बी.एस.सी.एल.एल.बी.,
संकल्पसिद्धी अपार्टमेंट, तळमजला,
के.ई.एस. हायस्कूल जवळ, ब्राम्हण आळी,
अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक (१) दामोदर नागु ठाकूर (२) गुलाब मारुती ठाकूर (३) महेश मारुती ठाकूर (४) लता हेमंत म्हात्रे (५) शैला सुनिल ठाकूर (६) सुरज सुनिल ठाकूर (७) निलेश सुनिल ठाकूर (८) ताराबाई पांडुरंग ठाकूर (९) अनिल पांडुरंग ठाकूर (१०) गीता गणेश पाटील (११) अस्मिता दत्तात्रेय ठाकूर (१२) आयुष दत्तात्रेय ठाकूर (१३) आदित्य दत्तात्रेय ठाकूर (१४) श्रद्धा श्रावण पाटील (१५) जयंता चंद्रकांत ठाकूर (१६) आदिती अंकुश ठाकूर आणि (१७) अर्पिता अंकुश ठाकूर यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अनुसूची
(मिळकतीचे वर्णन)

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे कामार्ले, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली गट क्रमांक २४३ (पूर्वीचा गट क्रमांक २९२ व त्यापूर्वीचा सर्व्हे क्रमांक ४८/१/१/अ/१), एकूण क्षेत्रफळ ०.९७.०० हे.आर.चौ.मी., आकारणी रु. ०.९३ ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३ ऑक्टोबर २०२६

क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
vikrant.z@quadralegal.in

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरंडे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन कलेली जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक सुजाता जयंत नाईक, शैलेश जयंत नाईक, आशिष जयंत नाईक व स्वरांजली जयंत नाईक यांचेकडून मालकी हक्कांगासह कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
वरंडे	२०६	०-४०-४० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-४२-४०	९.३१

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, लीज, कोर्टात दावा, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, करार-मदार, विसार पावती व हितसंबंध वा कोणत्याही प्रकारे हक्क असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे ॲडव्होकेट यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून सदरचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २२/१०/२०२६

ॲड. वैभव गिरीधर पाटील
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो.कुर्डूस, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

प्रोसेस फि

अर्जदार तर्फे वकिल
सचिन दि. पाटील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात.

निशाणी नं.०६/ड
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३७/२०२६

श्री. अरविंद शिवराम जाधव .... अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार यांची बहीण कै. सुनिती शशिकांत जाधव ही दिनांक २९/१०/२०१५ रोजी मयत झालेली आहे. विविध सरकारी कार्यालयामध्ये सरकारी कामकाजाचेवेळी मयताचा वारसा दाखला मागितला जात असल्याने अर्जदार यांना कै. सुनिती शशिकांत जाधव यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला 'हेअरशिप सटिफिकेट' मिळावे म्हणून अर्जदार यांनी कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना अर्जदार यांची बहीण कै. सुनिती शशिकांत जाधव यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तींची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दिनांक २६/११/२०२६ पर्यंत स्वतंत्र किंवा त्यांचे वकीलांमार्फत सदरचे अर्जाकामी कोर्टामध्ये हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे ते कै. सुनिती शशिकांत जाधव यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला 'हेअरशिप सर्टिफिकेट' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांस येवून मे. कोर्टाकडून योग्य ते पुढील आदेश होतील.

आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

वरिष्ठ लिपीक,
दिवाणी न्यायाधिश
व.स्तर अलिबाग.

अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
व.स्तर अलिबाग.

महावितरणच्या उपकेंद्राला आंतरराष्ट्रीय मानांकन

खानावळे येथील उपकेंद्राचा गौरव; नवीन शाखा कार्यालयाचेही उद्घाटन

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात महावितरणच्या उपकेंद्राला प्रथमच आयएसओ ९००१:२०१५ हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले आहे. पनवेल ग्रामीण विभागांतर्गत गोदरेज सिटी, खानावळे येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या २० एमव्हीए क्षमतेच्या ३३/२२ किलोव्होल्ट उपकेंद्राला हा बहुमान मिळाला आहे. कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते सोमवारी (दि.१९) ऑक्टोबर रोजी मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी नवीन उपकेंद्रासह खानावळे येथील



शाखा कार्यालयाचेही उद्घाटन करण्यात आले.

पनवेल परिसरात झपाट्याने नागरीकरण होत असून, नवीन गृहप्रकल्प आणि विविध विकासकामांमुळे विजेची मागणी वाढण्याची शक्यता आहे. ही गरज लक्षात घेऊन उभारण्यात आलेले उपकेंद्र परिसरातील वीजपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यास मदत करणार आहे. वाढत्या वीजवापराचे नियोजन आणि

> मानांकन मिळवणे आव्हानात्मक असले, तरी ते टिकवून ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने आपलेपणाच्या भावनेतून काम करून व्यवस्थेची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.
> -दिलीप जगदाळे

ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी या उपकेंद्राचे महत्त्व वाढले आहे.

महावितरणच्या भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी नवीन वीज उपकेंद्रांची उभारणी करण्याबरोबरच त्यांची योग्य देखभाल करणे आवश्यक असल्याचे सांगितले. विद्युत सुरक्षेच्या नियमांचे पालन, योग्य अर्थिंग, नियमित नोंदी आणि ऊर्जेचे परीक्षण याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रायगड जिल्ह्यात आगामी काळात मोठ्या प्रमाणावर विकास होणार असून, त्यासाठी अखंडित वीजपुरवठा महत्त्वाचा ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला पेण मंडलाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, पनवेल ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता दिवाकर देशमुख यांच्यासह महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. या मानांकनामुळे गुणवत्ता व्यवस्थापन आणि ग्राहकसेवेच्या दृष्टीने महावितरणच्या रायगड जिल्ह्यातील कामकाजात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

निवडक



रेवदंडा येथे 'आपला बाजार'चा शुभारंभ

रेवदंडा : रेवदंडा पारनाका परिसरात रायगड बाजारच्या 'आपला बाजार' या नवीन शाखेचा शुभारंभ बुधवारी (दि.२१) ऑक्टोबर रोजी उत्साहात संपन्न झाला. या नवीन शाखेमुळे परिसरातील ग्राहकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू रास्त दरात उपलब्ध होणार आहेत. या शाखेमध्ये कडधान्ये, धान्य, खाद्यतेल, मसाले यांसह दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू रास्त दरात विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापनाच्या वतीने देण्यात आली. स्थानिक ग्राहकांना एकाच ठिकाणी आवश्यक वस्तू उपलब्ध व्हाव्यात आणि परवडणाऱ्या दरात खरेदी करता यावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. रेवदंडा पारनाका परिसरात सुरू झालेल्या या नवीन शाखेमुळे स्थानिक ग्राहकांना खरेदीसाठी आणखी एक सोयीचा पर्याय उपलब्ध झाला आहे. याप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सदाशिव (दादा) मोरे, सुरेश खोत, शरद वरसोलकर, प्रमोद (बाळू) नवखारकर तसेच शेकापचे रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



नानवलीत पाणी अडवा, पाणी जिरवा मोहीम

तळा : ग्रुप ग्रामपंचायत गिरणे यांच्या वतीने नानवली येथे मुख्यमंत्री पंचायतराज अभियान २.० अंतर्गत सेवा संकल्प अभियान राबवत वनराई बंधारे बांधण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून भूजल पातळी वाढवणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करणे हा आहे. या वनराई बंधाऱ्यांमुळे नानवली परिसरातील शेतीला आणि पिण्याच्या पाण्याच्या साठ्याला मोठा फायदा होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी गिरणे ग्रामपंचायतीच्या सरपंच लीला जाधव, नागेश लोखंडे, ग्रामसेवक अभिषेक मकू, संदेश सणस यांच्यासह नानवली येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या या पुढाकारामुळे गावात जलसंधारणाच्या कामाला गती मिळाली असून शासनाच्या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. श्रमदान आणि लोकसहभागातून उभारलेले हे बंधारे गावाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

पाण्याचा उपसा करणाऱ्यावर कारवाईची मागणी

रसायनी : राज्यात पाणीटंचाईचे संकट असताना पाताळगंगा नदीतून अनधिकृतरीत्या पाणी उपसा करून त्याची व्यावसायिक विक्री केली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या कथित पाणीचोरीची सखोल चौकशी करून पाणी उपसा करणाऱ्या टँकरचालकांसह संबंधित व्यक्ती व कंपन्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच, या प्रकाराला कोणाचा वरदहस्त आहे



आणि दोषींना कोण अभय देत आहे, याचाही शोध घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभाग अध्यक्ष राकेश खराडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याच्या पाटबंधारे विभागासह जिल्हा पाटबंधारे विभाग, कर्जत पाटबंधारे विभाग आणि खालापूर तहसीलदारांकडे कारवाईची मागणी केली आहे. रसायनी आणि पाताळगंगा औद्योगिक परिसरासाठी पाताळगंगा नदी हा महत्त्वाचा जलस्रोत आहे. या नदीच्या पाण्यावर परिसरातील नागरिक, शेतकरी आणि विविध घटक अवलंबून आहेत. मात्र, नदीतून पाणी उपसा करून टँकरद्वारे त्याची विक्री केली जात असल्याच्या तक्रारींमुळे जलसंपत्तीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

सुधागडात विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

पाली/बेणसे : द्या एक हात मदतीचा, सामाजिक बांधीलकीचा, शैक्षणिक क्रांतीचा या संकल्पनेतून गोरेगाव (मुंबई) येथील उन्नतनगर-अक्षय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून सुधागड तालुक्यातील दुर्गम भागातील शाळांमधील ३५८ गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना सँडल, दप्तर आणि शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. अजय देशलेहरा यांच्या विशेष सहकार्यातून व दातृत्वातून हा उपक्रम पार पडला.

पाताळगंगा नदीवरील कालवा बंद

■ पाणी मिळविण्यासाठी ग्रामस्थांचा एल्गार

| रसायनी | प्रतिनिधी |

पाताळगंगा नदीवरील खरसुंडी येथील बंधाऱ्यातून कालव्याद्वारे पौध, माजगाव, आंबिवली आणि वारद या गावांना मिळणारे पाणी गेल्या बारा वर्षांपासून बंद असल्याने परिसरातील शेती आणि पशुपालन संकटात सापडले आहे. पाण्याअभावी शेकडो हेक्टर शेतजमीन पडीक पडली असून, शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर कालवा तातडीने सुरू करण्यासाठी माजगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ग्रामस्थांची बैठक पार पडली. यावेळी कालवा सुरू करण्यासाठी एकजुटीने पाठपुरावा करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

या कालव्याच्या माध्यमातून पूर्वी परिसरातील भातशेतीला मुबलक पाणी मिळत होते. भातपिकासोबतच पालेभाज्या आणि फळभाज्यांचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात घेतले जात होते.



कालव्यातून सातत्याने पाणी वाहत असल्याने परिसर हिरवागार राहत होता. तसेच जनावरांसाठी मुबलक गवत उपलब्ध होत असल्याने पशुपालकांनाही मोठा आधार मिळत होता.

मात्र, गेल्या बारा वर्षांपासून कालवा बंद असल्याने शेतीच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पाण्याअभावी अनेक शेतकऱ्यांना शेती करणे कठीण झाले असून, काही ठिकाणी शेतजमीन पडीक ठेवण्याची वेळ आली आहे. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता हा प्रश्नही अधिक गंभीर झाला आहे.

पूर्वी डिसेंबर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात या कालव्याला पाणी सोडले जात असे. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना व शेतीच्या अन्य कामांना मदत होत होती. मात्र, अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा बंद असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यातच कालव्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, दुरुस्ती करून पाणीपुरवठा पूर्ववत करण्याची गरज आहे. कालवा सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधी, पाटबंधारे विभाग, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत संबंधित प्रशासनाकडे निवेदने सादर करण्याची तयारी ग्रामस्थांनी केली आहे. पाटबंधारे विभागाकडून कालवा सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आल्याचे सांगण्यात येत असले, तरी गेल्या बारा वर्षांपासून पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

ओवळेतील जीवघेणा अंडरपास

अपूर्ण रस्त्यामुळे ग्रामस्थ संतप्त

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन ओवळे येथील सेक्टर १ मधील मुख्य रस्त्यावरील अंडरपासचे काम अपूर्ण आणि एकमार्गी स्थितीत ठेवल्याने वाहतूक कोंडीसह अपघातांचा धोका वाढला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ॲड. विक्रांत घरत यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी रस्त्यावर बसून निषेध नोंदवला. तसेच संबंधित प्रशासनाला निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

रेल्वेच्या समर्पित मालवाहतूक मार्गिकेचे काम पूर्ण झाले असले, तरी अंडरपास आणि रस्त्याची समस्या कायम आहे. येण्या-जाण्यासाठी मर्यादित मार्ग उपलब्ध असल्याने या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असून, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

गेल्या दोन महिन्यांत या परिसरात अनेक अपघात झाले असून, काही जणांना जीव गमवावा लागल्याची माहिती ॲड. घरत यांनी दिली. अपघातांचा धोका कमी करण्यासाठी या मार्गावर तातडीने गतिरोधक बसवावेत, तसेच सिडको, रेल्वे, एनएचएआय आणि वाहतूक पोलिसांनी समन्वय साधून तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. १५ दिवसांत ठोस उपाययोजना न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला. या निषेध आंदोलनात परिसरातील ग्रामस्थ, तरुण आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सिमेंटच्या जंगलात पक्ष्यांचा अधिवास धोक्यात

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

उरण परिसरात वेगाने सुरू असलेले बांधकाम प्रकल्प, उभ्या राहणाऱ्या टोलेजंग इमारती आणि विस्तारत जाणारे सिमेंटचे जंगल यामुळे नैसर्गिक अधिवासांवर परिणाम होण्याची चिंता व्यक्त होत आहे. एकीकडे विकासाची गती वाढत असताना दुसरीकडे पाणथळ जागा, गवताळ प्रदेश आणि नैसर्गिक अधिवास कमी होत असल्याने पक्ष्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



परदेशातून येणारे स्थलांतरित पक्षी तसेच दुर्मिळ पक्ष्यांसाठी उरण परिसरातील नैसर्गिक अधिवास महत्त्वाचे ठरू शकतात. मात्र, विकासकामांच्या रेट्यात या जागा बुजवल्या गेल्या किंवा त्यांचे स्वरूप बदलले, तर पक्ष्यांच्या अधिवासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

उरण परिसरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. वाढते नागरीकरण, पाणथळ जागांवरील अतिक्रमण, गवताळ भागांमध्ये होणारे बदल यामुळे जैवविविधतेच्या संवर्धनाचे आव्हान निर्माण होत आहे.

विकासासोबत पर्यावरण संतुलन महत्त्वाचे

विकासाला विरोध करण्याऐवजी विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखणे गरजेचे आहे. पाणथळ जागांचे संरक्षण, गवताळ प्रदेशांचे जतन आणि पक्ष्यांच्या अधिवासांमध्ये अनावश्यक हस्तक्षेप टाळण्यासाठी शासन व संबंधित यंत्रणांनी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. पर्यावरणविषयक नियमांची प्रभावी अंमलबजावणी आणि बांधकाम प्रकल्पांवर योग्य देखरेख ठेवण्याचीही गरज आहे.



● मुरूड येथील जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला झाला आहे. सध्या पर्यटकांची संख्या कमी असली तरी शिडाच्या बोटीतून जाण्याचा आनंद वेगळाच आहे. पर्यटक शिडाच्या बोटीतून जाताना. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

ज्येष्ठ नागरिकांनी जपली उटणे बनविण्याची परंपरा कायम

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक संघातील सभासद सुगंधित उटणे तयार करण्याच्या कामाला लागतात. उटणे तयार करणे, पाकिटे बनवून त्यांची विक्री करून संघासाठी उत्पन्न मिळविणे, हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. दीपावलीच्या अभ्यंगस्नानासाठी सुगंधित उटण्याला विशेष महत्त्व आहे. हीच परंपरा पुढे नेण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद दरवर्षी एकत्र येऊन उटणे तयार करतात. त्याची आकर्षक पाकिटे बनवून विक्री केली जाते. अनेक संस्था आणि नागरिकही दीपावलीसाठी



या संघाकडून उटणे खरेदी करतात. त्यामुळे या उपक्रमातून पारंपरिक संस्कृतीचे जतन होण्याबरोबरच संघाला आर्थिक हातभारही लागतो.

यंदा उटण्याच्या मागणीत घट झाल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षांत विविध संस्था आणि राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर उटण्याच्या ऑर्डर मिळत होत्या. त्यामुळे दरवर्षी सुमारे ५० किलो उटणे तयार केले जात होते.

पाली-भूतिवलीतील धरणग्रस्त आक्रमक

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात २००४ मध्ये पाणी अडवण्यात आलेल्या पाली-भूतिवली धरणग्रस्तांच्या सोयी सुविधा मिळालेल्या नाहीत. त्यामुळे धरणग्रस्तांनी राज्याचे महसूल मंत्र्यांना लोकशाही दिनाच्या दिवशी केलेल्या अर्जाची सुनावणी जिल्हा भूसंपादन अधिकारी कार्यालयात झाली. मात्र, कोणत्याही मागण्यांवर शासन ठोस उपाय योजना होत नसल्याने प्रकल्पग्रस्त समितीने नाराजी व्यक्त केली. दरम्यान, धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर २५ वर्षानंतर देखील शासन प्रकल्पग्रस्तांची दिशाभूल करीत असल्याचा आरोप समितीने भूसंपादन अधिकारी यांच्या भेटीनंतर व्यक्त केला.



प्रकल्पग्रस्तांकडून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना अर्ज सादर केले होते. अर्जानुसार कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हा भूसंपादन अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. या सुनावणीला पाली भूतिवली धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष मंगेश गायकर, सचिन गायकवाड, सचिन गायकर, प्रदीप गायकर, पंकज गायकर, प्रतीक गायकर उपस्थित होते.

या बैठकीत धरणग्रस्तांनी दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही व्हावी अशी मागणी सचिन गायकवाड यांनी केली. मात्र, बैठकीला पाटबंधारे विभागाचे अधिकारी अनुपस्थित असल्याने शासन कोणाच्या आधारे निर्णय घेणार अशी विचारणा केली. बैठकीत कुठलाही ठोस निर्णय घेऊ न शकल्यामुळे त्यामुळे प्रकल्पग्रस्तांची दिशाभूल करण्याचे काम शासन करीत असल्याचा आरोप गायकवाड केला.

उपचारादरम्यान व्यक्तीचा मृत्यू

पनवेल : गांधी हॉस्पिटलजवळ बेशुद्धावस्थेत आढळलेल्या अंदाजे ५० ते ५५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. २० ऑक्टोबर रोजी गांधी हॉस्पिटलजवळ एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडलेली आढळली. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. या बाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिवासांच्या शोधात लवकरच स्थलांतर | पाणथळ परिसंस्थेच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष

फ्लेमिंगोंना आकर्षित करणाऱ्या जागा धोक्यात

| उरण | प्रतिनिधी |

यंदाच्या हिवाळ्यात नवी मुंबई आणि मुंबई परिसरात फ्लेमिंगो पक्ष्यांचे लवकर आणि मोठ्या संख्येने आगमन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, त्यांना आकर्षित करणाऱ्या पाणथळ जागांची स्थिती खालावली असल्याने पर्यावरणप्रेमींनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. कच्छमध्ये यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पाण्याची पातळी आणि खाद्य उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे योग्य खाद्य अधिवासांच्या शोधात फ्लेमिंगो नेहमीपेक्षा लवकर स्थलांतर करू



शकतात, असे सृष्टी कन्झर्व्हेशन फाऊंडेशनचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ मृगांक प्रभू यांनी सांगितले.

मात्र, प्रदूषित पाणी, शेवाळाची अतिवाढ आणि भरती-ओहोटीच्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळे यांमुळे डीपीएस फ्लेमिंगो लेक, एनआरआय वेटलँड आणि टी. एस. चाणक्य वेटलँड या प्रमुख अधिवासांची स्थिती फ्लेमिंगोंच्या स्वागतासाठी पुरेशी चांगली नसल्याचे नॅट कनेक्ट फाऊंडेशने म्हटले आहे. संस्थेचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले की, या वर्षीच्या सुरुवातीला खासगी प्रयोगशाळेत केलेल्या पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीत प्रदूषणाचे वाढलेले निर्देशक आढळले. नेरूळमधील एनआरआय वेटलँडमध्ये शेवाळाची प्रचंड वाढ झाली असून, टी. एस. चाणक्य तलावात अतिक्रमण आणि जलप्रवाहात हस्तक्षेप होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

स्वर्णश्रुष्टी हॅबिटॅट रिस्टोरेशन फाऊंडेशनच्या संचालिका ज्योती नाडकर्णी यांनी न्यायालयाचे आदेश आणि समित्यांची नियुक्ती होऊनही कांदळवन-पाणथळ परिसंस्थेच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल खेद व्यक्त केला. या अधिवासांच्या ऱ्हासामुळे पक्षीनिरीक्षण, निसर्गशिक्षण आणि स्थानिक पर्यटनाच्या मोठ्या संधी वाया जात असून, स्थानिक मार्गदर्शक, वाहतूक व आतिथ्य क्षेत्राला मिळणारा फायदा धोक्यात आला आहे, असेही

> पाणथळ जागांचे आरोग्य केवळ फ्लेमिंगोंसाठीच नव्हे, तर मासेमारी समुदायांना आधार देण्यासाठी आणि पुराच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या नैसर्गिक स्पंजप्रमाणे काम करण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. फ्लेमिंगोंच्या आगमनापूर्वी या जागांची तातडीने स्वच्छता करावी.
> -संदीप सरीन

पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे.

नागेवाडी शाळेमध्ये वृक्ष लागवड

| कर्जत | प्रतिनिधी |

सदभाव फाऊंडेशन मुंबई यांच्या सौजन्याने नागेवाडी येथे प्राथमिक शाळेमध्ये वृक्ष वाटप आणि लागवड कार्यक्रम करण्यात आला. सदभाव फाऊंडेशन ट्रस्टी नीता बेन दोशी अध्यक्ष स्थानी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची प्रस्तावना विनोद पाटील यांनी केली. प्रमुख पाहुणे व शाळेचे मुख्याध्यापक आणि बिपीन भाई, सुनंदा लाड उपस्थित होते. याप्रसंगी प्रथम दिप प्रज्वलन व गणेशाचे पुजन करण्यात आले. सुनंदा लाड यांनी ग्रामस्थांना स्वच्छते विषयी व झाडांचे महत्त्व सागितले. या कार्यक्रमाला संतोष ढाकवळ व प्रगती पाटील, प्रतिक्षा दगडे व नागेवाडीचे ग्रामस्थ व महिला वर्ग व पुरुष वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांना रोजगार उपलब्ध होईल अशी ६०० झाडे ग्रामस्थांना वाटप करण्यात आले.





राशीभविष्य

- **मेष :** नोकरी–व्यवसायात आनंददायी घटना घडतील. हाती पैसा आल्याने समाधान लाभेल. प्रगती होईल.
- **वृषभ :** कौटुंबिक जीवनात सुख–समाधान लाभेल. महत्त्वाची कामं पार पडतील. अनुकूलता वाढत जाईल.
- **मिथुन :** पैशाअभावी रेंगाळलेली कामं मार्गी लागतील. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. प्रकृती उत्तम राहील.
- **कर्क :** नोकरी–व्यवसायात समाधानकारक घटना घडतील. प्राप्तीचं प्रमाण चांगलं राहील. मुलांना यश लाभेल.
- **सिंह :** नियोजन अचूक ठरेल. सरकारी कामं मनासारखी होतील. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच राहील.
- **कन्या :** हाती पैसा आल्याने समाधान लाभेल. व्यवसायात धडाडीने निर्णय घ्याल. बाकी चिंता करू नये.
- **तूळ :** प्राप्ती वाढल्याने समाधान लाभेल. नव्या योजनांना गती प्राप्त होईल. नोकरीत नव्या संधी लाभतील.
- **वृश्चिक :** आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कलेचा गौरव होईल. नोकरीत कामाचा व्याप वाढणार आहे.
- **धनु :** महत्त्वाच्या संधी लाभणार आहेत. सत्संग घडेल. नोकरीत कला–गुणांना चांगल्या संधी लाभतील.
- **मकर :** व्यवसायात समाधानकारक प्रगती होईल. योजना साकार करता येतील. कलेतून अर्थार्जन घडेल.
- **कुंभ :** .यवसायात नव्या योजना साकार होतील. प्राप्तीचं प्रमाण बऱ्यापैकी राहील. मित्रांचं सहकार्य लाभेल.
- **मीन :** कामाचं अचूक नियोजन लाभदायक ठरेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सुसंधींचा लाभ उठवावा.

फॅशन पॅशन

जमाना जीन्सचा

जीन्स हा आजच्या जमान्यातला अत्यंत आरामदायी पेहराव कोणत्याही सीझनमध्ये कॅरी करता येते. व्हाईट स्नीकर्स आणि बॅग्जनंतर आता व्हाईट जीन्सची चलती आहे. उन्हाळा म्हटला की लाईट शेड्सचा वापर वाढतो. त्यातच पांढऱ्या रंगामुळे शरीराला थंडावा मिळतो. जीन्स कोणत्या प्रकारच्या टॉपसोबत उठून दिसेल याबाबतच्या टिप्स... व्हाईट ऑन व्हाईट हे कॉम्बिनेशन छान दिसतं. व्हाईट जीन्ससोबत बोल्ड प्रिंटवाले टॉप्स कॅरी करा. पांढऱ्या रंगाचे टॉप्स निवडा. व्हाईट बेसवरचे बोल्ड डिझाइन्स उठून दिसतील. व्हाईट जीन्स आणि कोणत्याही रंगाचा फ्लोरल टॉप खूप शोभून दिसेल. ब्लू, ब्लॅक, रेड, नेव्ही ब्लू, येलो असे रंगांचे असंख्य पर्याय तुमच्याकडे आहेत. व्हाईट डेनिम्ससोबत डेनिम टॉप कॅरी करता येईल. हा कूल ऑप्शन आहे. या लूकला ॲक्सेसरीजने खुलवता येईल. कॅप, ब्रेसलेट, ट्रेंडी नेकलेस असं बरंच काही कॅरी करता येईल. व्हाईट जीन्ससोबत गडद रंगाचे टॉप्सही कॅरी करता येतील. हे कॉम्बिनेशन दिवसा आणि रात्रीही शोभून दिसेल.

दिन विशेष

२३ ऑक्टोबर

१९२४ : संगीतकार, गायक, नट पं. राम मराठे यांचा जन्म.
१९३७ : अभिनेता, दिग्दर्शक देवेन वर्मा यांचा जन्म.
१९४० : ब्राझिलियन फुटबॉल खेळाडू पेले यांचा जन्म.
१९७८ : इंग्लिश क्रिकेटपटू स्टीव हार्मिसन याचा जन्म.
१९९७ : जर्मनीचं योजेस ब्यूज पारितोषिक किरण बेदी यांना प्रदान.
२०१३ : भारत आणि चीनदरम्यान सीमा संरक्षण सहकार्यविषयक करारावर स्वाक्षऱ्या.

सायबर क्राईम


हॅकर्सपासून सावध राहा

हल्ली ऑनलाइन गेम्समध्येही व्हायरस, माहितीची चोरी आणि फिशिंग हल्ल्यांचे धोके आहेत. त्यामुळे असे खेळ सावधगिरीने खेळणे चांगले. वेगवेगळ्या गेम्समध्ये वापरकर्ताचे नाव आणि पासवर्ड समान वापरल्याने लॉगिन करणे सोपे होते. पण ही बाब हॅकर्सना अकाऊंट हॅक करण्यासाठी अधिक सोपी ठरते. म्हणून पासवर्ड आणि वापरकर्त्याचे नाव बदलत रहा. हॅकर्स गेमरची नाव, घराचा पत्ता, फोन नंबर किंवा इतर ओळख काढू शकतात आणि ती ऑनलाइन सार्वजनिक करू शकतात. हे गुंडगिरी किंवा अपमान करण्याच्या हेतूने देखील केले जाऊ शकते. त्यामुळे हा धोका लक्षात घ्या. कधीकधी गेमर प्ले स्टोअरवर आवडत्या व्हिडिओ गेमच्या स्वस्त आणि विनामूल्य आवृत्त्या शोधतात. ती डाउनलोड करतात तेव्हा मात्र मालवेअर आणि व्हायरसही डाउनलोड होण्याचा धोका असतो. मुलांशी मैत्री केल्यानंतर गुन्हेगार त्यांना पत्ता, शाळा, नाव किंवा जन्मतारीख यासारखी माहिती विचारू शकतो. त्याला भेटायलाही बोलावतो. ही बाब वेळीच पालकांना सांगा.

आरोग्यमंत्र

डेंटिस्टकडे जाण्यापूर्वी

दंतवैद्यांची, डेंटल क्लिनिकमधील वातावरणाची भीती असणं यालाच डेंटल फोबिया किंवा एंग्झायटी म्हणतात. अशी भीती निर्माण होण्यामागे अनेक कारणं आहेत. आधीच्या वेदनादायी अनुभवानंतर पुन्हा असा अनुभव घेताना भीती वाटू शकते. असुरक्षिततेची भावना, उपचारासाठी खुर्चीवर बसल्यानंतर वाटणारी भीती, स्वत:वर नियंत्रण न राहणं, तोंड उघडताना वाटणारी अस्वस्थता, ओशाळलेपण यामुळे अशी समस्या निर्माण होऊ शकते. डेंटिस्टकडे जाण्याआधी अस्वस्थ वाटणं, झोप न येणं, डॉक्टरकडे गेल्यानंतर ताण येणं, निराश, हताश वाटणं, डेंटिस्टकडे जाण्याआधी आजारी असल्यासारखं वाटणं, दातांची तपासणी होत असताना भीती वाटणं आणि श्वास घ्यायला त्रास होणं ही या त्रासाची लक्षणं मानता येतील. या विकारावर उपचार शक्य आहेत. आपली भीती दंततज्ज्ञाकडे व्यक्त करा. दातांच्या उपचारांविषयी डेंटिस्टशी बोलून घ्या. उपचारांदरम्यान लक्ष दुसरीकडे वळवा. गाणी ऐका, तीव्ही बघा. वेदना कमी करण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी वेदनाशामक औषधं घेता येतील. याविषयी दंततज्ज्ञाशी बोला. ताण निवारणाच्या उपाययोजना करा. डेंटिस्टकडे जाण्यापेक्षा दातांच्या वेदना सहन करणं तुम्हाला अधिक योग्य वाटत असेल तर मानसोपचारतज्ज्ञाची मदत घ्या. उपचारानंतर दूर होणाऱ्या वेदनारहित आयुष्याचा विचार करा. सकारात्मकतेने ही भीती दूर सारा.



टेक्नो टॉक

सध्याच्या सेलमध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर भरपूर सवलत दिली जात आहे. या सवलतीच्या गंगेत हात धुवून घेत अनेक जण स्मार्टफोन खरेदी करतात. मात्र आधीचा फोन सुस्थितीत असताना नवा फोन अशा सेलमधून खरेदी करण्याची खरंच गरज आहे का, याचा विचार व्हायला हवा. तुमचा स्मार्टफोन तीन ते चार वर्षं जुना असेल किंवा दुरूस्तीची गरज असेल तरच नवा फोन खरेदी करा. फोर जी स्मार्टफोन असणारेही या पर्यायाचा विचार करू शकतात. मात्र तुमचा फोन चांगला असेल तर सेलमधून खरेदी करण्याची तशी काहीच आवश्यकता नाही.

पंचांग

शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन शु. १२, चंद्रराशी : कुंभ,
नक्षत्र : पू. भाद्रपदा, योग : ध्रुव,
सूर्योदय ६.३७, सूर्यास्त ६.०८

फॉरवर्ड्स

इतना मग़रूर मत बन हमें वक़्त कहतें हैं...

हमनें क़ई बादशाहों क़ो दरबान बनाया हैं...!

करिअरवाटा

मिळवा फायनान्सचं ज्ञान

कोणत्याही कंपनीचं कामकाज विविध विभागांमध्ये चालतं आणि त्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. विविध विभागांसाठी विक्री व्यवस्थापक, मनुष्यबळ, वित्तीय व्यवहार, नियोजन अशा व्यवस्थापकांची आवश्यकता असते. परंतु प्रत्येक शाखेशी निगडित स्पेशलाईज्ड अभ्यासक्रम पूर्ण केलेले व्यवस्थापक मिळतातच असं नाही. शिवाय एवढे व्यवस्थापक नेमणं कंपनीला शक्य होतंच असं नाही. त्यामुळे एकाच व्यवस्थापकावर सगळ्या विभागांचं काम सोपवलं जातं. अशी कायपद्धती असल्यामुळेच काही वेळा आय.टी.मध्ये तज्ज्ञ असणाऱ्या व्यवस्थापकाला अकौंटस्चं काम बघावं लागतं. याचाच विचार करूनच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोझिकोडे या संस्थेनं स्वतंत्र मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम तयार केला. या प्रोगॅममध्ये सध्या कामावर असलेल्या, अकौंटस्चं प्रशिक्षण न घेतलेल्या परंतु ते काम करावं लागणाऱ्या व्यवस्थापकांना प्रवेश दिला जातो. त्यांना इंडियन फिनान्शियल मार्केट, टाईम व्हॅल्यू ऑफ मनी, अंडरस्टँडींग फिनान्शियल स्टेटमेंट, कॅपिटल बजेटिंग, ब्रेक इव्हन ॲनॅलिसिस, बजेटरी कंट्रोल आणि स्टँडर्ड कॉस्टिंग आदी विषयांचं ज्ञानही दिलं जातं.



खेचाखेची

मोठी बायको

बायको पण वयाने थोडी मोठी असावी,
.
.
.
म्हणजे ओरडली तरी मनाला समाधान मोठी आहे ती आपल्यापेक्षा!

वेगळं काही

नशीब फळफळले

काही वेळा अनेकांना वेगळाच जॅकपॉट लाभतो. २०२० मध्ये हॉलिवूड अभिनेता रॉबर्ट हॉफमॅन हा मुंबईमध्ये आला होता. तेव्हा तो धारावीमध्ये राहणाऱ्या मलीशा खारवा नावाच्या चिमुकलीला भेटला होता. तेव्हा रॉबर्टने तिच्यासाठी 'गो फंड मी' नावाचे पेज सुरू करण्याचे ठरवले. त्यानंतर मलीशा लोकप्रिय होण्यास सुरुवात झाली. 'सोशल मीडिया'वर लोकप्रिय होताच तिला दोन हॉलिवूड चित्रपटांच्या ऑफर्सदेखील आल्या. तसेच तिने 'लिव योर फेयरीटेल' या 'शॉर्ट फिल्म' मध्येदेखील काम केले. ही शॉर्ट फिल्म युट्यूबवर आहे. या शॉर्ट फिल्ममध्ये पाच लहान मुलांची कथा दाखवण्यात आली आहे.

आरोग्य केसांचे

समुद्राच्या पाण्याने बिघडतो पोत

सुट्टीतील भटकंती म्हणून अनेकजण बीचची निवड करतात. समुद्रात मनसोक्त डुंबलं जातं. दंगामस्ती होते. पण समुद्रस्नानामुळे केसांचा पोत बिघडतो. ते टाळण्यासाठी सोप्या ट्रिक्स वापरून केसांची काळजी कशी घ्यावी हे जाणून घ्या.

❊ समुद्रकिनारी वास्तव्य असेपर्यंत एक दिवसाआड केसांचं कंडिशनिंग करावं. धूळ, ऊन आणि रेतीमुळे केस कोरडे होतात. हे लक्षात घेता केसांवर हेअर मास्कचा वापरही करता येऊ शकतो. ❊ समुद्रात जाण्यापूर्वी केस साध्या पाण्याने ओले करून घ्यावेत. त्यामुळे केसांकडून खारं पाणी कमी प्रमाणात शोषलं जाईल. ❊ बीचवर जाताना स्कार्फ आणि हॅट्चा वापर करणं गरजेचं ठरतं. त्यामुळे केसांचं नुकसान टाळणं शक्य आहे. ❊ बीचवर दिवसभर उन्हात राहिल्यानंतर केसांवर ड्रायरचा वापर करणं योग्य नाही. ब्लो ड्रायरने सुकवण्याऐवजी केस नैसर्गिकरित्या वाळवावेत. ❊ बीचवर जाताना केसांसाठी कुठलं प्रॉडक्ट योग्य ठरेल याचा अंदाज घ्या. केसांसाठी अँटी फ्रीजिंग प्रॉडक्ट आणि सन प्रोटेक्शन शँपूचा वापर करा. सीरमचा वापरही लाभदायक ठरेल.



सुडोकू १६४

३	१		४		७		२	
		६		५			४	
२				९				
८		७	६	१			९	
	२		७		४		६	
	४			३	९	१		७
				७				४
	६			२		८		
	७		८		१		३	९

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १६३ चे उत्तर

६	१	७	९	२	५	४	३	८
२	३	५	८	६	४	७	९	१
८	४	९	३	७	१	२	५	६
१	६	४	२	९	७	३	८	५
५	७	८	६	४	३	१	२	९
९	२	३	५	१	८	६	७	४
३	८	२	१	५	६	९	४	७
४	५	६	७	३	९	८	१	२
७	९	१	४	८	२	५	६	३

शब्दकोडे क्रमांक १६४



उभे शब्द :–

२) पूजा साहित्याचे ताट
३) यमनगरी
४) माकड (हिं) जहाजांचे स्थानक
५) औषध
६) अक्षरापुढील रेघ
७) आच्छादन
८) आजच्या आधीचा दिवस
९) चोविसावे नक्षत्र
१०) लवकर,
१२) जनगणना
१३) वर्ष, साल
१६) युद्ध
१७) व्यर्थ, निष्फळ
१८) आजच्या आधीचा दिवस
२०) फुला फलाचा फांदीला चिकटलेली छोटी दांडी
२२) दारूचा एक प्रकार
२३) ऐसपैस घातलेली मांडी
२५) पाणी
३०) कावळा
३२) सहस्त्र
३३) घळ
३४) दूर करणारा
३५) नसणारा, अनावश्यक
३७) नजर (अ.व.)
३८) पाप
४०) खग
४२) समशेर
४३) केव्हा (ग्रा)
४४) केव्हा(ग्रा)
४५) डाळीचे पीठ
४६) मंदवासर
४९) फाशी देणारा
५१) दारावरील खुणेचा आवाज
५२) प्रफुल्लित
५५) दारू, मद्य
५८) नष्ट होणारे
५९) वजनदार
६०) भ्रमर, भुंगा
६१) सपाट
६३) पुत्र
६५) पराजय
६७) निरर्थक घोषणा, बढाई
६८) पांडवांची संख्या केस,
७०) अत्युच्च, अतिशय
७१) वाचन
७२) वेडावाकडा वाढणारा एक औषधी कंद
७३) पारद
७४) श्वसनेंद्रिय
७५) अवधान, लक्ष, चित्त

आडवे शब्द :–

१) मत देण्याचे काम
४) कापडी नाडी
६) लाकूड
७) गगन
११) रुग्णालय
१३) सूट
१४) कडक
१५) वाळवी
१७) मोठे माकड
१९) श्रीकृष्णाच्या वडिलांचे नाव
२१) फळाचे साल
२४) मातीचा कण
२६) गार पाण्याचे मडके
२७) आणि
२८) मोठा नगारा, प्रसिद्धी, नौबत
२९) अभिप्राय
३१) स्वच्छंदी
३६) सोने
३८) करंजी, मोदकाचे आवरण
३९) वितरण
४१) पंजाबमधील एक नदी
४३) काटकसर
४६) बाण
४७) संगीतातील ठेका
४८) राजाचे निवासस्थान
५०) सरसकट
५३) हिस्सा
५४) प्रस्थान करणे
५६) केव्हा
५७) छाती
५९) सोन्याचा धागा
६०) सहाय्य
६१) किरकोळ सामान
६२) मध, गोड
६३) मोठी सुरी
६४) पवित्र
६६) लाकूड कापण्याचे हत्यार
६८) बसण्याची फळी
६९) जपजाप्य
७२) पूर्ण भेदून जाणारे
७४) नृत्य
७६) गणपतीचे एक नाव
७७) जन्म–मृत्यू

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

उ	प	न	य	न		अ	थां	ग		हो		ठा	णे
प	र	वा		य	था	र्थ		ड	ग	म	ग	णे	
का		ग	म	न		ही	न	गं	ड		वा	क	स
र	ज	त		बा	द	न		ज	ग		ही	र	
	न		क	ण			प		ने	म			क
म	क	रं	द		पा	च	र		र	हा	ट		ळ
	ज	ग	र	हा	टी		वा	रा		ज	प	त	प
म	न		दा		ल	हा	न	स	हा	न		क	
ध	नी		न	र		रा	गी		ट		श	त	क
मा		कौ		ज	पा			स	क	ट	नि	क	ट
शी	त	ल	ता		व	न	च	र		पा	वा		
	ळ		व	प	न		क		क	ल	र		चि
ह	वा	ल	दा	र		रा	म	र	स			सा	म
द्द			न	त	म	स्त	क		र	ज	त	व	णी

न्यूझीलंडवर भारताचा दणदणीत विजय

संजू सॅमसनच्या फटकेबाजीनंतर नमन धीरचा धमाका

| क्राइस्टचर्च | वृत्तसंस्था |

न्यूझीलंड दौऱ्याची भारताने चांगली सुरुवात केली आहे. पहिल्या टी २० सामन्यात दमदार विजय मिळवला. भारत आणि न्यूझीलंडमध्ये पाच टी २० सामन्यांची सीरीज होणार आहे. त्यातला पहिला सामना आज झाला. क्राइस्टचर्चमधील हेगले ओवल येथे हा सामना झाला. भारताने चार विकेटने पहिला टी २० सामना जिंकला. न्यूझीलंडने पहिली बॅटिंग केली. त्यांनी टीम इंडियासमोर विजयासाठी २२६ धावांचं अवघड लक्ष्य ठेवलं होतं. पण भारताच्या वाघांनी २ चेंडू बाकी असताना विजयी लक्ष्य गाठलं.

टी २० इंटरनॅशनलमध्ये भारताने पहिल्यांदा इतक्या मोठ्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला आहे. भारताचं टी २० इंटरनॅशनलमधील हा यशस्वी रनचेज ठरला. भारताच्या विजयाचे दोन हिरो ठरले. ओपनर संजू सॅमसन आणि नमन धीर. संजूने ६८ धावा करुन भारताच्या विजयाचा पाया रचला. नमन धीरने अवघ्या १५ चेंडूत ४२ धावा फटकावल्या. यात ५ फोर आणि २ सिक्स आहेत. न्यूझीलंड संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद २२५ धावांचा मोठा डोंगर उभा केला. त्यामुळे भारतीय संघासमोर विजयासाठी २२६ धावांचं मोठं लक्ष्य होतं. न्यूझीलंडच्या ग्लेन फिलिप्सने फलंदाजीमध्ये मोठी फटकेबाजी करत ४० चेंडूंत नाबाद ८२ धावा केल्या. त्याला फिन ॲलनने ४५, तर बेव्हन जेकब्सने ३१ धावा करत चांगली साथ दिली.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारतीय टीमने युरोप दौऱ्यावर निराशाजनक प्रदर्शन केलय. आयर्लंड आणि इंग्लंडच्या हातून लज्जास्पद पराभव झाला होता. आता न्यूझीलंडचा दौरा सोपा नाहीय. पण सुरुवात चांगली झाली आहे. भारताने रनचेजची तुफान सुरुवात केली. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा दोघांनी ५.५ ओव्हरमध्ये ९३ धावांची भागीदारी केली. सॅमसनने ८ चौकार आणि चार सिक्सच्या मदतीने ३३ चेंडूत ६७ धावा फटकावल्या. अभिषेकने १२ चेंडूत २९ धावांचं योगदान दिलं. यात तीन सिक्स आणि दोन फोर होते. मायकल ब्रेसवेलने अभिषेकला आऊट करुन ही जोडी फोडली. कॅप्टन मिचेल सँटरने सॅमसनला बाद केलं. ब्रेसवेलने मग तिलक वर्माचा विकेट काढला. सँटनरच्या फिरकीच्या जाळ्यात इशान किशनही अडकला.



श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलने पाचव्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी करुन भारताला सामन्यात आणलं. अक्षर पटेलने २४ धावा केल्या. त्याचा विकेट लॉकी फर्ग्यूसनने काढला. मग श्रेयस अय्यरने नमन धीर सोबत मिळून सहाव्या विकेटसाठी २२ चेंडूत ४३ धावा जोडल्या. श्रेयस अय्यरच्या १९ व्या ओव्हरच्या पहिल्या चेंडूवर आऊट झाला. श्रेयसने २ चौकार आणि एक सिक्स मारला. त्याने २८ चेंडूत ४२ धावांचं योगदान दिलं. नमन धीर आणि नितीश रेड्डी दोघांनी भारताला विजयाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचवलं.

न्यूझीलंडने टॉस गमावला. पहिली बॅटिंग करावी लागली. वेस्ट इंडिज सीरीजप्रमाणे या दौऱ्यातही गोलंदाजी भारताची कमकुवत बाजू ठरली. न्यूझीलंडने ४ विकेट बदल्यात २२५ धावांचा डोंगर उभा केला. जसप्रीत बुमराहशिवाय भारतीय गोलंदाजीची वास्तव परिस्थिती उघड झाली.या सामन्यात पहिल्याच चेंडूवर षटकार मारत अभिषेक शर्माने मोठा विक्रम केला.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्वतःच्या डावातील पहिल्याच चेंडूवर सर्वाधिक वेळा षटकार मारण्याच्या बाबतीत अभिषेक पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याच्या नावावर आता सात वेळा पहिल्याच चेंडूवर षटकार मारण्याची नोंद झाली आहे.

निवडक

मेगन शट दोन सामन्यांसाठी निलंबित

सिडनी : ऑस्ट्रेलियाची वेगवान गोलंदाज मेगन शटवर क्रिकेट ऑस्ट्रेलियाने दोन सामन्यांची बंदी घातली आहे. प्रिस्क्रिप्शन औषधाच्या वापराशी संबंधित नियमांचे पालन न केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.हे औषध कामगिरी वाढवणारे नव्हते.३३ वर्षीय शट आज न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात तसेच मधील ॲडलेड स्ट्रायकर्सच्या पहिल्या सामन्यात खेळू शकणार नाही. स्ट्रायकर्सचा सामना ३१ ऑक्टोबर रोजी मेलबर्न स्टार्सशी होणार आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात बंदीची माहिती दिली. शटने शिक्षा स्वीकारली आहे. दोन सामन्यांची बंदी आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत, दोन्ही क्रिकेटसाठी लागू असेल.क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सांगितले की, स्पोर्ट्स सायन्स अँड स्पोर्ट्स मेडिसिन मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रिस्क्रिप्शन औषधांशी संबंधित गरजांचे पालन न केल्यामुळे नियमांचे उल्लंघन झाले.शटने आपल्या निवेदनात म्हटले, मी दिलेली शिक्षा पूर्णपणे स्वीकारते आणि स्वतःसाठी ठरवलेल्या मानकांचे पालन न करू शकल्याबद्दल माफी मागते. मला मिळालेल्या सहकार्याची मी प्रशंसा करते.मेगन शटने डिसेंबर २०१२ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमधून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते.



महाराष्ट्राचा विनासंघनायक संघ जाहीर

मुंबई : बिहार येथील पाटलीपुत्र येथे होणाऱ्या ५२व्या कुमार राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राचा विनासंघनायक संघ जाहीर करण्यात आला. जितेश जोशी, आशिष म्हात्रे, रिशांक देवाडीगा यांच्या निवड समितीने निवडलेल्या या संघात परभणीचे ३, पुण्याचे २, तर अ. नगर, रत्नागिरी, सांगली, रायगड, कोल्हापूर, ठाणे, उपनगर, जालना व यजमान पालघर यांच्या १-१ खेळाडूची वर्णी लागली आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या व्यवस्थापन समितीच्या शांताराम जाधव, अभिलाषा म्हात्रे (दोन्ही अर्जुन पुरस्कार) व नितीन मदने (शिवछत्रपती पुरस्कार) यांच्या सहीने ही यादी जाहीर करण्यात आली. हा निवडण्यात आलेला संघ संघाचे प्रशिक्षक, प्रो-कबड्डी स्टार विशाल माने व सहा. प्रशिक्षक अजित शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पालघर येथे जोरदार सराव करीत आहे. हा निवडण्यात आलेला संघ गुरुवारी (दि. २९) दुपारी ०२-४५ वा. लोकमान्य टिळक टर्मिनस येथून स्पर्धेकरिता रवाना होईल. या संघाचे फिजिओ म्हणून ऋषिकांत पोळ यांची निवड करण्यात आली आहे. कुमार संघामध्ये अतुल जाधव-परभणी, ऋषिकेश जाधव-पुणे, शिवम गोरडे-अहिल्यानगर, प्रसाद दिघोळे-पुणे, शैलेश एडगे रत्नागिरी, सारंग रोकडे-परभणी, ओम् शिंदे-सांगली, समीर हिरवे-रायगड, सर्वेश नेहेरे-कोल्हापूर, रमेश गायकवाड-परभणी, मनीष घनवडे-ठाणे, कृष्णा सिंग- मुंबई उपनगर, लखन राठोड-जालना, सवैद पाटील-पालघर यांची निवड करण्यात आली. राखीव खेळाडूमध्ये सिद्धेश भोसले- मुंबई शहर, ओमकार दरकुंडे-अहिल्यानगर, वीरेंद्र मांडलिक-पुणे यांची निवड करण्यात आली. प्रशिक्षक विशाल माने, सहा. प्रशिक्षक अजित शेळके, व्यवस्थापक जगदीश तांडेल, फिजिओ ऋषिकेश पोळ यांची निवड करण्यात आली आहे.

अफगाणिस्तानचा सलग दुसरा विजय

दुबई : अफगाणिस्तानने वनडे तिरंगी मालिकेत बांगलादेशवर ७ विकेटने विजय मिळवला. अफगाण संघाचा हा सलग दुसरा विजय आहे. यासोबतच बांगलादेश स्पर्धेतून बाहेर झाला. शारजाहमध्ये बांगलादेशचा संघ १६० धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानने ३५.३ षटकांत ३ विकेट्स गमावून लक्ष्य गाठले. अंतिम सामना अफगाणिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यात २३ ऑक्टोबरला खेळवला जाईल. राशिद खानने सलग दुसऱ्या सामन्यात ४ विकेट्स घेतल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी त्याने झिम्बाब्वेविरुद्धही ४ विकेट्स घेतल्या होत्या.शारजाह क्रिकेट स्टेडियममध्ये अफगाणिस्तानने नाणेफेकीनंतर प्रथम गोलंदाजी करत बांगलादेशला १६० धावांवर रोखले.अजमतुल्लाह उमरझई आणि यामिन अहमदझई यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. बांगलादेशसाठी यष्टिरक्षक परवेझ हुसेन इमॉनने सर्वाधिक ७० धावा केल्या. मात्र, त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. सैफ हसनने ४१ धावा केल्या. या खेळीत त्याने ८२ चेंडूंचा सामना केला. सलामीवीर तंजीद हसन तमीमला केवळ १ धाव करता आली. सौम्य सरकार पहिल्याच चेंडूवर गोल्डन डकवर बाद झाला.कर्णधार तौहीद हृदॉयलाही खाते उघडता आले नाही. नजमुल हुसेन शांतोने १५ धावा केल्या. यष्टिरक्षक परवेझ हुसेन इमॉनने अर्धशतक झळकावत एक बाजू लावून धरली. मेहदी हसन मिराज २ आणि शोरिफुल इस्लाम ७ धावा करून बाद झाले.



हार्दिक पांड्या कमबॅकवर प्रश्नचिन्ह

| मुंबई | प्रतिनिधी |

अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या दुखापतीमुळे आयपीएल २०२६ पासून मैदानावर दिसलेला नाही. दरम्यान, हार्दिकची दुखापत अधिकच गंभीर झाली असून तो पुढील सहा महिने मैदानावर दिसण्याची शक्यता कमी आहे.ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात हार्दिक मैदानात परतणार होता. मात्र, फिटनेसवर काम करत असताना त्याला पुन्हा दुखापत झाली, त्यामुळे तो अजूनही क्रिकेटपासून दूर आहे. हार्दिकची दुखापत अधिक गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पांड्या आता दीर्घ काळासाठी क्रिकेटपासून दूर राहण्याची शक्यता आहे.

भारतीय जलतरणपटू जपानमधून हद्दपार

| जपान | वृत्तसंस्था |

भारतीय पॅरा जलतरणपटू मोहम्मद शम्स आलम शेख यांना जपानमधून हद्दपार करण्यात आले आहे. नागोया येथील हॉटेलमधील महिला हाउसकीपिंग कर्मचाऱ्यासोबत लैंगिक गैरवर्तन केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. ही घटना १९ ऑक्टोबर रोजी घडली. शेख यांना मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी हद्दपार करण्यात आले. मात्र, या प्रकरणाची माहिती गुरुवारी समोर आली. पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडिया शम्स आलम यांच्यावर आजीवन बंदी घालण्याचा विचार करत आहे. या प्रकरणानंतर भारताच्या एशियन पॅरा गेम्स पथकावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

एशियन पॅरा गेम्समध्ये भारताची उत्तुंग भरारी

सिमरन शर्माने भारतासाठी जिंकले दुहेरी सुवर्णपदक

| जपान | वृत्तसंस्था |

जपानमधील आइची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंनी आपल्या शानदार कामगिरीचे प्रदर्शन सुरूच ठेवले आहे. आज या स्पर्धेत भारताने विविध क्रीडा पक्रारत गोल्ड मेडल जिंकले आहे. भारताची स्टार पॅरा स्प्रिंटर सिमरन शर्मा हिने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तिने या खेळात दुसरे सुवर्णपदक जिंकले आहे. सिमरन शर्मा हिने महिलांच्या १०० मीटर १२ वर्ग च्या अंतिम फेरीत १२.०२ सेकंदांची विक्रमी वेळ नोंदवली आहे. तसेच यामध्ये तिने सुवर्ण पदक जिंकले आहे.


यापूर्वी सिमरनने २०० मीटर १२ प्रकारात २४.८० सेकंदांची वेळ देत सुवर्णपदक जिंकले. आता तिने १०० मीटर प्रकारात देखील सुवर्णपदक जिंकले आहे. हांगझोऊ येथे आयोजित आशियाई पॅरा गेम्स २०२२ मध्ये सिमरनने १२.६८ सेकंदांच्या वेळेसह रौप्य पदक जिंकले होते. त्यानंतर यंदा तिने थेट सुवर्ण पदक जिंकले आहे. सध्या जपानमध्ये सुरू असलेल्या भारताच्या



खेळाडूंनी आपल्या शानदार कामगिरीचे प्रदर्शन केले आहे.प्रणव देसाई यांनी पुरुषांच्या १०० मीटर ६४ स्पर्धेत ११.९६ सेकंदांची वेळ नोंदवून कांस्यपदक जिंकले. भारताने पुरुषांच्या १०० मीटर ४७ स्पर्धेत पहिले आणि दुसरे स्थान पटकावले. दिलीप गावित महादु यांनी १०.६९ सेकंदात सुवर्णपदक तर मोहम्मद बासिल मोर्सिंगनाकाथी यांनी १०.७२ सेकंदांच्या वेळेसह रौप्य पदक आपल्या नावावर केले आहे. पुरुष जॅवलिन थ्रो इव्हेंटमध्ये, सुखचैन यांनी त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वोत्तम कामगिरीसह कांस्य पदक जिंकले आहे. मनजीत व्यास यांनी पुरुषांच्या जॅवलिन थ्रो स्पर्धेत ६१.०३ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह रौप्य पदक मिळवले. त्यांनी आपल्या दुसऱ्या प्रयत्नात ही कामगिरी सध्या केली आहे.भारताने पुरुषांच्या जॅवलिन थ्रो स्पर्धेतही रौप्य आणि कांस्यपदक पटकावले. प्रदीप कुमार यांनी आपल्या शेवटच्या प्रयत्नात २७.४५ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह रौप्य पदक जिंकले, तर आयुष वर्मा यांनी आपल्या पाचव्या प्रयत्नात १७.८८ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक जिंकून भारताची मान अभिमानाने उंचवली आहे.

शीतल देवी अन् तोमर कुमारला सुवर्णपदक

भारतीय तिरंदाज शीतल देवी आणि तोमर कुमार यांनी आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये आपल्या प्रभावी कामगिरीने देशाला गौरव मिळवून दिला. त्यांनी कंपाऊंड मिश्र सांघिक प्रकाराच्या अंतिम फेरीत इंडोनेशियन जोडीचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. या रोमांचक लढतीत भारतीय जोडीने १५१-१४८ असा विजय मिळवला. शीतल आणि तोमर यांनी पात्रता फेरीत विश्वविक्रम प्रस्थापित करून दावा मजबूत केला होता.



भारताच्या अव्वल मानांकित जोडीने अंतिम फेरीच्या सुरुवातीपासूनच अचूक नेमबाजी करून आघाडी कायम ठेवली. पहिल्या फेरीत भारताने ३८-३७ अशी थोडी आघाडी घेतली. दुसऱ्या फेरीत, भारतीय तिरंदाजांनी आपल्या कामगिरीत आणखी सुधारणा करत ७७-७३ अशी धावसंख्या नोंदवली आणि इंडोनेशियन जोडीवर चार गुणांची आघाडी घेतली.

तिसऱ्या फेरीत, इंडोनेशियाच्या तेओडोरा ऑडी आयुदिया फेरेली आणि केन स्वागुमिलांग यांनी एका गुणाची आघाडी घेतली, परंतु भारतीय जोडीची एकूण आघाडी तीन गुणांवर कायम राहिली. अंतिम फेरीत दोन्ही संघांनी ३८-३८ अशी बरोबरी साधली. भारताची आधीपासून असलेली आघाडी सुवर्णपदक मिळवण्यासाठी पुरेशी होती. इंडोनेशियाला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

शीतल देवी आणि तोमर कुमार यांनी अंतिम फेरीपूर्वीच्या पात्रता फेऱ्यांमध्येही उत्कृष्ट कामगिरी केली. या भारतीय जोडीने कंपाऊंड मिश्र सांघिक मानांकन फेरीत एकूण १,४०२ गुण मिळवले, जे मागील विश्वविक्रमापेक्षा दोन गुणांनी अधिक होते. या कामगिरीमुळे अंतिम फेरीसाठीचा त्यांचा दावा अधिक मजबूत झाला आणि या जोडीने विजेतेपदाच्या सामन्यातही आपली ताकद दाखवून दिली.

सुवर्णा राजने जिंकले सुवर्णपदक

भारताच्या सुवर्णा राजने आशियाई पॅरा गेम्समधील महिलांच्या डिस्कस थ्रो एफ प्रकारात १५.६६ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह सुवर्णपदक जिंकले. ग्रेटर नोएडा येथील ४४ वर्षीय सुवर्णाने तिच्या सहा प्रयत्नांपैकी चार प्रयत्नांत १५ मीटरपेक्षा जास्त थ्रो करून उत्कृष्ट कामगिरी केली. तिने पाचव्या प्रयत्नात सर्वोत्तम थ्रो करून सुवर्ण पदक पटकावले.



सुवर्णा राजने आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताचे १५ वे सुवर्णपदक जिंकले, जे चौथ्या दिवसातील पहिले सुवर्णपदक होते. इराणच्या शाहला हदीदीने १५.४५ मीटरच्या थ्रोसह दुसरे स्थान पटकावले, तर व्हिएतनामच्या थी न्गोक थुई न्गुयेनने १४.६५ मीटरच्या थ्रोसह कांस्यपदक मिळवले. व्हीलचेअर वापरणाऱ्या सुवर्णाने २०१७ मध्ये या खेळाला सुरुवात केली आणि तेव्हापासून पिंटू नागर यांच्या मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेतले आहेत. तिने तीन आशियाई पॅरा गेम्स आणि अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. थाळीफेकीच्या ५४ प्रकारात ती आशियामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. सुवर्णानेफाइझा आंतरराष्ट्रीय पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या थाळीफेक ५४/५५ प्रकारात कांस्य पदक जिंकले. तसेच, तिने या वर्षी जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियातील कॅनबेरा ट्रॅक मीटमध्ये थाळीफेकीत सुवर्ण पदक आणि गोळाफेकीत रौप्य पदक जिंकले.

हैदराबादचा विजयाचा डबल धमाका | आंध्र प्रदेशला २६७ धावांनी लोळवलं

'मिया मॅजिक'चा कॅप्टन्सी स्वॅग!

| मुंबई | प्रतिनिधी |

रणजी ट्रॉफी २०२६-२७ मध्ये आंध्र प्रदेश आणि हैदराबादचे संघ आमनेसामने आले. हा सामना विजयवाडा येथील मुलापाडूमधील देविनेनी व्यंकट रमणा प्रणिता मैदानावर खेळला गेला. हैदराबादने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत २६७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासोबतच, टीम इंडियाचा स्टार वेगवान गोलंदाज, मोहम्मद सिराजने कर्णधार म्हणून आपली क्षमता सिद्ध केली आणि सलग दुसरा सामना जिंकला.

मोहम्मद सिराजने कर्णधार म्हणून आपला पहिला सामना त्रिपुराविरुद्ध खेळला. या सामन्यात हैदराबादच्या संघाने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत एक डाव आणि ४० धावांनी विजय मिळवला. संघाचा दुसरा सामना आणखी आव्हानात्मक असलेल्या आंध्र प्रदेशविरुद्ध होता. या सामन्यात मोहम्मद सिराजने कर्णधार म्हणून शानदार कामगिरी करत हैदराबादला २६७ धावांनी विजय मिळवून दिला. आपल्या नेतृत्वाखाली संघाल विजय मिळवून सिराजने बीसीसीआयलाही एक मोठा संकेत दिला आहे.





हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि आंध्र प्रदेशला गोलंदाजीचे आव्हान दिले. हैदराबादने आपल्या पहिल्या डावात केवळ २७५ धावा केल्या. अभिरथ रेड्डीने सर्वाधिक ६७ धावा केल्या, तर राहुल राधेशनेही नाबाद ५८ धावा केल्या. त्रिपुराना विजयने आंध्रसाठी चार विकेट्स घेतले. प्रत्युत्तरात, आंध्र प्रदेशचा संघ आपल्या पहिल्या डावात केवळ १८४ धावांवर सर्वबाद झाला. शेख राशीदने ६१ धावा केल्या. तनय त्यागराजनने हैदराबादसाठी पाच विकेट्स घेऊन आपल्या संघाला मोठी आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या डावात, हैदराबादने दमदार फलंदाजी करत ७ विकेट्स गमावून ३०६ धावांवर डाव घोषित केला. कोडिमेला हिमातेजाने १२३ धावांची नाबाद शानदार खेळी केली. तनय त्यागराजनने नाबाद ५३ धावा करून त्याला साथ दिली. प्रत्युत्तरात, आंध्र प्रदेशचा संपूर्ण संघ अवघ्या १३० धावांवर सर्वबाद झाला. यामुळे हैदराबादने २६७ धावांनी दणदणीत विजय मिळाला. दुसऱ्या डावात तनाय त्यागराजनने हैदराबादसाठी सहा विकेट्सही घेतले.

बुद्धिबळाच्या पटावर महाराष्ट्राची चमक



| पुणे | प्रतिनिधी |

शिवभूमी शिक्षण ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित शिवभूमी आंतरराष्ट्रीय खुल्या फिडे रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्राच्या सिद्धांत साळुंखे याने अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

या स्पर्धेत नवव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत सिद्धांत साळुंखे याने अखिलेश नगारेचा पराभव करून ८.५ गुणांसह विजेतेपद पटकावले. तर, विरेश शरणार्थीने सुयोग वाघला बरोबरीत रोखले व ७.५ गुण, ५६.५ बुकोल्स कट गुणसरासरीच्या जोरावर दुसरे स्थान पटकावले. श्लोक शरणार्थी याने कवीश लिमयेचा पराभव करून ७.५ गुण, ५४.५ बुकोल्स कट गुण सरासरीच्या जोरावर तिसरे स्थान मिळवले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)